२२८४९

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
ग्रं. क्र. २२८४९

# एक असतो राजा

IRBK-0122849

शं. ना. नवरे

# एक असतो राजा

IRBK-0122849

: २०५ :

जय हिंद प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २

• मूल्य दोन रुपये

## महत्वाची जाणीव

या नाटकाचें पुनर्मुद्रण, भाषांतर, प्रयोग इत्यादि सर्वाधिकार सौ. अंजलि नवरे 'गोविंद–धाम' डोंबिवली, यांचेकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी पंचवीस रुपये मानधन देऊन त्यांची लेखी परवानगी घेणें आवश्यक आहे. तसें न केल्यास नैबंधिक इलाज केला जाईल.


मूल्य :
**दोन रुपये**

मुखपृष्ठ :
राम वाईरकर

छायाचित्रें :
राजदत्त

प्रकाशक :

ग. का. रायकर
जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार, मुंबई २

★

प्रथमावृत्ति :
५ मे १९६३

★

मुद्रक :

व्ही. बी. खळे
जय गुजरात प्रेस
गांवदेवी, मुंबई ७


(नाट्यपरीक्षण मंडळ, महाराष्ट्र सरकार, मुंबई यांनीं प्रमाणपत्र क्रमांक डी. आर्. एम्. २६४/६३ दि. १० एप्रिल ६३ याखालीं या नाटकास मंजुरी दिली आहे.)

इंडियन नॅशनल थिएटरचे
नेपथ्यकार शाम आडारकर
आणि
फार्सकार बबन प्रभु
यांना स्नेहपूर्वक

— शन्ना

# लेखकाचें पान

मला आवडलेल्या एका इंग्रजी नाटकावर हें नाटक आधारलेलें आहे. इथें चारचौघांत वावरणारा परंतु कल्पनेच्या वेगळ्या विश्वांत रमणारा राजा आपल्याला फारसा अपरिचित नाहीं !

कथा लिहीत असतांनाच माझा ओढा नाट्यलेखनाकडे होता. नाट्यलेखन करण्याची मला इच्छा झाली त्याच वेळीं माझी बबन प्रभूशीं ओळख झाली, त्यांची माझी दोस्ती जमली, रंगभूमीवर वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या इंडियन नॅशनल थिएटर ह्या संस्थेशीं माझा संबंध आला. संस्थेचे दिग्दर्शक श्री. आत्माराम भेंडे, नेपथ्यकार श्याम आडारकर, फार्सकार बबन प्रभु यांनीं त्याच वेळीं माझ्या मनावर कळत न कळत नाट्यविषयक संस्कार केले हें मी माझें भाग्य समजतों.

आज आमच्या संस्थेच्या वर्धापनदिनीं हें नाटक सादर करण्यांत येत आहे याचा मला फार आनंद होत आहे. हें नाटक सादर करणाऱ्या संस्थेचा मी सदैव ऋणी आहे. नाट्यलेखनांत मला सूचना करणारे दिग्दर्शक आत्माराम भेंडे, सौ. आशा भेंडे आणि बबन प्रभु यांचा मी आभारी आहे. ह्या नाटकाच्या निर्मितीप्रमुख सौ. विमल राऊत, कुशल नेपथ्यकार रघुवीर तळाशिलकर, रंगमंचावरील आणि पडद्यामागील सर्व कलावंत हे सारे माझ्यावर लोभ करणारे आहेत, त्यांनीं हें नाटक अगदीं आपलें समजून जे कष्ट घेतले त्याबद्दल मला त्यांचे आभार मानले पाहिजेत.

हें नाटक प्रसिद्ध करणारे ‘श्रीदीपलक्ष्मी’ मासिकाचे रसिक संपादक श्री. ग. का. रायकर, पुस्तकाचें मुखपृष्ठ रेखाटणारे श्री. राम वाईरकर व छायाचित्रकार श्री. राजदत्त यांचाहि मी आभारी आहे.

माझें हें पहिलेंच नाटक मराठी नाट्यरसिकांच्या पसंतीस उतरेल अशी मला आशा आहे.

‘गोविंद–धाम’
डों बि व ली
५ मे १९६३

—शं. ना. नवरे

या नाटकाचा पहिला प्रयोग ‘इंडियन नॅशनल थिएटर, मुंबई’ तर्फे संस्थेच्या वर्धापनदिनीं — ५ मे १९६३ रोजीं जयहिंद कॉलेज हॉल, मुंबई येथें सायंकाळीं ५ वाजतां सादर करण्यांत आला. या प्रयोगांत खालील कलावंतांनीं भाग घेतला होता :

| | | | |
|---|---|---|---|
| **नाना** | ... | ... | रमेश चौधरी |
| **शारदाबाई** | ... | ... | विमल राऊत |
| **बापू** | ... | ... | यशवंत वैद्य |
| **राजा** | ... | ... | बबन प्रभु |
| **चंदू** | ... | ... | मधु साठे |
| **मालू** | ... | ... | शालिनी पंड्या |
| **अलका** | ... | ... | लता म्हापसेकर |
| **मधुराणी** | ... | ... | आशा पोतदार |

दिग्दर्शक : **आत्माराम भेंडे**

साहाय्यक : **आशा भेंडे**

नेपथ्य : **रघुवीर तळाशिलकर**

निर्मिती : **विमल राऊत**

प्रकाश योजना व पार्श्व-संगीत : **आत्माराम भेंडे**

रंगभूषा : **सखाराम मोरे**

वेषभूषा : **आशा भेंडे**

प्रसिद्धी : **यशवंत वैद्य**

छायाचित्रें : **राजदत्त**

# एक
# असतो
# राजा

२२८४० ... ३१.५.८८
नाटक

[ श्री. बापूराव सहस्रबुद्धे यांच्या वडलोपार्जित घरांतला दिवाणखाना. प्रेक्षकांच्या डाव्या बाजूला स्वयंपाकघरांत जाण्याचा दरवाजा. तिथें जवळच डायनिंग टेबल. बाजूला कांहीं खुर्च्या. उजव्या बाजूनं घरांत येण्याचा मुख्य दरवाजा. या दरवाज्याच्या बाजूला बाहेर बाग आहे. बागेच्या जवळच म्युनिसिपालिटीचा दिवा आहे. बागेंत बसण्यासाठीं एक बाक ठेवलेलें आहे. दिवाणखान्याच्या मुख्य दरवाज्या जवळून वर जाणारा जिना आहे. वरच्या मजल्यावर बेडरूम्स असाव्यात. ह्या जिन्याखालीं एका टेबलावर टेलिफोन आहे. बाजूला एक कपाट आहे. जिन्याजवळच्या दर्शनी भिंतीवर एक मोठी खिडकी आहे. राजाला चोरून आंत यायला नेहमीं उपयोगी पडणारी. मध्यभागीं जुना सोफासेट आहे. उपनगरांतलं वडलोपार्जित घर आहे. या पिढींतलं कुणीहि कांहीं तिथं सुधारणा करूं शकलेलं नाहीं हें चटकन् ध्यानीं यावं.

पडदा उघडतो तेव्हां नाना—बापूरावांचे सासरे कांहीं कागदपत्र धुंडाळीत आहेत. ते सारखे स्वतःशींच बडबडत असतात. जुन्या आठवणी काढीत. नव्यांना शिव्या मोजत. बाहेर बागेंत काळोख आहे. प्रकाशांत फक्त हा दिवाणखाना दिसतो. ]

**नाना :** हॅः पेन्शनबुकावर स्टॅम्प्सुद्धां मारलेले नाहींत ... लक्षच नाहीं कुणाचं ... दुसऱ्याची पर्वाच नाहीं ... फुकटचा पगार खायचा. ( पेन्शनबुक ठेवून देतात. हॉस्पिटलचं कार्ड काढतात ). ह्यासुद्धां त्यांतल्याच. डॉक्टर कुमारी चित्रे ... कुणीतरी परकरी पोर डॉक्टर म्हणे. ... ह्या डॉक्टरीणबाईपुढं मी मुळींच उभा राहाणार नाहीं ... आणि म्हणे गुरुवारीं या चार वाजतां. त्यांना ठाऊक आहे, गुरुवारीं माझा उपास असतो, मी कुठं बाहेर जात नाहीं, दाढी करत नाहीं ... आणि म्हणे गुरुवारीं या ... मी मुळींच जाणार नाहीं. सांगून ठेवतों.

( आपण एकटेच आहोंत याची त्यांना जाणीव होते. उठून फेऱ्या घालूं पाहातात. बाजूच्या बंद केलेल्या कपाटाजवळ येतात. कपाट उघडण्याचा विफल प्रयत्न करतात. परत येऊन कोचावर बसतात. )

... तोसुद्धां तसाच. ऐतोबा. आणि हिची फूस आहे ना सारखी ... ( हॉस्पिटलच्या कार्डाकडे नजर टाकतात ) ... आणि तो औषध आणणार होता ... आणलंय् तर ठेवलय् कुठं ? ... कपाटांत ? बघावं तेव्हां बंद असतं कपाट. काय अष्टघाण ठेवतात त्यांत देव जाणे. बघावं तेव्हां बंद. बरं विचारलं तर थोबाड बंद ... कुणी बोलणारच नाहीं.

( शारदाबाई येतात )

**शारदा :** बरं बाई, तुम्हांला हवं तसं करा. तो कांहीं लहान नाहीं आतां. मी कशाला उगाच तोंड दुखवून घेऊं ?

( स्वयंपाकघरांत जातात. नानांकडे लक्ष नाहीं. )

**नाना :** डॉक्टर चित्रे ... मी तिच्यापुढं मुळींच उभा राहाणार नाहीं ...

**शारदा :** ( बाहेर येऊन जिन्याजवळ जातात ) राजा — ए राजा, येतोस ना खालीं चहाला ? ... तुझ्या खोलींतलं घड्याळ तुला हवं तसं पुढं नाहीं हं ... नऊ वाजत आले ... दुसऱ्या चहाची वेळ झाली.

**नाना :** ( स्वतःशींच ) ... प्रत्येक वेळेला हीच गत ... भेटण्याचा दिवस गुरुवार ... डॉक्टर चित्रेचासुद्धां दत्तासारखा गुरुवारच असतो कीं काय देव जाणे !

**शारदा :** ( नानांना ) आज नाना, तुम्हांला डॉक्टरांकडे यायचं आहे हं तपासणीला.

**नाना :** मी मुळींच येणार नाहीं. आज तर शक्यच नाहीं मला. माझा जीव घाबरा झालाय्.

**शारदा :** तें कांही चालायचं नाहीं नाना. तुम्हांला यायलाच हवं डॉक्टर-कडे. मी कांहीं एक ऐकणार नाहीं.

( बापू येतात. हातांत कामाचे कागद, टपाल वगैरे ... पन्नाशीचे गृहस्थ. )

**नाना :** ... सगळीकडे तीच तऱ्हा ... कुणी कुणाचं ऐकत नाहीं ... मोठ्यांचं ऐकायचं म्हणजे कमीपणा वाटतो ना त्यांना ... अजून झोंपलाय्...

त्याला सुनावलं पाहिजे खडसून ... म्हणावं, ' असं वागायचं असेल तर चालता हो सरळ. '

**बापू :** ( शारदाबाईंना ) तो कांहीं लहान नाहीं आतां ...

**शारदा :** तुम्ही आणि तुमचा मुलगा. हवं तें करा. मी कशाला मध्यें बोलूं ?

**नाना :** ...त्याला कुणीच बोलत नाहीं हडसून खडसून. मी असतों तर —

**बापू :** राजा कुठें आहे ? अजून साली सकाळ झाली नाहीं ना यांची ? उठलाय् कीं नाहीं तो ?

**नाना :** त्याला उठवायचं म्हणजे हिला शंख, घंटा, तुताऱ्या न्यायला हव्यात.

**बापू :** ( घड्याळाकडे पाहून ) हें सालं फार झालं. साडेनऊपर्यंत झोंपायचं —

**नाना :** इतका वेळ झोंप तरी कशी येते ?

**शारदा :** त्याला मी तीनदां हांका मारल्या.

**नाना :** ... फटके मारल्याशिवाय उठायचा नाहीं तो.

**बापू :** साला हा रोजचाच तमाशा झालाय्.

**नाना :** ... रात्रीं कुठं तमाशाला जातो कीं कुठं जातो —

**बापू :** ( शारदाबाईंना ) हे तुझे लाड नडले त्याला.

**शारदा :** राजा, ए राजा – चहा गार झाला. मी पुन्हां करणार नाहीं चहा. सांगून ठेवतें.

**नाना :** ... सांगून ऐकणाऱ्यापैकीं नाहीं तो.

**बापू :** ( शारदाबाईंना ) तूं वर जा आणि त्याच्या कमरेंत साली एक लाथ घाल.

**शारदा :** तुमचं काय जातं सांगायला ?

**नाना :** ... बाप पोसतो आणि आई सोसते ... तो कशाला उठेल ? माझं पासबुक कुठं गेलं ? कुणी घेतलं असेल तर बोलणार देखील नाहीं.

**बापू :** ... सालं घरांत कांहीं मिळतच नाहीं. प्रत्येक गोष्ट हलवली जाते. ठेवली रे ठेवली कीं कुणी तरी हलवलीच ... कुणी तरी हात लावतोच.

**नाना :** त्या खिडकीची कडी नीट लावली पाहिजे. तो मागलं दार लावतच नाहीं नीट ... कुणी रात्रीं घरांत शिरलं तर कळणार देखील नाहीं कुणाच्या काकाला.

(राजा जिन्यावर येतो. मळक्या रंगाचे चटेरी पटेरीं कपडे ... गाऊन दाराजवळ पडलेलं वर्तमानपत्र उचलून घेतो.)

**शारदा :** आले वाटतं राजेश्री ... थंड चहा प्यायला. (स्वयंपाकघरांत जातात.)

**राजा :** आई, राजेश्री नाहीं, राजा. नुसता राजा. प्लेन. (वर्तमानपत्र वाचतो.) कमाल आहे. नाटकांत अशी एंट्री घेणारा वर्तमानपत्र वाचायला लागला, कीं त्याला नेमकं 'म्हशीला तीन पायांचं शिंगरू झालं' असलं कांहीं तरी सांपडतं. तसं कांहींसं वाचायला म्हणून गेलों तर म्हणे–फटक्यांची शिक्षा रद्द.

**बापू :** तुला साले फटके ओढल्याशिवाय तूं लौकर उठणार नाहींस.

**राजा :** हॅलो, गुड्मॉर्निंग. शुभप्रभात...तुम्हांला आणि मला — दोघां-नाहीं ही प्रभात शुभ दिसत नाहीं, पण तरीसुद्धां गुड्मॉर्निंग.

**बापू :** गुडमॉर्निंग ? मध्यान्ह व्हायची वेळ झाली तरी तुमचा गुडमॉर्निंगच कां ? तुझ्या आईला काय सालं, सहा सहा वेळां चहा करण्याशिवाय दुसरं काम नाहीं ?

**नाना :** ...पार कामांतून गेलाय्... लाड, लाड बाधले त्याला.

**राजा :** ओहो — नाना ?

**बापू :** तुला सालं नाटक वाटतंय् हें ? इकडे माझ्याशीं बोल. 'ओहो नाना' म्हणे ... आणि खालीं येतांना जरा कपडे बदलून येशील कीं नाहीं ? आणि ही गाउनची मिजास कशाला ?

**नाना :** ...परवां नवीन कपडे आणले ना ? तर म्हणाला, रंग चांगला नाहीं. लाईटमध्यें कळला नाहीं... बंबांत टाकायला निघाला होता कपडे—

**राजा :** नाना, मला वाटतं, कपडे बदलण्याबद्दल विषय चाललाय्, बंब तापवण्याबद्दल नाहीं... उग्गाच मध्येंमध्यें नाक खुपसतात—

**बापू :** राजा, कुणाशीं ही भाषा ? तुला काय वाटलं, तुझ्या मवाली मित्रां-बरोबर तूं नाक्यावर उभा आहेस ?... काल... काल रात्रीं केव्हां आलास ? ...रात्रीं आलास कीं सकाळींच एकदम आलास ?

( शारदाबाई येतात )

**राजा :** मला वाटतं, दहा कीं अकरा वाजले होते...फार तर सव्वाअकरा–

**बापू :** सव्वाअकरा ! एक वाजून गेला होता.

**राजा :** मग, मला वाटतं माझं घड्याळ मागं —

**बापू :** सालं दोन दोन कलाक घड्याळ मागं राहतं ? मग उद्यांपासून हें घरांतलं घड्याळ बाहेर फिरवत राहा – वेळेवर घरीं यायला.

**राजा :** फार जड असेल तें घड्याळ. घरचंच कुणी जबाबदार माणूस तें घड्याळ डोक्यावर घेऊन माझ्यामागून आलं तर बरं होईल.

**बापू :** राजा, थोबाड आवर.

**शारदा :** राजा, काल रात्रीं नऊ वाजतां ग्रँटरोड स्टेशनवर तूं काय करीत होतास ?

**राजा :** कोण–मी ? आणि ग्रँटरोड स्टेशनवर ? कमाल आहे. कुणी सांगितलं ?

**शारदा :** कुणी कां सांगे ना ! त्याच्याशीं काय करायचंय् तुला ? पण तिथं तूं होतास. कुणीतरी तुला पाह्यलं. आणि तुझ्याबरोबर मालू नव्हती, दुसरीच कुणीतरी —

**राजा :** मालू कोण ?

**शारदा :** मालू म्हणजे मालती बांदेकर. तुला ठाऊक आहे.

**नाना :** ... मालती बांदेकर. म्हणजे मघाशीं फोनवर–राजा तिच्याशीं लग्नबिग्न करतोय् कीं काय ?

**बापू :** कोण हा ? लग्न होणार याचं ? वाऱ्यावर सोडलेला पतंग नुसताच भरकटतो. पांखरं पकडत नाहीं. नाटकाच्या नांवाखालीं साली रोज एक नवीन कारटी.

**राजा :** आई, पाहाणाऱ्याला म्हणावं आधीं स्वतःपुरतं बघ, माझ्या फंदांत पडण्याचं काम नाहीं त्याला. माझं मी वाट्टेल तें करीन—

**शारदा :** तूं करशील पण आम्हीं करूं देणार नाहीं. अजून तुला स्वतःच्या पायावर उभं राहायची अक्कल नाहीं.

**नाना :** ... मघाशीं आलेला फोन तिचाच होता. दुपारीं येणार आहे ती चहाला. तिला कांहीं बोलायचंय् तुझ्याशीं. शारदा, तूं तिला सरळ विचार लग्नाबद्दल. कां मी विचारूं ?

**राजा :** नाना, मला वाटतं ज्याचं काम त्यानं करावं. आई त्या माळूला काय तें विचारण्याचं बघेल. तुम्ही नाक खुपसून दुखवून कशाला घेतां.

**शारदा :** राजा, चूप...मीं सांगणार आहे माळूला. उगाच आयुष्याची नासाडी होईल तिच्या. तुला काय मवाल्याला ? ती तुझ्यावर कशी भाळली कोण जाणे. तुला कांहीं कशाचं आहे का ? आज ही, उद्यां ती–चर्नीरोड स्टेशनवर एक, ग्रँटरोडला दुसरी–तूं लग्न करणार नाहीस कीं कांहीं नाहीं. जन्मभर असाच राहाणार तूं. शेवटीं कुणाशींच लग्न नाहीं. चार हात करायला आधीं दोन पाय घट्ट रोवलेले असावे लागतात.

**बापू :** त्याचं थोबाड फोडलं पाहिजे – रोज उशीर रोज उशीर. राजा, तुला सांगून ठेवतों, ह्या घरांत राहायचं असेल तर रात्रीं वेळेवर आलं पाहिजे. नाहींतर घर सोड आणि चालता हो–

**राजा :** मला वाटतं, हीच ॲरेंजमेंट बरी होईल.

**शारदा :** (अजून चालूंच –)...माळूनं ह्याच्यांत काय पाहिलं कुणास ठाऊक. राजा, तिच्याशीं तूं लग्न करणार आहेस कीं आपला असाच —

**बापू :** त्याला तरी कुठं काय ठाऊक आहे ! विचार करायला साली अक्कल लागते.

**नाना :** ...त्यानं एकदां आतां विचार केला पाहिजे गंभीरपणानं —

**शारदा :** ही माळू तशांतली नाहीं वाटत. मागं एकदां इथं आली होती. मीं पाहिली आहे तिला. खूपच सालस दिसते... त्या तुझ्या त्या मधुबाला कीं मधुराणीसारखी नाहीं – गांवभवानी ... नाहींतर काय ? नटीच ती बोलूनचालून – हल्लीं कधीं भेटली होती का ती ?

**बापू :** राजेमहाराजांना काय ? ही असली मंडळी कुठं लक्षांत राहातात ? हे म्हणजे हरून–अल्–रशीद. रोज नवी स्त्री —

**नाना :** ...त्यानं आतां नक्की केलं पाहिजे. ही दुसरी कोण मथुराराणी —

**राजा :** मथुरा नाहीं, मधु – मधुराणी. तिला मी गेल्या तीन महिन्यांत पाहिलंसुद्धां नाहीं.

**शारदा :** मग काल रात्रीं तूं कुणाबरोबर होतास ?

**राजा :** काल रात्रीं ?

**शारदा :** हो. काल रात्रीं. ग्रँटरोड स्टेशनवर. तूं कुणाबरोबर होतास तेवढंच सांग.

**बापू :** आठवलं एवढंच सांग.

**राजा :** काल ... काल ग्रँटरोड स्टेशनवर ना ? हं ... ती अलका गांगुली होती. माझ्या नवीन नाटकांत तिला मी एक रोल कबूल केलाय्.

**बापू :** ही अंगुली कीं गांगुली काय करते ?

**नाना :** राजानं सांगितलं नाहीं का ती नाटकांत काम करते म्हणून.

**राजा :** करत नाहीं, करणार आहे. माझ्या नवीन नाटकांत.

**शारदा :** दुपारीं ती मालती येऊं दे. मी सांगते तिला. सगळं नक्की करून टाकते. लग्न तरी कर, नाहींतर – हो, तिचं बिचारीचं आयुष्य फुकट जायचं उगाच. ह्याला तिचं कांहीं आहे का ?

**बापू :** असेल त्याची त्याला कधीं किंमत होती ? त्याला समाधान सालं कशांतच नाहीं. कॉलेजांत गेला, तिथं समाधान नाहीं. म्हणे मला आर्टस्कूलला जायचं होतं. मग म्हणे नोकरी करायची होती. आतां नोकरी मिळालीय् —

**राजा :** ती नोकरी सोडणार आहे. ब्रह्मे सॉलिसिटर्सकडे कारकुनी. मला वाटत नाहीं, तिथं मी फार दिवस कारकुनी करीन.

**बापू :** मग काय करणार आहेस तूं ?

**शारदा :** राजा —

**राजा :** मला मद्रासला नोकरी मिळतेय्.

**बापू :** मद्रास म्हणे. सगळ्या थापा. मद्रास म्हणजे तुला सालं काय दहींसर वाटतं ?

**शारदा :** मद्रासला ? राजा — कसली नोकरी आहे ?

**राजा :** ( गाऊनच्या खिशांतून पत्र काढतो. ) हें पहा. मला मद्रासला नोकरी मिळतेय् — जेमिनी स्टूडिओंत. लेखक म्हणून —

**बापू :** कसला साला लेखक !

**शारदा :** लेखक म्हणजे ?

**बापू :** अग, तूं काय ऐकतेस ह्याचं. सालं नांव लिहितां येत नाहीं सरळ वाचण्यासारखं आणि म्हणे लेखक. कोण नोकरी देतोय् तुला ?

**राजा :** जेमिनी स्टूडिओचे लेखक एस्. व्यंकटरामन् आहेत त्यांनीं बोलावलंय् मला. मागंच मी नव्हतं का तुम्हांला सांगितलं — ते मुंबईला

आले होते तेव्हां ? तेव्हांच मी तुम्हांला सांगितलं होतं. त्यांना मी ताज–महालमध्यें भेटायलासुद्धां गेलों होतों माझ्या कांहीं स्टोरीज घेऊन. त्यांना त्या खूप आवडल्या होत्या. त्यांचं मला आतां पत्र आलंय्, त्यांनीं मला मद्रासला बोलावलं आहे. स्क्रिप्ट रायटर म्हणून. एस्. व्यंकटरामन् खूप मोठी आसामी आहे जेमिनी स्टूडिओंत. खूप मोठी.

**नाना :** ( बडबड चालूच ) मोठी आलीय् सांगणारी. म्हणे डॉक्टरांकडे जा. मी मुळींच जाणार नाहीं.

**शारदा :** एस्. व्यंकटरामन् ? नांव ऐकलेलं नाहीं बाई.

**बापू :** ऐकशील कशी ? ह्या नांवाचा मनुष्यच नाहीं. असलाच तर तो स्टोरी रायटर नाहीं. हा मनुष्य राजाच्या डोक्यांतून निघाला आहे. ह्या व्यंकटरामन् कीं संकटमरण साला ह्यालाच फक्त ठाऊक आहे.

**शारदा :** कसली नोकरी म्हणालास ?

**राजा :** सांगितलं नाहीं का स्क्रिप्ट रायटर म्हणून ?

**बापू :** हें सालं एक नवीनच काढलंय् आतां राजानं. कुणाशीं दोन शब्द बोलायचे तर तिनदां जीभ अडखळते आणि म्हणे, त्याला मी ताजमहालमध्यें भेटलों. सगळं खोटं. परवां आपला तो दुकानदार भेटला होता. जयश्री स्टोअर्सवाला. साला माझ्या पायाकडेच बघत राहला.

**शारदा :** कां ?

**बापू :** ह्यालाच विचार. त्याला राजानं सांगितलं — मला गुडघी रोग झाला आणि दोन्ही पाय कापावे लागले. पाय कापून तिथं लाकडी पाय लावले आहेत. हे ... हे काय लाकडी पाय आहेत ?

**राजा :** त्या जयश्रीवाल्याचे डोळेच लांकडी असतील ह्या पायांना लांकडी पाय समजायला.

**बापू :** पण त्याला तूंच सांगितलंस ना हें ?

**राजा :** मी सांगितलं म्हणतो ? मग त्याचे कान आणि डोकंसुद्धां लांकडी असेल. तो काय वाटेल तें बोलतो. हॅः, ह्या पायांना लांकडी कोण म्हणेल ?—मी त्याला चंदूच्या काकांबद्दल बोललों.

**बापू :** काय करतात हे चंदूचे काका ?

**राजा :** त्यांचं दुकान आहे – फर्निचरचं. तिथल्या पलंगाच्या पायांबद्दल –

**शारदा :** खरंच राजा, कंटाळा आला रे तुझ्या ह्या खोटं बोलण्याचा. पण तूं कशाला इतकं खोटं बोलतोस ? तुझं कांहीं समजत नाहीं. दर शब्दाला तूं खोटं बोलतोस.

**राजा :** खोटं ? मग ठीक आहे. (खिशांतून पत्र काढून दाखवतो) हें पत्र बघ. एस. व्यंकटरामनचं. त्यांनीं मला ताबडतोब बोलावलंय् मद्रासला. तिथं आमचा करार होणार आहे. मी आतां फोनवरून नोटीस देणार आहे ब्रह्मे सॉलिसिटर्सना ... सरळ राजिनामा देणार आहे.

**शारदा :** तूं कांहीं विचार केला आहेस का पुढला राजा ? उठलास तो सरळ चाललास.

**बापू :** कुठलं सालं मद्रास आणि बिद्रास. म्हणे नोटीस देणार. हा कसला नोटीस देतोय् ? तेच देतील नोटीस ह्याला. (राजाला) लाथ मारून काढून टाकतील तुला, मी सांगतों. आज किती वाजतां जायचंय् तुला ऑफिसांत ?

**राजा :** मी जाणार नाहीं आहे आज. आज सुटी आहे.

**बापू :** सुटी कसली ?

**राजा :** सेकंड सॅटरडे.

**बापू :** गेल्या वेळींसुद्धां साला सेकंड सॅटरडे होता. तुमच्या ऑफिसांत महिन्याला सेकंड सॅटरडे किती असतात ? ... ही तिसरी खेप आहे सेकंड-सॅटरडेची.

**राजा :** माझा थोडासा गोंधळ झालाय्.

**बापू :** थोडासा ? तूं स्वतः म्हणजेच गोंधळ आहेस... (घड्याळाकडे बघतात) अरे, निघालंच पाहिजे... तुला साला उद्योग नसेल पण मला आहे. मला जायचंय् ऑफिसांत.

**शारदा :** तुम्ही दवाखान्यावरून जाणार आहांत का ? मी देखील आलेंच —

**बापू :** तुम्हांला आख्खा दिवस लागेल तयार होईपर्यंत. मला उशीर होतोय्.

**शारदा :** अहो, पण मी तयारच आहे ... ही पहा —

**बापू :** (राजाला) ... आणि तुमच्या देहाला सालं आतां पाणी लागूं दे ... अजून दाढी नाहीं झालेली ... आंघोळीला पत्ता नाहीं गेले दोन दिवस. कपडे बदललेले नाहींत ... आणि तुला सांगून ठेवतों—माझ्या दाढीच्या सामानाला हात लावूं नकोस.

**नाना :** शारदा, कुठं – डॉक्टरकडे निघालीस ?

**शारदा :** राजा, तुझा चहा आंत ठेवलाय् ... गार झाला असेल.

**बापू :** चहा झाल्यावर कपबशी विसळून ठेव. आईचं एक काम कमी झालं तरी हरकत नाहीं. तिच्यासाठीं कपबशी ठेवूं नकोस विसळायला.

**शारदा :** राजा, मी तासभरांत येतेंच.

(बापू आणि शारदा बाहेर बागेंत जातात. राजा स्वयंपाकघरांत जातो.)

**नाना :** मला एकट्याला टाकलंय् इथं. त्या पेन्शनचं काय झालं. इन्शुरन्स ...

(बापू आणि शारदा दिसेनासे होतात.)

**राजा :** (बाहेर येत) तो गारढोण चहा घेण्यापेक्षां उसाचा ताजा रस पत्करला सकाळीं.

**नाना :** चहा घेतलास राजा ?

**राजा :** नाहीं. मोरींत ओतून टाकला.

**नाना :** सगळी नासधूस चालू आहे घरांत ... आम्हांला गार चहासुद्धां नजरेला पडत नसे. मिळालेलं खायला पुरत नसे. टाकण्याची तर गोष्टच नको ... चुकून टाकलं तर दुसऱ्या जेवणाला तें हजर असे पानांत ... मिळेल त्यांत समाधान मानावं राजा ... गार तर गार ...

**राजा :** तुम्हांला मग हवाय् का तो गारढोण चहा – ?

**नाना :** सकाळींच वेळेवर खालीं आला असतास तर मिळाला असता गरम चहा —

**राजा :** मद्रासमध्यें चहा नाहीं, कॉफी. सकाळीं कॉफी, दुपारीं कॉफी, रात्रीं कॉफी. पुढल्या आठवड्यांत एव्हांना मी कॉफी घेत असणार मद्रासमध्यें —

**नाना :** मिळेल त्यांत समाधान मानावं ... झोळीला झेपेल इतकंच देव देत असतो ... जास्त मागितलं तर झोळी फाटते ... उद्यांची काळजी करावी, कालचं सुख आठवावं आणि आजच्या आनंदाला संयम घालावा ... आमची आई नेहमीं म्हणायची, सुख घोटाघोटानं प्यालं कीं लाभतं —

(दोघे आपापल्या स्वप्नांत जातात.)

**राजा :** कॉफीबार. समुद्रालगतचं छोटसं हॉटेल. हिरव्यागार रंगाच्या खुर्च्या आणि समोर कॉफीचा भरलेला कप. एस्प्रेसो कॉफी. समोर बसलेली दाक्षिणात्य सुंदरी, सांवळ्या रंगाची, काळ्याभोर आणि मोठ्या डोळ्यांची. काजळरेषेच्या तारांवर नाचणारीं पापण्यांचीं दोन पांखरं... समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यानं उडणारे केस नाजूक बोटांनीं सावरणारी ती दक्षिणेची सुंदरी आणि तिच्या मुखांतून स्रवणारे मंजूळ बोल...स्टूडिओंत तिचं नृत्य पाहून मी बेभान झालों...तिच्या पदन्यासानं माझं हृदय—

**नाना :** वणवण...दिवसभर वणवण करूनसुद्धां नोकरी मिळत नव्हती. आशेचा शब्द कानावर पडत नव्हता. मिळालेली नोकरी पदरांत पाडून मान मोडेपर्यंत काम करायचं एवढंच ठाऊक. दुसरीकडे नोकरी मिळत नव्हती म्हणून हातांतली नोकरी सोडतां येत नसे कीं तोंड उघडून बोलतां येत नसे...

**राजा :** (कल्पनेंतल्या सुंदरीशीं बोलतो)...तुझं नृत्य पाहून मी वेडा झालों. तुझ्या अंगप्रत्यंगांतून घुमणारा ताल बोलका करण्यासाठीं माझी लेखणी वेडी झाली. मी स्वप्नांत आहे का? तूं इथं माझ्यासमोर बसली आहेस हा भास नाहीं ना? हा समोरचा निळा सागर–हें सत्य आहे, हा वाहाणारा वारा, ह्या हिरव्या खुर्च्या, हा कॉफीचा कप–हें सत्य आहे... आणि तूं स्वप्नमयी आहेस हेंसुद्धां सत्य आहे. आणि म्हणूनच तूं इथं आहेस असा भास होतोय्. हे स्वप्नमयी, गेल्या आठवड्यांत मीं माझ्या घरीं होतों. नुकताच मी गारगार चहाचा कप मोरींत ओतून टाकला होता. वडील वरच्या खोलींत होते. जीव देण्याच्या गोष्टी करत...त्यांचं ऑपरेशन झालं होतं. त्यांचे दोन्हीं पाय कापण्यांत आले होते...इतर वेळीं पलंगाच्या कडेपर्यंत त्यांचे पाय पोंचत. ऑपरेशन झाल्यावर त्यांना घरीं आणलं पायाच्या जागीं मोकळा पलंग दिसल्यावर ते जीवाच्या आकांतानं ओरडले. पांगळा देह नाहींसा करून टाकण्याची भाषा बोलूं लागले. तो दुःखानं पोळलेला दिवस आणि आजचा हा सुखानं ओथंबणारा दिवस—

**नाना :** ...नोकरीसाठीं दिवसभर वणवण करायची...दुसऱ्या गांवीं जायचं तर तिकिटाला पैसे नसत. तहानभुकेची पर्वा न करतां मैलोगणती चालत राहायचं—

**राजा :** ...पलंगावर मोकळी जागा–आतां त्यांना कधींच खेळतां येणार नाहीं, नाहींतर त्यांनीं उत्तम खेळाडू म्हणून जगांत नांव काढलं असतं. त्यांचं तें स्वप्न संपलं. आतां लोखंडी पायाचा पांगळा मनुष्य एवढंच अस्तित्व (हळूंच खुर्चीवरून उठतो. लंगडत लंगडत फर्निचरचा आधार घेत खोलीभर फिरतो)

**नाना :** ... डोक्यांतच बिघाड आहे त्याच्या. पार कामांतून गेलाय्.

(आपल्याकडे नाना बघत आहेत हें लक्षांत येऊन राजा सावरतो)

अगदीं कामांतून गेलाय्.

**राजा :** (पाय आपटतो) मुंग्या ... मुंग्या आल्या होत्या पायाला.

**नाना :** आंघोळ केल्यावर मुंग्या जातील.

(बाहेर बागेंत चंदू येतो. राजाच्याच वयाचा. तो बाहेरची घंटी वाजवतो. राजा दार उघडायला पळतो)

दार उघडायला तसाच गेला. पारोसा – घाणेरडा —

**चंदू :** (बाहेरून) सूड ! सूड ! माजोरी राजा, शिर्क्यांनीं हा शिरकाणाचा सूड उगवला, सूड.

**राजा :** कोण चांडाळ हा आम्हांवर सूड उगवला म्हणून शिरा ताणतो आहे !

**चंदू :** (उडी मारून आंत येतो) तुझा हा हाडवैरी गणोजी शिर्के तुझ्यावर शिरा ताणतो आहे !

**राजा :** कोण, गणोजी शिर्का ? कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झालेला गणोजी शिर्का हा ? निमकहराम ! घे, घे तर घरभेदानं प्रायश्चित !...

**चंदू :** खबरदार ! मस्त मनुष्या, झुकव गर्दन पुढं !

**संभाजी :** नादान ! तुझ्या बापजाद्यांच्या राजाची छत्रपतीची ही गर्दन बादशहांच्या बादशहापुढं झुकली नाहीं ती तुझ्या सारख्या षंढापुढं झुकेल काय ? महाराष्ट्राची जाळपोळच तुला करायची असेल तर ही संभाजीची निधडी छाती तयार आहे ! खुपस तलवार !

(दोघे हंसूं लागतात. एकमेकांना मिठ्या मारतात.)

**चंदू :** हाउ डु यु फाइंड ?

**राजा :** हाउ डु यू ?

**चंदू :** वंडरफुल्.

(पुन्हा हंसतात)

**नाना :** छान नाटकं चाललीं आहेत. वेड्यांचं इस्पितळ बरं ह्यापेक्षां.

**चंदू :** नाना – नमस्कार.

**नाना :** अजून आंघोळ नाहीं ...

**राजा :** चंद्या, चहा घेणार ? मलासुद्धां घ्यायचा आहे.

**चंदू :** गाढवा, आत्तां चहा ? संध्याकाळचा चहा इतक्या लवकर ? कमाल आहे तुझी ! सगळ्यांच्या कामाचा दिवस संपत आला —

**राजा :** तुझ्या कामाचा तर दिवस संपला नाहीं ना ?

**चंदू :** एकाच ऑफिसांत असलों तरी खूप फरक आहे राजा, तुझ्या-माझ्यांत ... तूं आतां रिकामपणांत गुंतला आहेस आणि मी कामांत विश्रांति घेतोय्. कळलं ? अरे, ऑफिसांत धमाल माजलीय् तूं आला नाहींस म्हणून. तूं कुठल्याच शनिवारीं येत नाहींस. शुक्रवारीं रात्रीं तालमी चालतात आणि शनिवारीं नाटकं असतात ना तुझीं ?

**राजा :** हा सेकंड सॅटरडे आहे मिस्टर.

**चंदू :** हा सेकंड सॅटरडे नाहीं. तुला ठाऊक आहे.

**नाना :** ... सगळे एकजात आळशी. काम नको —

(नाना वर झोंपण्याच्या खोलींत जातात.)

**राजा :** चंद्या, मी विसरलोंच बघ. मला वाटलं, आज दुसरा शनिवार.

**चंदू :** गेल्या शनिवारीं तूं हेंच बडबडला होतास.

**राजा :** असं कर, ऑफिसांत म्हणावं, माझ्या आजीला गुडघी रोग झालाय्–तिच्या पायाचं ऑपरेशन झालंय्. दोन्हीं पाय कापावे लागलेत.

**चंदू :** मी सांगणार नाहीं. तुला आजी नाहीं हें ठाऊक आहे सगळ्यांना.

**राजा :** कशावरून नाहीं ?

**चंदू :** कारण ती वारली म्हणून तूं एकदां रजासुद्धां घेतली आहेस.

**राजा :** अरे, ही आजी म्हणजे वडलांची आई. वारली ती आईची आई. पाय कापलेत ती वडलांची आई.

**चंदू :** त्याच्या आधीं रजा घेतली होतीस तेव्हांसुद्धां तुझी आजी वारली होती. तुला विचारलं देखील होतं ऑफिसनं ... तूं हेंच सांगितलं होतंस तेव्हां — आईची आई आणि वडलांची आई —

**राजा :** ठीक आहे. दोन्हीं आज्या वारल्या. पण आतां जी पाय कापलेली आजी आहे ना ती वडलांची सख्खी आई. मागे वारली ती सावत्र — चालेल ?

**चंदू :** पाय कापलेली आजी चालणार नाहीं. — मूर्ख.

**राजा :** ठरलं. ही वडलांची सावत्र आई. पुढल्या वेळेला आईच्या सावत्र आईचे पाय छाटतां येतील. त्यावेळीं ती चालेल — पाय कापले तरी.

**चंदू :** मी ऑफिसांत कांहींदेखील सांगणार नाहीं. मी तुला भेटलोंच नाहीं असं समज. ऑफिसच्या कामाला इकडे आलों होतों म्हणून तुझ्याकडे वळलों. तुझ्या कुठल्याच बोलण्यावर कुणी विश्वास ठेवत नाहीं. मागं ... मागं माझ्या आईबद्दल तूं असंच कांहींतरी सांगितलंस घरीं ... आई येणार आहे तुमच्याकडे विचारायला.

**राजा :** तिला येऊन चालणार नाहीं. सांगून ठेवतों. काल रात्रींच मी बापूंना आणि आईला म्हटलं कीं तुझ्या आईचं मिस्‌कॅरेज ...

**चंदू :** म्हणजे ? ही नवीन थाप कशाला ?

**राजा :** कशाला म्हणजे ? आई तुझ्याकडे प्रेझेंट घेऊन जाणार होती तुझ्या आईसाठीं. म्हणजे त्या होणाऱ्या मुलासाठीं —

**चंदू :** तूं एक नंबरचा थापाड्या आहेस राजा ! आज दांडी मारून तूं पायावर धोंडा पाडून घेतला आहेस.

**राजा :** अरे मार गोळी. मी देईन कांहींतरी कारण —

**चंदू :** नुसत्या रजेनंच भागणार नाहीं आहे आजच्या. आणखी भानगड आहे. साहेबांनीं तुझं टेबल तपासलं सकाळीं. तुझं पोस्टेज बुक.

**राजा :** (दचकतो) केव्हां ?

**चंदू :** आज सकाळींच. तुला काय वाटलं ? तुझ्या पोस्टेज बुकांत फक्त नव्या पांच पैशाचं एकुलतं एक तिकीट होतं. साहेब म्हणाले, त्यांनीं परवां बुधवारीं तुला पन्नास रुपयांचे स्टॅंप दिले होते.

**राजा :** काय खोटं बोलतात हे साहेबलोक.

**चंदू :** चूप.

**राजा :** ... आणखीन काय तपासलं त्यांनीं ?

**चंदू :** तुझं डोकं.

**राजा :** ... कॅश तपासली का त्यांनीं ?

**चंदू :** मी जाईपर्यंत तरी नव्हती तपासली. पण तूं करतोस कशाला हीं लफडीं ?

**राजा :** लफडीं काय ? स्टँप्स्चा फक्त हिशेब लिहायचा राहिलाय्.

**चंदू :** आणि डायऱ्यांचा का कसला हिशेब ते विचारत होते. ही डायऱ्यांची काय भानगड आहे ?

**राजा :** (कपाटाकडे जात) मी सांगतो (खिशांतून किल्ली काढून कपाट उघडतो. कपाट उघडल्यावर डायऱ्या खालीं पडतात.) ह्या पहा दोनशें एकसष्ट डायऱ्या आहेत.

**चंदू :** डायऱ्या ? दोनशें —

**राजा :** दोनशें एकसष्ट डायऱ्या. ब्रह्मे सॉलिसिटर्सकडून पाठवलेल्या.

**चंदू :** ह्या दोनशें एकसष्ट डायऱ्यांचं तूं काय करणार आहेस ?

**राजा :** तूं काय केलं असतंस ?

**चंदू :** मला कळतच नाहीं कांहीं तुझं.

**राजा :** मलासुद्धां कळत नाहीं माझं. ह्या दोनशे एकसष्ट डायऱ्यांचं मी काय करणार आहे तें.

**चंदू :** (डायरीवरील पत्ता वाचतो) मेसर्स जोरवाला अँड को, न्यू दिल्ली, रॉबर्ट अँड को सॉलिसिटर्स कलकत्ता ... अरे, त्या डायऱ्या जानेवारीपूर्वी जायला हव्या होत्या.

**राजा :** हो ना. म्हणजे मग त्यांचा प्रश्न नव्हता. आतां त्यांचं काय करावं ?

**चंदू :** इथं पण, कपाटांत कशाला ह्या ?

**राजा :** पोस्टेज बुकांत तेव्हां स्टँप्स् कमी होते.

**चंदू :** कमी ? म्हणजे ? तुला काय वाटलं, स्टँप्स्च्या स्वरूपांत तुला पगाराचा कांहीं भाग मिळतो म्हणून ? राजा — (कपाटांतले कागदपत्र चिवडतो) हा — हा कचरा कसला ?

**राजा :** कसला म्हणजे ? माझीं खाजगी कागदपत्रं आहे.

**चंदू :** कागदपत्रं ? ह्या बाटल्या हें बँडेज् — (हातांत कागद घेतो) ऑं ? हा लेख कसला ? (वाचतो) संपादक, 'वनिता' —

**राजा :** (कागद ओढून घेतो) इकडे दे बघूं. खाजगी आहे तें.

**चंदू :** (पुन्हां कागद घेतो. वाचतो.) संपादक, वनिता. लेख पाठवतो आहेस ?

**राजा :** माझा नाहीं तो. आईचा आहे.

**चंदू :** (पत्र वाचतो) संपादक महाशय,...तुमच्या मासिकाची मी नियमीत वाचक आहे. 'आमचे हे' या विषयावर आपण निबंधस्पर्धा ठेवली आहे, त्यांत मी भाग घेऊं इच्छिते. शाळेंत असतांना मला नेहमीं पहिलें बक्षिस मिळत असे ... अं ... अं ... या स्पर्धेंतहि हजाराचें पहिलें बक्षिस मला मिळेल अशी आशा आहे, नाहीं, खात्री आहे. आपली—'शारदा सहस्रबुद्धे ...' हें पत्रसुद्धां तूं टाकलं नाहींस ?

**राजा :** जाने दो भैय्या...इकडे आण तें.

**चंदू :** (वाचतो.) 'ता. क. माझा मुलगाहि कांहीं लिहितो. अर्थात् अजून कुठं त्याचं लिखाण छापून आलेलं नाहीं. आपल्या मासिकासाठीं त्याचं कांहीं लिखाण मी पाठवूं का ? आपणास तें नापसंत पडलं तर—'

**राजा :** नापसंत म्हणे ! मूर्ख ... तिचाच लेख परत येईल. हजाराचं पहिलं बक्षिस. नॉन्सेन्स. (डायऱ्या कपाटांत टाकतो.) ह्या डायऱ्या बघितल्या कीं माझं डोकं फिरतं. फेकून द्याव्याशा वाटतात. उगाच इथं आणून ठेवल्या.

**चंदू :** किती दिवस इथं आहेत ह्या ?

**राजा :** नुकत्याच आणल्या आहेत. खूप दिवस त्या रेकॉर्डरूममध्यें होत्या आपल्या. धूळ खात. मला त्या फाडून टाकायच्या होत्या. पण फेकणार कुठं ते फाडलेले तुकडे ?

**चंदू :** तूं घरीं ठेव नाहींतर रेकॉर्डरूममध्यें ठेव. साहेब तुला आता सोडत नाहींत. हात धुवून ते मागं लागले आहेत तुझ्या. त्यांना सगळं कळतंय्.

**राजा :** (शेवटची डायरी कपाटांत कोंबून कपाट लावतो) लागूं देत ...तो काय करणार आहे ? मी नोकरी सोडतोय् ही भिकारडी.

**चंदू :** सोडणार ? म्हणजे राजिनामा—

**राजा :** येस्. राजिनामा. रेसिग्नेशन. पूर्णविराम. मी तर त्यांना नोटीस देणार आहे. फोनवर.

**चंदू :** नेहमीं देतोस तशी ?

**राजा :** हॅट्. ही नक्की. मी मद्रासला जातोय्.

**चंदू :** झाडू मारायला ?

**राजा :** हो. हो. झाडू मारायला...येणार ? खरं तर अशा नोकरीला लायक तूंच आहेस. गाढव...मला तिथं एस्. व्यंकटरामन्नं बोलावलं आहे.

**चंदू :** बंडल मार. हा एस्. व्यंकटरामन् कोण ?
**राजा :** तुला एवढंहि ठाऊक नाहीं ? जेमिनीचा स्टोरी रायटर व्यंकटरामन् ठाऊक नाहीं ?...त्यानं मला बोलावलं आहे. लेखक-स्क्रिप्ट रायटर म्हणून ...पुढल्या आठवड्यांत मी निघणार.
**चंदू :** तोंड बघून घे आरशांत. तुला कशाला बोलावील तो ? इंग्रजी बोलपट संपले नाहींत अजून.
**राजा :** असं ? मग बघच तूं. हें पाहा, त्याचं पत्र आलंय्. त्याला मदतनीस हवाय् म्हणून त्यानं बोलावलंय् मला.
**चंदू :** पगार काय देणार ?
**राजा :** झालं. विचारलंस ? तुम्ही कारकून म्हणजे माणसाची किंमत पगाराच्या स्केलनं करणारीं माणसं. ( रूबाबांत ) आपल्या ऑफिसांत मला मिळतो त्याच्या दसपट पगार मिळणार आहे मला.
**चंदू :** पोस्टेज स्टॅंप धरून ?
**राजा :** हो हो. पोस्टेज स्टॅंप धरून.—बेशरम. आतां बघतच राहा तूं यश यश आणि यश ... ऑपेरा हाउसला नवं पिक्चर लागणार ... मोठमोठे बोर्ड ... स्टोरी बाय्—
**चंदू :** ( बायग्राऊंड म्युझिकसारखा आवाज काढत ) टा–रा...रा...रा–
**राजा :** एस्. राजा. डायरेक्टेड बाय्—
**चंदू :** टा ... रा ... रा ... रा ... रा ...
**राजा :** राज सहस्रबुद्धे, प्रोड्यूसड् बाय्—
**चंदू :** टा... रा... रा... टा... रा ... रा ... रा...
**राजा :** आर्. सहस्रबुद्धे.
**चंदू :** टा... रा... रा... रा ... रा...
**राजा :** राजा सहस्रबुद्धे ... आर्–एस् प्रॉडक्शन प्रेझेंटस् ... ठण् ... ऑपेरा हाऊसच्या आवारांत जमलेली गर्दी ... मी, एस्. व्यंकटरामन्, काळ्याभोर मोठ्या डोळ्यांची, पुष्ट शरीराची हंसरीनाचरी नटी ... गर्दी... गर्दी ... अलोट गर्दी ... पंधरावा आठवडा ... हाऊस फुल् ... पंचवीस आठवडे ... हाऊस फुल् ... पन्नास आठवडे ... हाऊस फुल् ... शंभर आठवडे —
**चंदू :** ऑपेरा हाऊस फुल् ...

**राजा :** गर्दी हटतच नाहीं ... तिकीट मिळत नाहीं ... थिएटरच्या कराराप्रमाणें पिक्चर हलवायला पाहिजे, पण प्रेक्षक हलत नाहींत, ऐकत नाहींत ... गर्दी ...

**चंदू :** तुला लागलंय् वेड.

**राजा :** वेड ? तूंच वेडा आहेस. चंदूशेखर महाशब्दे, तूंच वेडा आहेस. ठार वेडा —

**चंदू :** ( खिशांतून ब्राटली काढतो ) ... आतां तुला ह्या गोळ्या नको असतील, नाहीं ?

**राजा :** कसल्या ?

**चंदू :** विसरलास ? धुंदफुंद गोळ्या ... वशीकरण गोळ्या. तुला मागं मी म्हटलं होतं —

**राजा :** ( बाटली घेऊन ) पाहूं दे मला ... ( बाटली उघडतो ) कशा लागतात ह्या ?

**चंदू :** जपून.

**राजा :** तुला कुठून मिळाल्या ?

**चंदू :** दिल्या एका दोस्तानं ... हॉंगकॉंगहून आणल्या आहेत त्यानं.

**राजा :** ह्या ॲस्प्रोच्या गोळ्या आहेत. म्हणे, हॉंगकॉंगहून आणल्या. पैज.

**चंदू :** चल – पैज ... काय पडलं असेल ह्या गोळ्यांना ?

**राजा :** सांग ना तूंच.

**चंदू :** एका गोळीला दोन रुपये दोन आणे —

**राजा :** मला दोन हव्या आहेत.

**चंदू :** कशाला ? ... आय् मीन् – कुणासाठीं ?

**राजा :** माल्‌ —

**चंदू :** म्हणजे ?

**राजा :** ती आज सकाळीं येणार आहे —

**चंदू :** सकाळ होऊन गेली. दुपारीं येणार असेल चहाला.

**राजा :** ( बाटली ठेवतो. ) तिला आधीं मी भेटणार आहे – ती दुपारीं चहाला येणार आहे ना, त्याच्या आधीं. म्हणून तर तिला मी सकाळीं बोलावलंय्. मी भेटायच्या आधीं तिला जर आमचे तीर्थरूप भेटले तर

सगळं सोडून मला तीर्थयात्रेला जावं लागेल. तिला मी सांगितलंय् — माझे वडील नेव्हींत ऑफिसर आहेत.

**चंदू :** नेव्हींत ?

**राजा :** ( गडबडींत हॉलकडे जातो ) हो. नेव्हींत ... खूप मोठे ऑफिसर आहेत ... आमच्याकडे फोन आहे, तिला पटायला कांहीं हरकत नाहीं.

**चंदू :** टेलिफोन कंपनींतल्या लहानशा साहेबालासुद्धां लहानसा टेलिफोन मिळतो हें तिला ठाऊक असेल.

**राजा :** तिला हें नाहीं ठाऊक. नाहीं ... नाहीं ... नाहीं. ए, तो कचरा जरा आंत टाक ना चंद्या —

( राजा माडीवर पळतो. चंदू आवराआवर करतो. बाटली दिसते. बाटली उचलतो, इतक्यांत राजा हातांत कपडे घेऊन जिन्यावर उभा राहातो. राजा खालीं येऊं लागतो तशी चंदू बाटली ठेवतो. )

**चंदू :** ती किती वाजतां येणार आहे ?

**राजा :** ( भराभर कपडे घालतो ) पंधरावीस मिनिटांत येईल ती ... त्या धुंदफुंद गोळ्या कुठं आहेत ?

**चंदू :** ह्या काय कपाटावर ... तिला आत्तांच एखादी गोळी देणार आहेस कीं काय ?

**राजा :** येस्. पाहयचंय्.

**चंदू :** काय ?

**राजा :** ती सगळं कांहीं विसरून माझं सगळं कांहीं ऐकतेय् का तें पाह्यचंय् मला. आता वेळ कुठंय् मला ... संध्याकाळीं मला पुन्हां अलका गांगुलीबरोबर जायचंय् ... रिहर्सल्ला.

**चंदू :** नाना काय म्हणतात हल्लीं ? रात्रीं मुकाट्यानं घरांत शिरतां येतं कां ?

**राजा :** गेले दोन दिवस हैराण आहेत खोकल्यानं ... डोळ्याला डोळा नाहीं त्यांचा. अलका गांगुलीबरोबर रिहर्सल म्हणजे उशीर होतो —

**चंदू :** तुझं कांहीं कळतच नाहीं, राजा ... कुणाशीं लग्न करणार तूं शेवटीं ?

**राजा :** चंदू, हा...हा प्रश्न अगदी वैयक्तिक आहे.

**चंदू :** तुला दोघींबरोबर कांहीं एकदम लग्न करतां येणार नाहीं. मालूबरोबर आणि अलकाबरोबर.

**राजा :** पैज लावतोस ?

**चंदू :** चक्रम ! अरे खरंच राजा, तुझ्याजवळ ती साहेबासारखी एंगेजमेंट रिंग होती, तिचं काय झालं ? ती कुणाच्या बोटांत बसणार आहे ?

**राजा :** तोच तर वांधा उभा राहिला आहे ... त्यासाठींच खरं म्हटलं तर मालू येणार आहे ... अर्थात् आली तर ! तिच्याजवळ ती आंगठी आहे सध्यां. तिच्या बोटांतून ती आंगठी काढायची हें पहिलं काम – महत्त्वाचं —

**चंदू :** कुणासाठीं ती काढायची आंगठी ?

**राजा :** अलका गांगुलीसाठीं.

**चंदू :** म्हणजे ?

**राजा :** म्हणजे काय ? अगदीं सोपी, साधी गोष्ट आहे. ती आंगठी खरं म्हणजे अलका गांगुलीचीच. तिच्याकडून मी ती मिळवली आणि फसत्या क्षणीं ती मालूला दिली. आतां अलका गांगुलीला ती परत हवी आहे; आणि मालू कांहीं ती परत देत नाहीं.

**चंदू :** सहाजिकच आहे.

**राजा :** मीं अलकाला म्हटलं ती सोनाराकडे दुरुस्तीला टाकली आहे— त्यांतला खडा बसवायला. तिला ती आंगठी तरी दिली पाहिजे, नाहींतर मला जाब तरी दिला पाहिजे. अरे तिनं त्या आंगठीचे पैसे मागितले तर काय करायचं ? धुंदफुंद गोळ्यांनीं मालू कबूल झाली तरच सुटेन.

**चंदू :** राजा, तूं आतां मद्रासलाच पळ —

**राजा :** ( कपडे घालत. पॅटमध्यें शर्ट खोंचत ) त्या गोळ्यांचा परिणाम होईल का मालूवर ? खात्री आहे तुझी ?

**चंदू :** बघ बाबा प्रयत्न करून.

**राजा :** प्रयत्न करून ? कितीदां आणि कितीतरी तऱ्हेनं मी प्रयत्न केलेत. तिला कांहीं कळत नाहीं कीं समजत नाहीं... ती थंडपणानं बसून राहाते आणि पर्समधून कांहींतरी काढून खात बसते... चॉकलेट म्हण, सुकामेवा म्हण,–कांहीं नाहीं तर संत्रीं, केळीं, मुसुंबें–अननस आणि फणससुद्धां.

**चंदू :** पण तूं तिला वचन तरी कसं दिलंस ? – मधुराणी काय वाईट आहे ?

**राजा :** मधुराणीचं नांव काढूं नकोस. गेल्या कित्येक महिन्यांत तिचं नखसुद्धां पाहिलं नाहीं मीं... ती बंगलोरला कीं कुठं गेलीय् —

**चंदू :** ती बंगलोरहून कीं कुठून परत आलीय्. सकाळींच आज दर्शन घडलं तिचं बसस्टॉपवर.

**राजा :** कोण ? मधुराणी ?

**चंदू :** हो... हो... तीच कुप्रसिद्ध मधुराणी— एक्स्ट्रॉ नटी. तीच पूर्वीची जार्जेटची साडी आणि भडक रंगाचा ब्लाऊज... तिला आतां कुणीतरी नवी साडी घ्यायला हवी हं.

**राजा :** कांहीं म्हणाली ती माझ्याबद्दल ?

**चंदू :** मी बसमध्यें चढतांना दिसली ती रांगेंत. नुसतं 'काय बरंय ना' झालं.

( बाहेर बागेंत माल्ह येते. हातांत मोठी पर्स. दारावरची घंटी वाजवते. )

**राजा :** माल्ह ... ही माल्हच ... माल्हच आली. गोळ्या कुठं आहेत ?

( खिशांत बाटली टाकतो. चंदू दाराकडे जातो. )

**चंदू :** मी जातो आतां ... उशीर झालाय् ... साहेब लाथ मारायचा.

**राजा :** ( दाराकडे जात ) थांब रे थोडा – जाशील कंटाळून. तूं जर आतां निघून गेलास आणि तिला कळलं मी एकटाच घरांत आहे तर ती आल्या पावलीच परत जाईल.

**चंदू :** पण उशीर झालाय् रे.

**राजा :** तिच्याशीं थोडासा बोल आणि मग लगेच जा – ( दार उघडतो. माल्ह येते. ) हॅलो माल्ह —

**माल्ह :** राजा – ऑं – चंदू ?

( चंदू तिला डोळ्यांनीं खूण करतो. माल्ह इकडेतिकडे बघते. )

छान आहे तुझी जागा. हा सोफासेट, खुर्च्या, हें कपाट —

**राजा :** कपाट ना ? तें कपाट, माल्ह, मीच बनवलंय्.

( चंदू चाट पडतो )

**माल्ह :** खरंच ? राजा, तूं बनवलंस ? ... तुझ्या अंगांत असली कांहीं कला आहे हें ठाऊक नव्हतं मला.

**राजा :** तुला ठाऊक नव्हतं ? घरांतलं हें एकूण एक फर्निचर मींच बनवलंय्.

( माल्हला संशय येतो. चंदू खोकतो. )

**चंदू :** मला वाटतं, जावं मीं आतां ... खूप उशीर झालाय्.

**माल्ह :** मी आल्यामुळं निघाला नाहींस ना ?

**चंदू :** नाहीं, नाहीं, इकडे ऑफिसच्या कामासाठीं आलों होतों, तसाच राजाकडे वळलों. आतां वेळ झालीय् जायची. – अच्छा.

**राजा :** अच्छा —

**चंदू :** ( मालूला ) बराय् —

**मालू :** बराय – राजा, तुझी बहीण आहे ना घरांत ?

**चंदू :** ( दाराशीं जातां जातां थांबतो ) बहीण ? राजाला बहीण आहे ?

( राजा चंदूला जायची खूण करतो. चंदू जातो. )

**राजा :** अं ? ... बरं झालं मालू, विचारलंस ते बहिणीबद्दल.

**मालू :** कां ? काय झालं ?

**राजा :** खालीं बस आधीं ... तूं दुपारीं ठरल्याप्रमाणं येणार ना चहाला ? – म्हणजे आईला तुला बघतां येईल —

**मालू :** येईन ना. कां ?

**राजा :** कारण तुला मला कांहीं सांगायचंय्. तूं इथं चहाला यायच्या आधीं.

**मालू :** काय सांगायचंय ?

**राजा :** तें आपलं मागलं बोलणं – तूं म्हणालीस, तुझ्यावर माझं प्रेम आहे– मी चोर, डाकू कुणीहि असलों तरी—

**मालू :** बरं. मग ?

**राजा :** मी अगदीं खुनी असलों तरीसुद्धां—

**मालू :** हो...हो. बरं. मग म्हणणं काय आहे तुझं ?

**राजा :** मला त्याच तुझ्या प्रेमाची परीक्षा घ्यायची आहे. मला पाह्यचं आहे – मी सांगणार आहे तें ऐकल्यावर तुझं मत बदलतंय् का...तुला ठाऊक आहे – मला नेहमीं कल्पना सुचत असतात...खूप...वाट्टेल त्या.

**मालू :** तुला सुचायलाच हव्यात कल्पना गोष्टी लिहायच्या तर. हो कीं नाहीं ?

**राजा :** हं...तर काय म्हणत होतों मी ? हं...तर मी कथालेखक असल्या-मुळं मला नेहमीं कल्पना सुचत असतात...वेगवेगळ्या...त्या कल्पनांचा हात धरून मी भटकत राहातो...वेगवेगळ्या देशांत...वेगवेगळ्या वेषांत ...पण मालू, आपल्याला लग्न करायचं झालं तर...ती झोंपडी...त्या झोंपडींतला मी छोटासा राजा आणि तूं छोटीशी राणी...समोरचं छोटसं तळं...तें सगळं विसरून गेलं पाहिजे आपल्याला मालू.

**मालू :** विसरून ?

**राजा :** हो. खरं बोलायचं तर विसरून गेलं पाहिजे.

**मालू :** म्हणजे – राजा, त्या सगळ्या थापा होत्या ?

**राजा :** थापा म्हणजे अगदीं थापा अशा नाहींत, पण – कल्पनेचा हात धरून भटकणाऱ्या माणसाला हे असले देश भेटतात…आतां उदाहरणच द्यायचं झालं तर – माझ्या वडलांबद्दल मीं तुला काय सांगितलं होतं ? – ते नेव्हींत कॅप्टन् आहेत म्हणून—

**मालू :** म्हणजे ते कॅप्टन् नाहींत ? मग कोण आहेत ते नेव्हींत ?

**राजा :** ते कॅप्टन नाहींत आणि नेव्हींतसुद्धां नाहींत.

**मालू :** मग ते काय करतात ?

**राजा :** ते टेलिफोन कंपनींत नोकरीला आहेत. वर्कशॉप सुपरिंटेंडेंट का कुणीसे.

**मालू :** आणि तूं म्हणाला होतास – बेचाळीसच्या लढ्यांत त्यांनीं भाग घेतला होता, ते अंडरग्राऊंड होते यशवंतराव चव्हाणांबरोबर ? हेंसुद्धां सगळं खोटं ?

**राजा :** खोटंच. ( मालू दूर होते ) – रागावलीस ?

**मालू :** छेः रागावूं कशाला ? पण खट्टू झालें जराशी…तुला लाज वाटते वडलांची ? चारचौघांना मिळणारी नोकरी करतात म्हणून ?

**राजा :** नाही. कां ?

**मालू :** मग थापा कां मारल्यास राजा ? सगळं सांगून टाक आतां. बेचाळीसच्या लढ्यांत त्यांना भाग घेता आला नसेल, चार माणसांचं भित्रं आयुष्य काढलं असेल त्यांनीं–( एकदम ) राजा, पण तेव्हां ते कोण होते ?

**राजा :** ते…कुणीच नव्हते…म्हणजे तसा त्यांना खूप भाग घ्यायचा होता– बॉंब टाकण्यांत, रूळ उखडवून टाकण्यांत पण प्रकृतीमुळं त्यांना जमलं नाहीं…त्यांच्या गुडघ्याला—

**मालू :** –त्यांच्या गुडघ्याला गोळी लागली म्हणून तूं सांगितलं होतंस– त्याच लढ्यांत.

**राजा :** अं ?…हो…आज सगळं सांगून टाकतो…तुला मी आमच्याकडे पक्षी आहेत म्हणून सांगितलं होतं–पण आमच्याकडे पाळलेले पक्षी नाहींत आणि सयामी मांजरंसुद्धां नाहींत…तुला मागं मीं तसं सांगितलं होतं…मला पेट्सबद्दलचं एक पुस्तक तेव्हां मिळालं होतं वाचायला…आणि…आणि हें फर्निचरसुद्धां मीं बनवलेलं नाहीं…एकसुद्धां नाहीं. कुठलंच नाहीं…

**माल्ू :** आणखी काय काय थापा मारल्यास तूं राजा ? त्यांतली एकसुद्धां थाप खरी नव्हती ?

**राजा :** खरी थाप थापच असते...आणि थाप कधींच खरी नसते.

**माल्‌ू :** तुझी बहीण—

**राजा :** बहीण ?

**माल्‌ू :** आतां आपल्याला बहीण नाहीं म्हणून सांगूं नकोस.

**राजा :** बरं, नाहीं सांगत, म्हणतेस तर. पण गोष्ट खरी आहे.

**माल्‌ू :** म्हणजे ? तुला बहीणच नाहीं ?

**राजा :** नाहीं. म्हणजे तशी होती, पण ती वारली. लहानपणींच वारली... माल्‌ू, दुपारीं येशील ना चहाला त्यावेळीं किनई, आई–वडील कुणीच कांहीं बोलणार नाहींत तिच्याबद्दल...आपल्याला मुलगी नव्हतीच अशी समजूत करून घेतलीय् दोघांनीं...बिच्चारे. ती खूप गोड होती म्हणतात...खूप लाडकी होती दोघांनीं...वारली, आणि त्याचा परिणाम झाला दोघांवर (माल्‌ू गप्पच.)...माल्‌ू, ए माल्‌ू–तुझ्याकडे पाहयलं कीं मला तिची आठवण होते...तूं आज संध्याकाळीं आली नाहींस तर मी ओळखूं शकतों तुझी भावना...तुझ्या मनाला मी इतक्या यातना दिल्या आहेत आतां. पण माल्‌ू, तुला खोट्या स्वप्नांत ठेवण्यांत काय अर्थ होता ?...माल्‌ू, तुला मी खरंच साजेसा नाहीं. मुळींच साजेसा नाहीं...तुला दिलेली आंगठी तूं परत दिलीस तरी चालेल...तूं आंगठी परतच करून टाक...खरंच परत कर... मला एवढी ही शिक्षा हवीच आहे...मी कांहीं बोलणार नाहीं तुला.

**माल्‌ू :** (राजाच्या जवळ जात) असा त्रागा नको करूंस रे. मी सगळं कांहीं विसरलेंय्—

**राजा :** (गोंधळतो) माल्‌ू–

**माल्‌ू :** शप्पत राजा. मी सगळं विसरलेय्...मला फक्त तूं एक वचन दे. देशील ?

**राजा :** थापा न मारण्याचं ? खोटं न बोलण्याचं ना ? (माल्‌ू मानेनं 'हो' म्हणते.) तुला मी यापुढं कधीच थापा मारणार नाहीं... कधींच नाहीं. वचन देतो. तुला आणखी एक सांगायचंय्, माल्‌ू. मला एक आजोबा आहेत–खरंच आहेत.

**माल्‌ू :** माझा विश्वास आहे तुझ्यावर. त्यांचं काय ?

**राजा :** ते आंधळे आहेत, त्यांना दिसतं नाहीं असं मी तुला कदाचित् म्हटलं असेन...पण...वयामुळं त्यांना कमी दिसतं हें खरं, पण...आणि त्यांना ऐकूंसुद्धां मुळींच येत नाहीं...तेव्हां मीं हें सांगितलं नसेल...म्हणजे तसं त्यांना ऐकूं येतं, पण अगदीं स्वच्छ–तुला मला येतं तसं नाहीं....आतां उदाहरणच द्यायचं तर...म्हणजे समजा, बाहेर तोफेचा आवाज झाला तर तो त्यांना ऐकूं येईल, पण ते विचारतील–दारावर ‘टक्–टक्’ कुणी केलं.

**मालू :** कुठं आहेत तुझे आजोबा ?

**राजा :** ते वर पडले आहेत आतां...कदाचित् त्यांच्या पायाचं ऑपरेशन करावं लागेल–पाय कापावाच लागेल बहुतेक.

**मालू :** बिचारे.

**राजा :** मालू, तूं कांहीं घेणार ? चहा...कॉफी ?

**मालू :** नको.

**राजा :** जरासा चहा...( कपाटाकडे जातो. खिशांतल्या बाटलींतून गोळी काढून घेतो. एका ग्लासांत सरबत ओततो )–सरबत चालेल तुला ?

**मालू :** बरं चालेल.

**राजा :** मी आयुष्याच्या नव्या पानाला सुरुवात करतोय् मालू. ( सरबतांत गोळी टाकतो. )...हं हें घे–( टेबलावर ग्लास ठेवतो )

**मालू :** राजा जाऊं दे. नव्या पानावर आपण चांगलं कांहींतरी बोलूं. आपल्या छोट्या झोंपडीबद्दल—

**राजा :** छोट्या दुनियेबद्दल–( सरबताचें ग्लास मालूजवळ देतो. )

**मालू :** अरे, मीं काल एक सुरेख कापड पाहिलं. आपल्या घराच्या पडद्यांसाठीं...तुला खूप आवडेल. बदामी रंगाचं आणि त्यावर खारी काढल्या आहेत. गोजिरवाण्या.

**राजा :** किती सुरेख दिसेल, मालू. ( मालू सरबत पिऊं लागते ) मालू, तूं माझी आहेस ना ?

**मालू :** हो रे, तुझीच आहे मी. सगळीच्या सगळी तुझी. ( सरबताचा घोट घेते )

**राजा :** शप्पत ?

**मालू :** शप्पत.

**राजा :** तुला लग्न करावंसं वाटतं माझ्याशीं ?

(मालू पर्समधून संत्र काढते, सोलते. खाऊं लागते.)

**मालू :** दिवसाच्या प्रत्येक घडीला मी त्याचाच विचार करीत असते.

**राजा :** मालू...मालू...तूं दुसऱ्या कुणाच्या – कुणाच्याच प्रेमांत नको पडूंस ग.

**मालू :** अंहः...राजा, आपल्या झोंपडीबद्दल बोल ना.

**राजा :** (स्वप्नांत) झोंपडी. छोटीश्शी झोंपडी...

**मालू :** छोटीश्शी झोंपडी...आणि समोर छोटस्सं तळं...आरशासारखं... फुललेल्या कमळांचीं हंसणारीं असंख्य प्रतिबिंबं...झोंपडीच्या मागं सारवलेलं अंगण. तिथं एक आंब्याचं गर्द छायेचं झाड....राजा, त्या झाडाला आपण झोका बांधायचा...उन्हाळ्यांत अंगणांत खुर्च्या टाकून बसायचं...शरदांतलं चांदणं तिथं सांडलं कीं ते पसापसा भरून घ्यायचं...आणि राजा, तळ्यांत सुद्धां चांदणं पडेल. नाहीं ?...पण त्या चांदण्याला पाण्यांत विरघळतां नाहीं येणार. सगळीकडे कमळं आणि कमळांचीं प्रतिबिंबं असतील ना.

**राजा :** तुला तळ्याची भीति वाटत नाहीं ?

**मालू :** वाटते ना. आपल्या चिमण्यांना तिथं तळ्याजवळ सोडायचं नाहीं हं.

**राजा :** मुळींच सोडायचं नाहीं. समजा, पडलीं बिडलीं—

**मालू :** (राजाच्या तोंडावर हात ठेवते) असं कांहीं बोलायचं नाहीं हं... मग राजा, तळं नकोच आपल्याला. आपण आपली एक विहीरच बांधू मागल्या बाजूला. मला पाणी काढतां येईल अशी...पाणी काढतांना मी गाणीं गाईन.

**राजा :** गाणीं ? कसली ?

**मालू :** तूंच सांग...

**राजा :** मला नाहीं सांगतां येत.

**मालू :** ...आपल्या सुखी संसाराचीं गाणीं मी गाणार आहे. आपल्या प्रीतीचीं गाणीं...

**राजा :** मालू, माणसानं फार प्रेम करूं नये.

**मालू :** खरं प्रेम थोडं आणि फार हीं मापं जाणतच नाहीं राजा. खरं ना ?

**राजा :** हो—

**मालू :** राजा, आपण लग्न करायचं. लौकर,

**राजा :** आँ ?...हो...लौकरच करूं.
**मालू :** अगदीं लौकर.
**राजा :** हं–( तिचा हात हातांत घेतो. )
**मालू :** राजा, उत्तर देतांना थांबतोस आणि इकडे हातपण धरतोस.
**राजा :** तुला आवडत नाहीं ?
**मालू :** आवडतं ना, पण—
**राजा :** पण काय ?...मालू, तूं तें सरबत पिऊन टाक बघूं आधीं—
**मालू :** राजा, तुला संत्र हवंय् ?
(राजा रागानं तिच्या हातांतलं संत्र फेकतो, पर्स पडते, संत्रींहि पडतात खालीं)
**राजा :** सारखं तुझं खाणं–संत्रीं—
**मालू :** राजा—
**राजा :** माफ कर मालू...आजची सकाळ इतकी वाईट गेलीय्—
**मालू :** कां ? काय झालं ?
**राजा :** तसं कांहीं नाहीं ग. नेहमींचंच ... घरच्या कटकटी ... डोकं दुखतंय् माझं —
**मालू :** तूं डॉक्टरकडे जा नं राजा —
**राजा :** कांहीं नको डॉक्टर —
**मालू :** हात अगदीं चिकट झालेत माझे —
**राजा :** इथं टाक कशाला तरी पुसून – नाहींतर आंत बाथरूममध्यें जा—
(मालू आंत जाते. राजा सरबतांत आणखी गोळी टाकतो. टेलिफोन वाजतो.)

**राजा :** हो ... सहस्रबुद्धे. कोण हवंय् ? बापू ? ... ओह् –सॉरी...सॉरी... कोण ? साहेब ? ... येस् सर ... मी माझा ... मला ॲक्सिडेंट झालाय्... सकाळींच ... आँ ? उकळतं पाणी सांडलं ... पायावर...हो ... उकळतं... पाय बांधलाय्...तें ना ? तसं त्यांत कांहींच हें नाहीं ... पुष्कळसे आंकडे... — हो हिशेब राहिले आहेत त्यांत लिहायचे ... ते लिहिले कीं जमेल आंकडा ... आँ ?...हो. माझ्या सगळं लक्षांत आहे ... मी ना ? मीं टिपून ठेवलें आहेत वेगळे ... माझ्या पद्धतीनं ... हो, वेगळी पद्धत ठेवली होती मीं ... नाहीं, नाहीं, सोपी पडावी म्हणून. तसं नाहीं ... मुळींच नाहीं ...

छे: नाहीं, नाहीं ... सोमवारीं ना ? होहो ... येईन ना मी ... बरं वाटेल तोपर्यंत. पाणी फार उकळतं नव्हतं म्हणजे भाजण्यासारखं होतं ... नक्की येतोंय् मी ... सकाळीं थोडासा आधींच येईन मी ... थॅंक्यू...अच्छा... बाय् ... ( रिसिव्हर ठेवतो. स्वतःशींच ) हें पहा सर, मला जास्त कांहीं सांगायचं नाहीं. एस्. व्यंकटरामन् बरोबर माझा सगळा ठराव झालाय्... कळवीनच मी तुम्हांला. ( टेलिफोन उचलतो. ) हॅलो, ब्रह्मे सॉलिसिटर्स ? ... सॉरी ...पण पार्टनरशिप म्हटली कीं ऑं !...पण माझा कल आहे दुसरीकडे ... तुमच्याकडे पैसे गुंतवायचे ... नाहीं, नाहीं, आवडेल ना मला, पण सगळा व्यवहार सांभाळायचा म्हणजे...कसं जमणार हो ? ...नाहीं, नाहीं, तुमचं प्रपोजल मान्य आहे मला...कबूल आहे. तुमचा पॉईंट बरोबर आहे...तुम्ही म्हणतां,–थोडं जमिनीवर यावं म्हणून. ...पण इथं जमिनीवर येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं...कांहीं माणसांना आकाशांतच राहायला आवडतं तारे म्हणून...ते तिथंच चमकतात... जमिनीवर आले कीं ते दगड होतात...शोधूनसुद्धां मिळत नाहींत...अच्छा ...पत्र टाका अधूनमधून...हो...हो...नुसतं केअर ऑफ ‘ जेमिनी स्टुडिओ ’ –( राजा थांबतो. माल्ू बाहेर येते. ) ... डॉक्टर, पाय कापायला हवाच असेल तर...नाइलाज आहे. केलंच पाहिजे ऑपरेशन् ( फोन ठेवतो. हॉलमध्यें बघतो. स्वतःशींच )...जमिनीवर येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं...कांहीं माणसांना आकाशांतच राहायला आवडतं...तारे म्हणून...

( राजाला आत्मविश्वास येतो. तो माल्ूकडे वळत असतांनाच )

● पडदा पडतो ●

# २

(त्याच शनिवारची दुपार. नाना चहा घेत बसले आहेत. बराच वेळ त्यांचं चहापान चाललं असावं. राजा टेलिफोनजवळ उभा आहे.)

**राजा :** (टेलिफोनवर) चंदू , हं...हो. मी राजा बोलतोय्...एक काम करशील ?...हो...हो...थँक्यू...नाहीं, नाहीं, अल्का. अल्का गांगुली... अरे लग्नाच्या बेडींतली रश्मि...हो तीच. तिला तूं भेट...कुठंहि भेट रे... ती आतां येणार आहे माझ्याकडे...येऊं दे काय ? ती येणार आहे आंगठी मागायला. आंगठी आहे रे माझ्याजवळ...पण ती आहे मालूच्या बोटांत ...ऑं ? त्या काय – अॅस्प्रोच्या गोळ्या होत्या. मी म्हटलं नव्हतं ?...छेः ...फक्त तिचं डोकं थांबलं दुखायचं. तें जाऊं दे...तूं अल्का गांगुलीला गांठ...ती इथं येतां कामा नये. काय वाट्टेल तें कर...तिला मीं म्हटलंय् आंगठी सोनाराकडे टाकलीय् खडा बसवायला...जा रे...कांहीं तरी सांग तूं...बरं...कबूल ( रिसीव्हर आपटून पिन्वर ठेवतो )

[ मालू, बापू आणि शारदाबाई वरून येतात ]

**मालू :** नाहीं, अजून तारीखबिरीख ठरली नाहीं. कांहीं दिवस थांबायचं ठरवलंय् आम्हीं.

**बापू :** लग्न झाल्यावर कशावर जगायचं ठरवलंय् तुम्हीं ? एक दमडी सुद्धां मिळवायची अक्कल नाहीं त्याला. त्याला एक देखील गोष्ट कळत नाहीं साली.

**नाना :** ( स्वतःशींच )...तेव्हांची गोष्टच वेगळी होती. लोकांचा एकमेकांवर भरंवसा होता. उधारीवर चार वस्तू आणतां येत होत्या. गरजा कमी होत्या. न परवडणारी गोष्ट घेतां येत नसे, घेतली जात नसे, कुणी कुणाचं न्यून काढून हंसत नसे.

**शारदा :** नाना, तुमचा चहा आटपला नाहीं अजून ?

**बापू :** ( माल्ूला ) कशावर जगणार–कुठं राहाणार ? कांहीं विचार केलाय् तुम्हीं ?

**माल्ू :** एकाद्या सबर्बमध्यें जागा घेणार आहोंत आम्हीं – कमी भाड्याची अशी.

**बापू :** सबर्ब ? समोरच्या रस्त्यापलिकडे नुसत्या जागेची चौकशी करायची त्याची हिंमत नाहीं साली. तो काय जागा मिळवणार सबर्बमध्यें ?

**माल्ू :** खरं तर इतके दिवस थांबणं मला पसंत नाहीं, पण दुसरा इलाजच नाहीं.

**बापू :** साल्या इलाजापलिकडे तो गेलाय्. थांबलीस तर जन्मभर थांबावं लागेल. तो खवीस मरेपर्यंत साला एकटा राहाणार आहे...बघ...बघ त्याच्याकडे...दाढी काय वाढलीय्—

**शारदा :** ( नानांना ) नाना, झालं कीं नाहीं तुमचं ?

**नाना :** मला मुळींच घाई आवडत नाहीं हें ठाऊक आहे, पण सारखी तिची घाई. नेहमीं घाई...आज जरा छातींत बरं नाहीं तर—

**माल्ू :** ( बापूंना ) राजा म्हणत होता खरा नानांना बरं नाहीं म्हणून.

**बापू :** त्याचं कांहीं ऐकूं नकोस तूं. तो वाटेल तें बडबडतो. (राजा खोकतो) राजा, फोनजवळ काय चाललंय् तुझं ? कंपनीनं साला फोन दिलाय् बापाला आणि वापरणार हा कारटा...राजा, टेलिफोन करून करून तुझं सालं थोबाड टेलिफोनसारखं दिसायला लागलंय्...कुणाशीं बोलत होतास ?

**राजा :** चंदू...चंदूशीं.

**बापू :** त्याला काय हवंय् ?

**राजा :** त्याला कुठं काय हवंय् ?

**बापू :** त्याला कांहीं नकोय् म्हणून फोन केला त्यानं ?

**शारदा :** आई कशी आहे रे राजा, त्याची ?

**राजा :** आई ना ? म्हणजे चंदूची आई ना ? छान आहे. सुधारतेय्—

**माल्ू :** चंदूची आई ? आजारी होती ?

**बापू :** ह्यानंच साली रचलेली गोष्ट आहे ती. प्रत्येक वेळीं आला कीं साली नवी थाप घेऊन येतो.

**राजा :** ( सांवरतो ) नाहीं. पण आतां ती बरी आहे–चंदूची आई—

**बापू :** तुझ्या साल्या बोलण्यावर कुणी विश्वास ठेवणार नाहीं...आणि राजा, तुला सांगून ठेवतो. इथं माझ्यासमोर खिशांत हात घालून उभा राहात जाऊं नकोस तूं. माझं डोकं फिरतं...हं उभा राहा. आणि सांग – तुला हिच्याशीं लग्न करायचं आहे कीं नाहीं ?...खिशांत हात घालूं नकोस.

**नाना :** खिसेच शिवून टाकले पाहिजेत मशीनवर. त्याशिवाय संवय जात नाहीं माणसाची. शारदेला सांगितलं पाहिजे खिसे शिवायला.

**बापू :** राजा, प्रश्नाचं उत्तर हवंय् मला.

**नाना :** एक सुई आणि दोरा. बारीक शिवण घालायची. पुन्हां हात जायचा नाहीं खिशांत...

**शारदा :** तुमचा चहा झाला का नाना ? जरा लवकर आटपा ना—

**नाना :** घाई घाई – सदा घाई. मला मुळींच सहन होत नाहीं घाई...हॅः कंटाळलों बुवा—

**शारदा :** ( टेबल स्वच्छ करीत ) तुमच्या मनासारखं करा. झालं ?

**मालू :** मी येऊं का मदतीला ?

**शारदा :** नको...राहूं दे... ( एक कप उचलत ) चुकूनसुद्धां राजा हात लावत नाहीं कधीं कामाला. उष्टा कप तस्सा राहील त्याचा. कधीं धुणार नाहीं तो.

**बापू :** अंगसुद्धां धूत नाहीं तो. कप कुठला धुवायला ?

**मालू :** मी येतें ना मदतीला...

[ मालू आणि शारदाबाई आंत स्वयंपाकघरांत जातात. कांहीं वेळ शांतता ]

**बापू :** मुलगी चांगली वाटतेय्...नोकरीबिकरी करते ?

**राजा :** हो.

**बापू :** कुठं ?

**राजा :** रेल्वेंत.

**बापू :** टायपिस्ट ?

**राजा :** अं ? हो...शॉर्टहॅंड टायपिस्ट.

**बापू :** तुझी तिची कुठली ओळख ?

**राजा :** तिची मैत्रिण आमच्या नाटकांत काम करायची.

**बापू :** ही राहाते कुठं ?

**राजा :** खारला.

**बापू :** ( थांबून ) हं...तर तुम्हीं लग्न करायचं ठरवलंय्.

**राजा :** अं ? हो...असा विचार चाललाय्.

**बापू :** दोनाचे साले चार हात होणार.

**राजा :** ( गोंधळतो ) अं...हो.

**बापू :** तीच म्हणत होती. तूं कधीं बोलतोस ?

**राजा :** नाहीं, मला बोलायचं होतंच, पण...आईला, नानांना कल्पना होती.

**बापू :** आणि मला साधं साले ठाऊक नव्हतं.

**राजा :** मला वाटलं, ठाऊक असेल.

**बापू :** पण लग्न करण्याइतका तूं अजून – म्हणजे, तसा अजून तूं लहानच आहेस.

**राजा :** थांबणार आहे मी कांहीं वर्षं —

**बापू :** पण मालू म्हणतेय् तिला असं थांबणं फारसं पसंत नाहीं.

**राजा :** अं ? हो —

**बापू :** मला काय म्हणायचंय् – हे जें हल्लीं चाललंय् ना चौखूर उधळणं तें थांबवावं लागेल तुला चार हात झाल्यावर.

**राजा :** अं ? हो —

**बापू :** मग फक्त स्वतःचा विचार करून चालत नाहीं साले लग्न झालं म्हणजे. तुला लग्नाची इतकी घाई कां झालीय् ? थांबतां येत नव्हतं ?... घरांत साले कुणाला सांगायचं नाहीं—

**राजा :** मी...मी सांगणार होतों —

[ क्षणभर शांतता ]

**बापू :** पण एकंदरींत ती बरी दिसते. तुझ्यापेक्षां तर —

**राजा :** हो —

**बापू :** लग्न करायचं तर पैसा हवा. शिल्लक टाकणं आहे...

**राजा :** पडेल शिल्लक. अजून वेळ आहे —

**नाना :** इतका वेळ झाला. अजून आराम नाहीं जिवाला.

**बापू :** मला तुझ्या भानगडींत पडायचं नाहीं. तुझं ठरलंय्. ठरू दे... उद्यां तूं म्हणायचास – बापूंना साले विचारलं, त्यांनीं नकार दिला आणि आतां आयुष्याचं वाटोळं झालं.

**राजा :** अजून आमचं सगळं ठरलेलं नाहीं.

**बापू :** आमच्याहून तरी साली बरी स्थिति आहे तुमची. माझं लग्न झालं तेव्हां कांहीं नव्हतं जवळ...पाठीला खाज सुटली तर खिशांतून नाणं काढून पाठ खाजवायला एक दमडासुद्धां नव्हता...पण भागली वेळ कशीबशी.

**राजा :** तशी पैशाची मला फिकीर नाहीं, पण माझं अजून निश्चित असं कांहीं ठरलेलं नाहीं.

**बापू :** अजून तुझं सालं ठरतंच आहे...तें कांहीं नाहीं. लगेच ठरवून टाक. आणि तुला जमत नसेल तर तिला सांग ठरवायला.

**राजा :** पण बापू —

**बापू :** मीं तिला सांगूनसुद्धां टाकलं – राजाला पंचविसावं वर्ष लागल्यावर मगच लग्न करा...तेवढीच सालीं दोन वर्षं गेलीं...

[ नाना चमत्कारिक हावभाव करतात ]

**राजा :** ( नानांकडे पाहून )... थांबा हं नाना —

**बापू :** मग त्यानंतर तूं हवं तें कर. फक्त माझ्याकडे भागत नाहीं म्हणत येऊं नकोस परत. जें मिळेल त्यांत रहा —

**राजा :** मागं तुम्हीं सांगितलं आहे हें. पाठ झालंय् माझं.

**बापू :** ( चिडून ) काय–काय म्हणालास ? ( राजाचा शर्ट धरतात ) काय–काय म्हणालास तूं ? बोल. थोबाड उघड...काय म्हणालास ?

**राजा :** ( घाबरून ) मीं नुसतं म्हटलं —

**बापू :** ( ओरडून ) माझ्याशीं बोलतांना थोबाड सांभाळत जा ... मला म्हणतो – 'मागं सालं तुम्हीं सांगितलं आहे हें !' नानांशीं बोलतांना तसंच ... मघाशीं काय म्हणालास तूं नानांना ? ... काय म्हणालास ?

**शारदा :** ( येत ) काय गडबड चाललीय्. ( स्वयंपाकघरांत बोट दाखवून ) ... आंत पाहुणी आलीय् – लक्षांत आहे ना ?

**बापू :** असूं दे ... पाहुणी असूं दे नाहींतर राहुणी असूं दे ... तिला कळूं दे हा कसा आहे तो. नाहींतरी मी सांगणारच आहे. ( राजाला हलवतात ) घोडा. स्वतःच्या पायावर नाहीं उभं राहातां येत —

**शारदा :** त्याचा शर्ट सोडा नं —

**बापू :** ( पकड ढिली करीत ) शर्ट ? ... मान धरीन मी साली त्याची.

**शारदा :** काय – केलं काय त्यानं ?

**बापू :** कानफटांत देईन साली एक ... हे ... हे कपडे काय ? हे रंग काय ? आज रात्रीं ह्याला जाऊंच देत नाहीं बाहेर. कुठून हे ढंग पैदा करतो ठाऊक आहे मला. नाटकाच्या ढंगांतून हे रंग आले आहेत. तो आज जाणार नाहीं. उद्यां जाणार नाहीं. कधींच जाणार नाहीं रात्रीं बाहेर —

**राजा :** हें पहा —

**बापू :** हें पाहा आणि तें पाहा नको. मला कांहीं पाहायचं नाहीं आगखी ... आणि त्या कपाटांत कचरा केला आहेस तो काढून टाक आधीं. पुस्तकं काय, कागद काय ... नाहीं तर मी सगळं काढून गटारांत फेकून देईन. आणि तुलाहि घराबाहेर साली लाथ मारून ढकलून देईन. त्या कपाटांत —

**राजा :** तुम्हांला वापरायचंय् तें कपाट ? (स्वयंपाकघरांतून मालू येते)

**बापू :** मला नकोय् तें. आणि तूंसुद्धां वापरायचं नाहीं तें.

**शारदा :** (शांतपणानें) काय – झालं काय ?

**बापू :** सालीं उलट उत्तरं करतो. नानांची किंमत नाहीं, माझी किंमत नाहीं ... एवढ्या हयातींत शिकला काय तर हें – उलट उत्तरं कशीं द्यावींत मोठ्यांना. मला साला संबंधच नको ह्याच्याशीं. तो मला मेला आणि मी त्याला मेलों ... माडीवर बॅग कुठंय् ती त्याला ठाऊक आहे. म्हणावं, ती बॅग घे आणि चालता हो मद्रासला —

**शारदा :** पण तो म्हणाला का जातो म्हणून ?

**बापू :** म्हणायला कशाला हवं ? त्याला जाऊं दे ना सालं —

**शारदा :** पण तो म्हणाला का —

**बापू :** त्याला खुशाल जाऊं दे. आपलं चंबूगबाळं घेऊन जाऊं दे त्याला. नाहींतरी एकुलता एक कारटा असणाऱ्या बापाला सालं आज ना उद्यां हें बघायचंच असतं. त्याच्या आयुष्याचा पराजय असतो ना तो...एकुलता एक मुलगा आईबापांच्या लाडांना कंटाळतो. त्याला त्याचं वेगळं राज्य हवं असतं. त्या तिथलं, पलिकडचं – जाऊं दे ना त्याला. अगदीं साल्या ह्या क्षणी गेला तरी जाऊं दे —

**शारदा :** त्याला जायचं नाहीं. जायचं नाहीं – जायचं नाहीं. कळलं ?

**राजा :** हें पाहा बापू —

**बापू :** आलं पुन्हां सालं 'हें पाहा !' (ओरडून) मला तुझं 'हें पाहा'– नकोय् ... तुझं कांहींच नकोय् मला ... शिकला तिथं हीच रड ... नोकरीला लागला तिथं हीच कटकट ... त्याच्या कांहींच येत नाहीं सालं मनाला. काय हवं तें कळत नाहीं आणि मिळत नाहीं तें हवं म्हणतो. कधीं चहाच गार असतो – चहा गार नसतो तेव्हां दुसरं कांहींतरी बिघडलेलं असतं ... त्याला इथलं सालं कांहींच रुचत नाहीं. पटत नाहीं. त्याचं लक्ष इथं नसतं, तिथं असतं ... पलिकडे ... जिथं त्याला पोंचतांहि येत नाहीं ... त्याला जाऊं दे तिकडे ... तिकडे जातां आलं नाहीं कीं इकडे वळतांहि येणार नाहीं हें समजायलाच हवंय् त्याला ... जा तूं ... चालता हो —

**शारदा :** पण तो कुठं म्हणतोय् तसं ? माझं ऐका जरा. तो मद्रासला जाण्याएवढा मोठा झालेला नाहीं. कुठंच एकट्यानं जाऊन राहाण्याइतका तो मोठा झालेला नाहीं अजून.

**बापू :** नाटकांतल्या पोरीबरोबर फिरण्याइतका, लग्न ठरवण्याइतका तो मोठा आहे ना ? त्यालाच वाटतं आपले साले हात आकाशाला पोंचले म्हणून.

**शारदा :** हें सगळं तुम्हींच म्हणतां. त्याला नाहीं हो तसं वाटत. त्याच्या डोक्यांत कांहींतरी चमत्कारिक कल्पना असतात, इतकंच.

**बापू :** नाहीं, नाहीं. त्याला चालता होऊं देच. डोक्यांतल्या साल्या कल्पना चमत्कारिक आहेत तें कळूं दे त्याला.

**शारदा :** तो नाहीं जाणार. मी जिवंत असेपर्यंत तरी तो जाणार नाहीं.

**माळू :** (बाहेर येत) आई —

**बापू :** त्याला नेव्हींत जायचं होतं. जा म्हणावं सालं ह्या घडीला —

**शारदा :** त्याला कशाला ? तुम्हांला नाहीं जन्मभर वाटत आलं नेव्हींत जावं म्हणून ?

**माळू :** आई – नाना पाहा कसे करताहेत —

(बापू, शारदाबाई आणि माळू नानांकडे बघतात. नानांना धाप लागली आहे.)

**शारदा :** (नानांकडे धांवत जात) नाना – (बापूंना) अहो, पाह्यलंत का ? तुमच्या ह्या अशा वागण्यानंच नानांच्यावर परिणाम झाला —

**बापू :** ( राजाला ) झालं सालं आतां तुझं समाधान ?

**शारदा :** त्याला कशाला बोल लावतां येतां जातां ? तुम्हीं दोघेहि सारखेच आहांत. मरण आहे तें माझं. मुलं मोठीं होण्याची आईनें आशा धरायची आणि तीं मोठीं झालीं कीं अशीं भांडतात. कुणाचा कड घ्यावा ह्या विचारांत आई होरपळून जाते आणि पुन्हां दोन्ही पुरुष रागावलेलेच तिच्यावर. त्यापेक्षां मुलगी परवडते. जा आतां कुणीतरी कांदा आणा घरांतून.

**मालू :** मी आणूं का ?

**शारदा :** नको ... बस जरा स्वस्थ ... वय झालंय् नानांचं ... असं होतंच अधूनमधून.

**बापू :** ह्या महिन्यांत हें तिसऱ्यांदा ... त्यांना डॉक्टरकडे जा म्हटलं तर सालं पटत नाही, आज काय गुरुवार ... उद्यां काय तें — डोक्यांत वेड कांहींतरी —

**शारदा :** अहो, ह्या वयांत असंच चालायचं. लहानपणचं वेड तारुण्यांतली हौस ठरते आणि तारुण्यांतली हौस शेवटीं म्हातारचळ ठरतो ... कुणाचं कधीं वेड गेलंय् ? तुमचं आणि राजाचं तरी —

**बापू :** त्याचं नांव काढूं नकोस. मी डॉक्टरबद्दल बोलत होतों. नानांना पाठवलंच पाहिजे डॉक्टरकडे.

**शारदा :** तें आपण होऊन मुळींच जाणार नाहींत.

**बापू :** जाणार नाहींत हें हज्जार वेळां ऐकलंय् सालं.

[ स्वयंपाकघरांत जातात ]

**शारदा :** ( नानांना ) बरं वाटतंय् का जरा ?

**नाना :** ( अर्धवट शुद्धींत ) सारखी घाई. ह्या घाईनं नकोसं केलं. वाटतं, आतां जातो जीव कीं मग जातो —

**शारदा :** वाटेल बरं.

[ बापू कांदा घेऊन येतात ]

**बापू :** ( नानांना बोलतांना पाहून ) कांदा नकोय् ना आतां ?

**शारदा :** द्या इकडे. ( नानांच्या नाकाला कांदा लावतात )

**नाना :** घाई–सगळी घाई—

**बापू :** काय म्हणताहेत ते ?

**नाना :** दोघांनाहि कळत नाहीं कांहीं.

**शारदा :** शांत व्हा नाना. वर येतां ? (बापूंना) नानांना वर नेऊन ठेवूं या मला वाटतं. तिथं आराम मिळेल.

**बापू :** पण तरीसुद्धां सालं डॉक्टरला बोलवावं—मला वाटतं.

**मालू :** पाणी आणूं का ?

**शारदा :** नको. पाणी नाहीं घेणार ते. वाटेल बरं. असं होतं कधीं कधीं.

**बापू :** कधीं कधीं काय ? या महिन्यांत हें तिसऱ्यांदा. आणि बहुतेक शनिवारींच अशी धाप लागते. शनिवारीं शांतपणें चहा घेऊं म्हटलं तर सालं जमतच नाहीं हल्लीं—

**शारदा :** ते काय करणार त्याला ? त्यांच्या हातांत आहे का कांहीं ? ...त्याच्यावर आतां चर्चा नको. त्यांना वर नेऊन ठेवूं या प्रथम—

**बापू :** (नानांना बगलेंत हात घालून उठवतात) चला नाना...वर जाऊन पडा तुम्हीं स्वस्थ... (चिडून) हॅ...वजन कांहीं सालं कमी नाहीं. खा खा खायचं आणि खायला घालणाऱ्यालाच सालं ओझं व्हायचं—

**शारदा :** (राजाला) नुसता उभा नको राहूंस रे राजा—त्यांना जरा मदत कर ना—

**बापू :** (नानांना माडीवर नेतां नेतां) त्याला कांहीं सांगूं नकोस तूं. तो आणखी त्यांना पाडील—नसता साला घोटाळा करून ठेवील.

**शारदा :** त्याला तुम्हीं कांहींच कां करूं देत नाहीं ?

[ शारदाबाई आणि बापू नानांना नेतात ]

**नाना :** (बडबड चालूच) धाई...धाई...कंटाळा आला. दोघांचीं भांडणं ...कुणाला कुणाची पर्वा नाहीं...

[ आतां हॉलमध्यें राजा आणि मालूच. चमत्कारिक शांतता...राजा नानांची बॅग उचलतो. उघडून बघतो, आंतलं रेशनकार्ड काढतो ]

**राजा :** रेशनिंग गेलं तरी अजून नानांनीं आपलं रेशनकार्ड सांभाळून ठेवलंय्. रेशनपेक्षां आपण जास्त किती गिळतो तें पाहयला.

**मालू :** त्यांना बरं नाहीं रे आज. चहा घेतांनाच माझ्या लक्षांत आलं होतं. पण मी बोललें नाहीं.

**राजा :** (थांबून) तुला ठाऊक आहे मालू ? नानांचे वडील जवळ जवळ जगभर फिरले होते. इंग्लंड, अमेरिका, कैरो, व्हीएन्ना – बगदाद –

**मालू :** हो ?

**राजा :** ते लढाईवर होते पहिल्या. पाय कापण्यापूर्वी ते सगळीकडे हिंडून आले. त्यांना सात कीं आठ भाषा बोलतां लिहितां यायच्या ... कमाल आहे कीं नाहीं ?

**माल्ू :** (तिचा विश्वासच नाहीं.) तुझ्या आईचं काय मत पडलं राजा माझ्याबद्दल ?

**राजा :** ते फ्रान्समध्यें गेले होते. तिथं दोन वर्षं होते ते. खूप मौज केली म्हणे त्यांनीं. नाटकं, नाच —

**माल्ू :** (लक्ष न देतां) आपलं लग्न झालं कीं, आपण एकदम सगळं बदलून टाकूं या ... पण राजा, तूं नक्की लग्न ठरल्याचं कां नाहीं सांगितलंस ?

**राजा :** सांगणारच होतों मी. पण माल्ू तूं त्यांना आंगठी दाखवली नाहींस ना एंगेजमेंटची ?

**माल्ू :** दाखवली तर ? प्रत्येकालाच दाखवलीय् मी. किती सुंदर आहे ही !

**राजा :** (तिचा हात हातांत घेतो) तूं माझ्यावर नेहमीं प्रेम करशील ना माल्ू ?

**माल्ू :** तुला माहीत आहे ह्या प्रश्नाचं उत्तर.

**राजा :** (आंगठी चांचपतो) मला पण अजून वाटतं, ही आंगठी थोडीशी सैलच आहे, बदलून आणली पाहिजे.

**माल्ू :** (हात काढून घेते) सैल कुठं ? राजा, सगळ्यांनीं ही आंगठी बघितली आणि विचारलं ना, कीं आपल्या लग्नाबद्दल सांगतांना इतका आनंद होतो राजा —

**राजा :** हरवली तर मी ऐकून घेणार नाहीं हं. अगदीं सैल आहे ही. आई म्हणाली, तूं तिला मदत करीत होतीस तेव्हां तर ही आंगठी सारखी पडत होती ... चार दिवसांत बदलून मिळेल आपल्याला ... मग तूं जन्मभर ही आंगठी घालून राहा ... (खोट्या प्रेमानं) माल्ू ... युगांमागून युगं आपण एकत्र राह्यचं ... युगामागुनी चालली रे युगें ही—करावी किती भास्करा वंचना ...

**माल्ू :** राजा – माझा राजू —

**राजा :** खरं सांगतों माल्ू ... ही आंगठी तूं देऊन टाक मला... मी बुधवारीं तुला दुसरी देईन, नाहींतर ही घट्ट करून देईन. चालेल ?

**माल्ू :** मुळींच चालणार नाहीं. अंहः

**राजा :** दे ना मालू.

**मालू :** राजा —

**राजा :** ( रागानें दूर होत ) मग वाटेल तें कर. तुझ्या मनाला आवडेल तें कर ... मागाहून मी सरळ हात ठेवीन कानांवर. ( बाहेर बागेंत अलका येते. घंटी वाजवते ) कुणीतरी आलं वाटतं.

**मालू :** रागावूं नकोस रे माझ्यावर, मी मुळींच हरवणार नाहीं ही आंगठी... तुझी शप्पत.

( घंटी वाजते )

**राजा :** थांब, कुणीतरी आलंय्. ( दार उघडतो. बाहेर उभ्या असलेल्या अलका गांगुलीला बघतो. ) कोण, अलका ?

**अलका :** हो अलका गांगुली, ओळखलं नाहींस ?

**राजा :** नाहीं म्हणजे त्याचं काय आहे – ( दार लावतो, आंत येतो, मालू जवळ जातो ) मालू एक मिनीट हं – ( शारदाबाई वरून येतात. )

**शारदा :** कोण आलंय रे राजा ?

**राजा :** आलोंच आलोंच. एक मिनिटांत.

( बाहेरचं दार उघडतो. बाहेर येऊन दार लावून घेतो. मालू संत्र काढून खाऊं लागते. बागेंत प्रकाश पडतो ).

**राजा :** अलका, माफ कर हं, तुला मी इथं थांबवल्याबद्दल.

**अलका :** ( वेडावते ) माफ कर हं थांबवल्याबद्दल.

**राजा :** अग सकाळीं नळच फुटला पाण्याचा घरांत. सगळीकडे पाणी झालंय् म्हणून तुला बाहेर उभं रहायला सांगितलं.

**अलका :** मग तुम्हीं घरांत काय जलविहार करीत होता इतका वेळ ?

**राजा :** ( विषय बदलत ) इथं कां – सहज आली होतीस ?

**अलका :** सहज ? तुझी माझी मैत्री नुसती सहज आहे इथं यायला ? तुला ठाऊक आहे मी इथं कां आलेयू.

**राजा :** मला खरंच कांहीं कल्पना नाहीं.

**अलका :** खोटं बोलूं नकोस. तुझा हा भाबडा चेहरा पाहिला कीं मी लगेच ओळखते – तूं फार खोटं बोलतो आहेस म्हणून ... बुधवारीं तूं तुझ्या काकांकडे जाणार होतास —

**राजा :** हो. मग गेलोंच होतों —

**अलका :** तुझे काका काय हँगिंग गार्डनवर राहातात माळी म्हणून? तुला तिथं एकानं पाहिलं त्या दिवशीं.

**राजा :** केव्हां? बुधवारीं?

**अलका :** हो. बुधवारींच. तुझ्याबरोबर एक मुलगी होती. आणि ती सारखी म्हणे संत्रीं खात होतीं.

**राजा :** संत्रीं? म्हणजे साफ खोटं.

**अलका :** मग काय खात होती ती?

**राजा :** मला माहीत नाहीं. बुधवारीं मी काकांकडे रमी खेळत बसलों होतों.

**अलका :** (वेडावते) रमी खेळत बसलों होतों खोटारडा. एक नंबरचा खोटारडा आहेस तूं राजा. तूं बाकी कांहींसुद्धां नाहींस – फक्त खोटा आहेस. पत्त्यांतल्या राजाहून खोटा आहेस ... माझी आंगठी कुठंय्? एंगेजमेंट रिंग.

**राजा :** बरं झालं विचारलंस तें. मी विसरलोंच होतों ... सोनाराकडेच पडून राहिली आहे ती. हे सोनार म्हणजे – काय सांगतील आणि काय नाहीं. म्हणे, पुढल्या आठवड्याशिवाय तयार होणार नाहीं आंगठी.

**अलका :** (वेडावते) पुढल्या आठवड्याशिवाय तयार होणार नाहीं. खोटं. ढोंगी – लबाड.

**राजा :** ते म्हणतात, आंगठी इतकी सुंदर आहे कीं खडा बसवतांना तिच्या डिझाइनला धक्का लागून चालणार नाहीं...तसं डिझाइन त्यांना करतांच यायचं नाहीं म्हणे पुन्हां ... इथं त्यांना तो खडा लावतां येत नाहीं. त्यांनीं दिल्लीला पाठवलीय् ती आंगठी ... त्यांत आणि त्यांचे तीन कारागीर आजारी पडले आहेत —

**अलका :** (वेडावते) तीन कारागीर आजारी आहेत ... मला वाटतं, त्या तिघांचेहि तीन चोक बारा पाय कापलेले असावेत. तुला दुसरं काय सुचतंय् पाय कापण्याखेरीज? ... आणि आज दुपारीं तूं मला चहाला बोलावणार होतास – तुझ्या आईसाहेबांनीं मला पाहावं म्हणून —

**राजा :** हो नं ... माझ्या लक्षांत होतं. पण काय झालं ... माझ्या आजोबांची प्रकृति एकदम बिघडली ... गेल्या गुरुवारीं. पडूनच आहेत ते.

**अलका :** ते पडून असूं देत नाहींतर उभे असूं देत. तुझ्या आईला भेटल्याशिवाय जाणार नाहीं मी. सांगून ठेवते ... मी फसणार नाहीं

अशानं. हें पाहा राजा, माझी आंगठी तरी आतां दे नाहींतर मी तुझ्या आईला भेटतें ...

**राजा :** शू ... हळू बोल ग.

**अलका :** हळू काय म्हणून ? ( मोठ्यानं ) कां म्हणून हळू ? मी भेटणार तुझ्या आईला...तुझ्या बाबांना...तुझ्या आजोबांना...तुझ्या आजीला—

**राजा :** आजीला भेटायला गेलीस तर परत येतां येणार नाहीं... ( हंसतो. ) अलका...आल्या, रागावलीस ? ( तिच्या खांद्यावर हात ठेवतो. )

**अलका :** मी दुधखुळी नाहीं एवढी. सोड मला. माझी आंगठी देऊन टाक...माझ्या वडलांनीं विचारलंय् मला आंगठीबद्दल...मला धड आपल्या लग्नाबद्दलसुद्धां सांगता येत नाहीं कांहीं.

**राजा :** पण एकदां तूं म्हणाली होतीस–मला तुझ्याशीं लग्न करायचं नाहीं म्हणून.

**अलका :** एकदां का हजारदां म्हटलं मी. तूं जर तुझ्या त्या झोंपडींत मला नेणार असलास तर मी येणार नाहीं, तुझ्याशीं लग्न करणार नाहीं असं हजारदां सांगितलं कीं मी.

**राजा :** मग तुला आवडेल तिथं राहूं...मी कुठं नाहीं म्हटलं ? तुला गोड तें मला गोड—

**अलका :** ( वेडावते ) तुला गोड तें मला गोड...मला आंगठी गोड आहे.

**राजा :** मलासुद्धां आंगठीचं—

**अलका :** चूप...आंगठीचं काय ? आज रात्रीपर्यंत मला आंगठी मिळाली पाहिजे...

**राजा :** हो...हो...एवढंच ना ? (तिच्या खांद्यावर हात ठेवतो) अलका—

**अलका :** हात काढ राजा तूं —

**राजा :** रागावली नाहींस ना ?

**अलका :** ( वेडावते ) रागावली नाहींस ना ?...आतां कांहींतरी दुसरी रेकॉर्ड वाजव...त्या ' रागावली नाहींस ना ' ची रेकॉर्ड मोडायला आलीय् .. आंगठीचं बोल—

**राजा :** देईन ना...नक्की देईन...सोनाराकडे जाऊन आणतांच मी रात्रीं ... आज पिक्चरला येणार ना रात्रीं ?

**अलका :** तूं आधीं ती आंगठी घेऊन ये.

**राजा :** बरं बरं...रात्रीं भेटल्यावर —
**अलका :** रात्रीचं राहूं दे...आणखी अर्ध्या तासानं दुकानं बंद होतील. तूं पळ बघूं...सोनाराकडे जाऊन आंगठी आण...नाहींतर माझ्याबरोबर चल. मी येते सोनाराकडे.
**राजा :** पण अलका —
**अलका :** आतां पण काय ?...काय झालं आतां ?
**राजा :** मला तोंडबिंड धुवून, दाढी करून, कपडे करून —
**अलका :** तूं ये लौकर सगळं आटपून ... मी थांबते आपल्या नेहमींच्या जागीं ( जाते ).

[ राजा घरांत येतो ]

**राजा :** मालू, आत्तां एक मुलगी आली होती. त्यांच्या संस्थेचं नाटक आहे. त्याचीं तिकिटं खपवायला —
**मालू :** एक सबंध संत्र खाईपर्यंत थांबावं लागलं मला. ती काय सगळीं तिकिटं तुला एकट्यालाच खपवायला आली होती कीं काय ?
**राजा :** मग ती म्हणायला लागली, तुम्हीं आमच्या नाटकांत काम करा — मी नाहीं म्हटलं, तर म्हणाली, निदान डायरेक्शनसाठीं तरी या —
**मालू :** ( एकदम ) राजा, नानांचं कसं आहे, कांहीं कळलं ? मला बाई भीति वाटते.
**राजा :** ( खुर्चीवर बसत ) कोण ? नाना ? ह्रॅः वाटेल बरं. त्यांना नेहमींच होतं असं कांहींतरी. इतके दिवस औषधं बदलून पाहिलीं आतां डॉक्टर बदलले —
**मालू :** नानांचे डोळे पाहिलेस तूं ? काय घाबरले मीं. मघाशीं तुझा आणि बापूंचा वाद झाला तेव्हां —
**राजा :** कितीदां औषधं बदलायचीं. एक औषध तर इतकं महाग होतं — ते म्हणे हिंदुस्थानांत प्रथम टिळकांना, मग डॉक्टर जगदीशचंद्र बोसना आणि तिसऱ्यांदा नानांना दिलं.
**मालू :** नानांना ? ... बापू उगाच नाहीं भडकत तुझ्यावर.
**राजा :** म्हणजे ?
**मालू :** ह्याच तुझ्या थापा. थाप मारल्याशिवाय तुझी कुठलीहि गोष्ट हलत नाहीं ... म्हणूनच चिडतात ते तुझ्यावर.

**राजा :** त्यांचं सोड –

**मालू :** पण राजा —

**राजा :** काय ? काय झालं ?

**मालू :** बापू काय म्हणत होते ? – तुझ्या मद्रासला जाण्याबद्दल ?

**राजा :** कोण ? बापू ? केव्हां ? मी नाहीं ऐकलं तें ?

**मालू :** तूं नानांना उलट उत्तर करत होतास तेव्हां नाहीं का ते म्हणाले ? तुझा शर्ट धरला होता त्यांनीं ... ते म्हणाले तुला मद्रासला जायचं असेल तर चालता हो घरांतून —

**राजा :** हॅ – हॅ ... ते ना ? ते वाटेल तें बोलतात ... वर्कशॉपमध्येंसुद्धां कुणी लक्ष देत नाहीं त्यांच्या बोलण्याकडे.

**मालू :** पण ते असं का म्हणाले ?

**राजा :** असं म्हणजे ? – मद्रासचं ?

**मालू :** हं —

**राजा :** त्याच्यामागं फार मोठा इतिहास आहे —

**मालू :** ... पण तरीसुद्धां आपल्याला विचार केला पाहिजे – तूं मद्रासला जाणार मग आपलं लग्न —

**राजा :** (तिच्याजवळ जातो) मालू – अग तुला सुखांत ठेवण्यासाठींच माझी खटपट आहे —

**मालू :** म्हणजे ?

**राजा :** तुला कळत कसं नाहीं ? अग, नुसतं असंच राहून कसं चालेल ?

**मालू :** (सहजपणें पर्समधून संत्र काढते) असंच म्हणजे कसं राजा ?

**राजा :** — म्हणजे ह्या असल्या वातावरणांत. कोंदट. तुला ह्या ठिकाणीं सुख लाभेल ?

**मालू :** ह्या ठिकाणीं ना ?

**राजा :** हो. ह्या घरांत ... जिथं वडलांची सांवली त्यांना घेऊन फिरतेय् – मालू, तुला त्याची कल्पना नाहीं कांहीं —

**मालू :** (संत्र सोलूं लागते) कल्पना कसली ?

**राजा :** ते दिसतात तसे नाहींत मालू ... ते मनांतून माझा सारखा हेवा करतात ... माझ्याकडे पाहिलं कीं त्यांना आपला पराजय दिसतो ... इथं

घरांत मी त्यांच्यासमोर वावरतांना त्यांना वाटतं, आपल्या आशाआकांक्षांच्या राखेंतूनच मी जन्म घेतलाय्.

**मालू :** कुणाला – बापूंना वाटतं ?

**राजा :** त्यांचीं तेव्हांचीं स्वप्नं होतीं ... खोटीं ठरलीं सगळीं. आतां माझा उत्कर्ष बघवत नाहीं त्यांना ... त्यांना लेखक व्हायचं होतं ...

**मालू :** राजा, ही तुझी आणखी एक थाप.

**राजा :** तुला वाटत असेल तर वाटूं दे ही थाप. पण शंभर टक्के ही गोष्ट खरी आहे. मी सिद्धसुद्धां करूं शकेन हवी तर ही गोष्ट.

**मालू :** कशी करणार ?

**राजा :** (कपाटाकडे बोट दाखवीत) तें कपाट उघडलं कीं झालं.

**मालू :** काय ?

**राजा :** तूंच बघ जा ... कपाट उघडलंस तर तुझ्या पायाशीं रास पडेल. त्यांच्या अपयशांच्या ढिगाची, त्यांच्या कादंबऱ्या, गोष्टी, नाटकं —

(मालू उठून कपाटाकडे जाऊं लागते)

**मालू :** कपाट बंद आहे राजा.

**राजा :** हं —

**मालू :** किल्ल्या कुठं आहेत ?

**राजा :** देवाला आणि त्यांना-फक्त दोघांना ठाऊक आहे. मी चार वर्षांचा असतांना त्यांनीं कुलूप लावलं त्या कपाटाला. अजून तसंच आहे तें तोंड मिटून.

**मालू :** त्यांत त्यांच्या-काय म्हणालास तूं ?-कादंबऱ्या—

**राजा :** सगळं कांहीं आहे...लिखाणाबरोबरचीं स्वप्नं...आशा, आकांक्षा... एका जिवाची वेडी धडपड. तीस चाळीस कादंबऱ्या, सात आठ नाटकं-सगळ्यांचं तेंच कथानक-कडवट आयुष्य आणि पिचलेल्या इच्छा—

**मालू :** सगळ्यांना कुठं मोठं होतां येतं ?

**राजा :** पण सगळेच लहानहि राहात नाहींत-बापूंसारखे...मोठं होण्यासाठीं त्या लहान जिवानं रात्रीच्या रात्री जागून काढल्या. ढिगांमागून कागदांचे ढीग नासले-शाईच्या बाटल्याच्या बाटल्या संपवल्या. सिगारेटची राख...बोटांना, डोळ्याला शीण-आणि हें सगळं रात्रीच्या दिव्याला साक्षी ठेवून कशासाठीं ? तर अपयशाचं ओझं वाढवायला. ओझं सहन झालं

नाहीं, वाचूं लागलं कीं ते माझ्यावर चिडतात. मला शिव्या देतात. माझ्या लेखनाला शिव्या देतात—

**मालू :** तुझ्या मद्रासला जाण्याचं सांग आधीं. राजा, आपली छोटीशी दुनिया—

(शारदाबाई जिन्यावरून येतात)

**राजा :** छोटीशी दुनिया आणि छोटीशी झोंपडी.

**मालू :** पण एकटीला भीति नाहीं का रे वाटणार राजा-तूं बाहेर गेलास कीं ?

**राजा :** वेडी तर नाहींस ? तुला सोडून मी कुठंच जाणार नाहीं मालू. कळलं ? (शारदाबाई जवळ आल्यावर ओशाळतो. उठतो)

**शारदा :** (स्वतःशींच. काळजीच्या स्वरांत) केवढी धाप लागलीय्.

(स्वयंपाकघरांत जातात)

**मालू :** आज रात्रीं आपण सिनेमाला जायचं ना ?

**राजा :** अं ?...हो हो...जाऊं कीं. (एकदम डोकं धरून) पण नाहीं—नाहीं जमणार. आत्तां आठवण झाली.

**मालू :** कसली ?

**राजा :** आज मला रंगोकाकांकडे नाहीं का जायचंय् ? रमी खेळायला ? त्यांची एकसष्टी आहे आज.

**मालू :** तूं कधीच कसा बोलला नाहींस काकांच्या एकसष्टीबद्दल ?

**राजा :** अग त्यांच्या घरीं दोन आठवडे केवढा तरी वाद माजला होता—त्यांच्या जन्मतारखेबद्दल ... कुणी म्हणत सोळाशें सत्तावीस तर कुणी म्हणत सोळाशें तीस.

**मालू :** सोळाशें सालचा जन्म आहे त्यांचा ?

**राजा :** हॅः तुला आपलं एक वादाचं सांगितलं.

**मालू :** तूं नेहमींच रंगोकाकांची अडचण पुढं करतोस. पण राजा, रमीचा नाद आहे तो तुझ्या नन्दूकाकांना ना ?

**राजा :** ऑं ? हो हो ... तेच नन्दूकाका रंगोकाकांकडे एकसष्टीनिमित्त रमी खेळायला येणार आहेत. रंगोकाका नुसते बघत बसतात. त्यांना राजा, राणी-सुद्धां ओळखतां येत नाहीं—पत्त्यांतली. ते आपले बघत बसतात. कुणी ‘रमी लागली’ म्हटलं कीं ते टाळ्या पिटतात. खूप मजा येते —

**मालू :** पुरे झालं – हा काका आणि तो काका. मी तुला ओळखून आहे म्हणून बरं, नाहींतर दुसऱ्या कुणा मुलीचा गैरसमज झाला असता. तूं काकांकडे जातो म्हटल्यावर तिला वाटलं असतं तूं नाटकांतल्या एकाद्या मुलीबरोबरच जात असशील.

**राजा :** कमाल आहे तुझी.

**मालू :** खरंच राजा, परवां ती मधुराणी दिसली होती. मध्यंतरी कुठं गडप झाली होती ती ?

**राजा :** मधुराणी कोण ?

**मालू :** तुला माहीत आहे राजा ती नटी. तिच्याबरोबर फिरतांना तुला 'हें' कसं वाटत नसे रे ?

**राजा :** हां ... हां ... ती. कितीतरी वर्षांत भेट नाहीं तिचीमाझी —

(शारदाबाई येतात. कपांत दूध ढवळीत)

**शारदा :** धाप चालूच आहे. झोंप लागली तर बरं वाटेल. पण झोंपतच नाहींत.

**मालू :** मघाशीं ते फारच थकलेले दिसत होते —

**शारदा :** (राजाला) तूंच – तूंच कारणीभूत आहेस ह्याला. त्यांच्या देखत तूं त्यांच्याशीं वाद घातलास कीं त्यांना तो सहन होत नाहीं.

**राजा :** (ओशाळून) कसं आहे आतां नानांचं ? बरं आहे ?

**शारदा :** त्यांना बरं कधीं असतं ?

**मालू :** मी मदतीला येऊं का कांहीं ? ते संत्र घेतील एकादं ?

**शारदा :** मी डॉक्टरना बोलावणं पाठवलंय्. नानांना आवडो न आवडो. हे बसले आहेत त्यांच्याजवळ. (राजाला) राजा, एवढं दूध नेऊन देशील का वर ?

**राजा :** कोण–मी ?

**शारदा :** हो. तूंच ... नाहींतर फोन कर आणि डॉक्टरना बोलाव. (चिडून) पण कांहीं तरी कर – हातपाय हालव जरासे. नुसता उभा राहूं नकोस. जा —

(शारदाबाई नाइलाजानं फोनकडे जातात. राजा वर जाऊं लागतो. शारदाबाई त्याच्याकडे बघतात. तो ओशाळतो. लंगडत चालतो)

**शारदा :** तुझं काय चाललंय् राजा ?

(राजा थांबतो आणि पटकन् आंत जातो)

... डॉक्टर चित्रे ? ... मी ... हो ... सहस्रबुद्धे. वडलांना बरं नाहीं माझ्या ... हो. नानासाहेबांना ... येऊं शकाल का ? हो ... हो ... गोळ्या दिल्या आहेत ... त्यांना सांगितलं होतं तुमच्याकडे जायला ... हो. हो ... थँक्यू ... पण नक्की हं ... (फोन ठेवतात)

**मालू :** येताहेत का डॉक्टर ?

**शारदा :** हो. वेळ लागेल म्हणाले जरा ... असंच कांहीं तरी होतं बघ ... आणि काळजी मलाच केली पाहिजे ... मीं नाहीं केली तर दुसरं कुणीच करणार नाहीं ... ही नाहीं तर ती काळजी आहेच माझ्यामागं —

**मालू :** (बसते. दुसरं संत्र काढते) तुम्हीं एकादी फोड घेणार का ?

**शारदा :** नको ... नको ... आतां नको ... मन ठिकाणावर नाहीं माझं —

**मालू :** मी नाहींतर घरीं जाऊं का ? ह्या गडबडींत उगाचच —

**शारदा :** छे: छे: त्याला काय झालं ? ... तूं यायला आणि नानांची तब्येत बिघडायला – त्याचंच वाईट वाटतंय् मला.

**मालू :** चालायचंय् —

**शारदा :** तें तर झालंच. त्यांना स्वस्थ पडायला लावण्याशिवाय दुसरं कांहींच करतां येत नाहीं. पण त्यांचं असंच होतं. कुणी आलं कीं त्यांची तब्येत बिघडते नेमकी. अर्थात् त्याला त्यांचा कांहीं इलाज नाहीं ...आतां सारखी बडबड चाललीय् ... आणि त्या बडबडीला कांहीं अर्थ नाहीं.

**मालू :** डॉक्टर आले कीं ठीक होईल सगळं.

**शारदा :** हो नं...पाहुणे आले कीं नाना नाहींतर राजा–कुणीतरी वातावरण बिघडून टाकतं ... त्याचं कांहींच कळत नाहीं कधीं—

**मालू :** मला वाटतं, राजा तितकासा मोकळा नसतो इथं. त्याला खूप वाटतं मदत करावी म्हणून, पण आपण होऊन पुढं जाऊन मदत करणं त्याला जमत नाहीं.

**शारदा :** पूर्वी तो नव्हता असा...त्याला आतां समजायला हवं...मला वाटतं, तो मद्रासला जाईल तर सुधारेल. स्वतःच्या पायावर उभं राहिल्याशिवाय आयुष्याच्या मार्गांतले खाचखळगे कळत नाहींत माणसाला.

**मालू :** हो ना. मला विचारायचं होतं–तो मद्रासला खरंच जातोय् का ?

**शारदा :** म्हणतोय् खरा तो. तुला नाहीं कांहीं म्हणाला ?

**मालू :** नाहीं...बापूंना मी बोलतांना ऐकलं तेव्हां कळलं मला...मीं विचारलं त्याला–

**शारदा :** मग काय म्हणाला तो ?

**मालू :** तो बोलला नाहीं नीट. (कपाटाकडे जाते) तो आपला ह्याच कपाटाबद्दल सांगत राहिला.

**शारदा :** त्या कपाटाबद्दल कांहीं सांगू नकोस. त्यानं त्यांत काय कोंबून ठेवलंय्–त्याचं त्याला माहीत. खरं तर त्याला विचारायची भीतिच वाटते.

**मालू :** तो म्हणाला, आपण चार वर्षांचे असल्यापासून तें कपाट बंदच आहे.

**शारदा :** तो हें असं कांहींतरी सांगत कां फिरतो कांहीं कळत नाहीं मला. त्याला त्यांत काय मिळतं, कोण जाणे.

**मालू :** हो नं. बापू नेव्हींत कॅप्टन आहेत असं तो मला सांगायचा.

**शारदा :** त्यांच्यादेखत तूं हें कांहींसुद्धां बोलूं नकोस हं. नाहींतर आणखी भांडणं वाढायची. मग काय होईल आणि काय नाहीं. राजा थापा मारतो त्या सगळ्या कळतात मला. ह्यांना जर त्या सगळ्या कळल्या तर ? कल्पनाच नाहीं करवत...आणि राजा किनई, तोंडाला येईल तें सांगतो. त्याला कशाची म्हणून कशाची भीति नाहीं. त्याला माहीत असतं, ह्या सगळ्या थापा आमच्या कानांवर येतील पण त्याचं आपलं चालूंच .आतां पलिकडे ते नॉव्हेल्टी स्टोअर्स आहे ना त्याच्या मालकांनीं म्हणे गळफांस लावून आत्महत्या केली–तरी राजाला ठाऊक आहे हं आम्हीं त्या स्टोअर्स-वरून रोज सतरांदा जातों.

**मालू :** असंच कांहींतरी मलाहि सांगत असतो.

**शारदा :** कां सांगतो कांहीं कळत नाहीं बघ ...त्याचं काय होणार आहे– एकुलता एक मुलगा म्हणून त्याचे लाड केले, कांहीं कमी पडूं दिलं नाहीं. ह्यांना वाटतं, तो नोकरीला लागल्यापासून त्याच्या डोक्यांत असलं कांहीं आलंय्. मला नाहीं बाई पटत. शाळेंत जायला लागल्यापासून हें चालूं आहे. आतां विचार करते तेव्हां नीट आठवतं ... शाळेंत त्याचं नांव घातलं आणि दुसऱ्या दिवसापासून तो कंटाळला त्या शाळेला. म्हणाला, ही शाळा

चांगली नाहीं ... मग त्याला हव्या असलेल्या शाळेंत घातलं. तिथंसुद्धां हीच तऱ्हा ... पैशापरी पैसा, पुस्तकं, फी, ... दुसऱ्या शाळेचा दुसरा युनिफॉर्म ... क्रिकेट खेळायचं म्हणाला, बॅट आणली, स्टंप्स् आणले ... एक दिवशीं बॅट फुटली, दुसऱ्या दिवशीं कुणीतरी स्टंप्स् पळवले. त्याच्या म्हणे डोळ्यांदेखत पळवले ... कधी नीट पुस्तक उघडणं नाहीं, वाचणं नाहीं ... पैसा आणि वेळ फुकट घालवला ... तुला सांगते, त्याच्या खिशांत रुमाल असलाच तर त्याला महिन्याभरांत पाणीदेखील लागलेलं नसेल ... आळस ... कामाचा आळस ... स्वच्छतेचा आळस —

**मालू :** मी त्याला विचारलं होतं एकदां रुमालाबद्दल पण त्यानं लक्ष दिलं नाहीं.

**शारदा :** त्याचे केंस बघितलेस किती वाढले आहेत एखाद्या सिनेमांतल्या नटासारखे ? वेळेवर कटिंगला जाणं नाहीं, केंस धुणं नाहीं, विंचरणं नाहीं व्यवस्थित ... त्याला स्वतःचंसुद्धां एक काम करायला नको. सांगितलं कीं एका कानानं ऐकतो आणि दुसऱ्या कानानं सोडून देतो ... बोलणाऱ्याला लाज. त्याला नोकरी आवडत नाहीं आणि धंदा जमत नाहीं ... त्याला खूप करायचं आहे ... नाटकं करायचीं आहेत, लिहायचीं आहेत. स्वतःची फॅक्टरी काढायची आहे प्लॅस्टिकची ... आणि त्याला कशाची सुरुवात नकोय् ... त्याला एकदम मध्य हवाय्. कुठं अनुभव घेईल ... लहानसा धंदा चालू करील असं नाहीं. एकदम मोठा धंदा ... हा मॅनेजर, हाताखालीं पांचपन्नास माणसं ... ह्यांच्या ओळखीनं कुठं लावला तर टिकतदेखील नाहीं ...हेंच नको, तेंच हवं ...

**मालू :** तो म्हणाला, कुठल्याहि नोकरींत आपला जीव रमत नाहीं.

**शारदा :** रमायला त्याला जीव कुठाय् ? त्याला विचारलं, नोकरी नको तर तुला हवंय् तरी काय ? ... तर म्हणतो, मला बोटीवर कॅप्टन व्हायचंय्, नाहींतर सतारिया व्हायचंय् —

**मालू :** सतारिया ! त्याला सतार येते वाजवतां ?

**शारदा :** त्यानं पाहिलेली देखील नाहीं म्हणे सतार.

**मालू :** इथं ब्रह्मे सॉलिसिटर्सकडे कसा लागला तो ?

**शारदा :** तो इतिहासच आहे ... ब्रह्मे सॉलिसिटर्सची आणि नानांची ओळख ... चांगलीच. नानांनीं गळ घातली तेव्हां हा नोकरीला लागला.

लागला नाहीं तों कंटाळला. म्हणाला, दिवसभर टेबलाशीं बसणं जमणार नाहीं. त्यापेक्षां कुठंतरी मोठ्या हॉटेलांत नोकरी करावी ... ह्यांनीं समजावलं तरी त्यानं ऐकलं नाहीं. राजिनामा देऊन घरीं बसला. हे दुपारीं घरीं आले तर हा माती घेऊन बाहुल्या करतोय्. हे चिडले. म्हणाले, घराबाहेर पड आणि नोकरीवर जा आधीं ... लोकांना नोकऱ्या नाहींत आणि ह्यांना मिळतेय् तर माज आलाय् —

**मालू :** कमाल आहे.

**शारदा :** हा वेडा — ह्याला नाहीं लाज, नाहीं लज्जा. पुन्हां ब्रम्ह्यांकडे गेला.

**मालू :** ही नोकरी त्याला आवडतच नाहीं.

**शारदा :** पण कांहीं असलं तरी केली पाहिजे ... पोट भरतां यायला हवं स्वतःला ... मद्रासला जातो म्हणे. जा नं ... स्वस्थ बसण्यापेक्षां कुठंहि पोट भरावं — मालू, तुला सांगते, त्याला स्वतःचं कांहींसुद्धां कळत नाहीं. नाटकी मित्र सांगतील तें पटणार त्याला.

(राजा जिन्यावरून येतो)

**मालू :** त्याच्या नाटकांत पूर्वीं एक मधुराणी म्हणून काम करायची. ठाऊक आहे ? ती म्हणे, ह्याच्या डोक्यांत हे असले विचार भरवायची —

(राजा थांबतो. ऐकतो.)

**शारदा :** पाहिलीय् तिला, नटवीच भारी. आईवडील कोण होते. देव जाणे ! ... बरं झालं — कुठं नाहींशी झाली ती.

**मालू :** नाहींशी कशानं ? पुन्हां आलीय् मुंबईत. बंगलोरला का कुठं शुटिंग होतं तिचं — घरीं एकटीच आहे म्हणे. आईबाप कुणी नाहींत. माझं तर पित्त खवळतं तिचं तोंड पाहिल्यावर. चोवीस तास रंगलेलं तोंड आणि सिगारेटसुद्धां ओढते म्हणे. शी :—

**शारदा :** नाटकाच्या वेळींच मला वाटतं, राजाची आणि तिची ओळख झाली ... हो, तेव्हांपासूनच तो विक्षिप्त कल्पना डोक्यांत घेऊन यायचा घरीं ... आणि त्याला कळायचं सुद्धां — आपल्या कल्पना कांहींतरी विक्षिप्त आहेत म्हणून. तेव्हां तो पहिल्यांदा म्हणाला, कुठंतरी सिनेमा-कंपनींत जावं — तिच्याबरोबर तो शुटिंगला जात असावा तेव्हां

**मालू :** असेल ... मला नाहीं बाई ती मधुराणी आवडत ... सारखं नटणं मुरडणं ... पुरुषांबरोबर फिदीफिदी बोलणं ... तिला, मला

वाटतं, मैत्रिणीच नव्हत्या कधीं ... सगळे मित्र जोडलेले...राजाला विचारलं कीं म्हणायचा – 'ती फार गुणी आहे – माझ्या आईला फार आवडते ती.'

**शारदा :** कुणाला ? मला ?

**राजा :** (एकदम मध्येंच विषय बदलण्यासाठीं) मालू, तुला एक सांगायचंच राहिलं —

**मालू :** काय ?

**राजा :** (आठवतो ... आठवतो) ... अं ? ... हं ... जोक. तुला एक जोक सांगणार होतों. काय झालं, बंडोपंत मित्राला म्हणाले, 'एका छत्रींत पंधरा माणसं उभीं राहिलीं ... पंधरा हं ... आणि एकदेखील माणूस भिजला नाहीं म्हणे. तर मित्रानं विचारलं 'हें कसं शक्य आहे ?' बंडोपंत हंसले. म्हणाले, 'कारण तेव्हां पाऊसच पडत नव्हता ...... (सगळे गप्प) कां ? आवडला नाहीं जोक ?

**शारदा :** राजा पुरे झाली तुझी बडबड. तुझी बडबड ऐकून आम्हांला तरी कंटाळा आला ... तुझं स्वतःचं काय होतं —

**राजा :** मी कुठं ऐकतो माझं बोलणं ...

**मालू :** नानांचं कसं आहे ? बरं वाटतंय् का आतां ?

**शारदा :** झोंप लागलीय् ना ?

**राजा :** ठीक आहेत.

**शारदा :** हे तिथंच आहेत ना ? मी जायला पाहिजे का वर ? हवं नको बघायला ? —

**राजा :** न ... नको – मला वाटतं.

**शारदा :** तुला वाटतं ! ... राजा, तुझी आंघोळ झाली ?

**राजा :** आंघोळ ? अजून दुपारपर्यंत राहाणार आहे ? झालीसुद्धां.

**शारदा :** कावळ्याची आंघोळ तुझी. मी नक्की सांगतें ... आंघोळीच्या वेळीं तूं कपडेसुद्धां काढले नव्हतेस अंगावरचे.

**राजा :** मग हे कपडे काय ओलेच आहेत ?

**शारदा :** केव्हां तुझ्यांत सुधारणा होणार कुणास ठाऊक राजा. उद्या मद्रासला गेलास आणि अशा मळक्या कपड्यांत वावरलास तर तुलां प्यूनचीदेखील नोकरी मिळणार नाहीं ... आणि तुला सांगते राजा,

तुझे मळके कपडे धुवून धुवून माझे हात मोडले ... आतां तुझे कपडे तूंच धूत जा —

**राजा :** (गंमतींतच) प्यून तर प्यून....अग, इथून निघायचं, बाहेर पडायचं यांतच केवढा आनंद आहे.

**शारदा :** राजा, दाढी करायलासुद्धां तुला आईनं सांगावं लागतं ?

**राजा :** मी दाढी ठेवायचं ठरवलंय्.

**शारदा :** हें खूळ कुठलं सुचलं तुला ? मला नाहीं दाढी आवडत. माल्रू—

**माल्रू :** शीः मलासुद्धां आवडत नाहीं.

**राजा :** मला आवडतं. अशी टोकदार दाढी...विन्स्लोविस्कीसारखी... साली ऐटबाज दाढी असावी—

**शारदा :** राजा, जीभ आवर तुझी. ह्यांच्या तोंडून ती शिवी ऐकून ऐकून कानाची लाज गेलीय्...आतां तूं नको ह्या घाणेरड्या संवयी लावून घेऊंस बाबा.

**राजा :** पण मी विन्स्लोविस्कीसारखी—खूप मोठा दिग्दर्शक आहे तो रशियांतला...त्याच्यासारखी दाढी ठेवणार आहे. महिन्या दीड महिन्यांत वाढेल—

**माल्रू :** पण आईला आवडत नाहीं तर कशाला हवी आहे दाढी ?

**शारदा :** अग, त्याला किंमत कुठंय् आईची ? जिवंत आईला कधींच किंमत नसते...ती गेली कीं किंमत येते—

**राजा :** पण साला चेहरा कुणाचा आणि राग कुणाच्या नाकावर—

**शारदा :** राजा, राजा, लगाम घाल रे जिभेला—जिभेला लगाम घाल, वागण्याला लगाम घाल...अरे, हां हां म्हणतां मोठा होशील तूं. आहे नोकरी ती राख...ह्यांचं ऐक...नाहींतर स्वतःचा मार्ग नक्की कर आणि मद्रासला का कुठं जायचंय् तिकडे जा...असाच राहिलास तर गंज चढेल आयुष्याला...

**राजा :** कान विटले माझे...हें ऐकून ऐकून—

**शारदा :** आणि तुझ्या थापा ऐकून आमचे कान काय तृप्त झाले आहेत ? तूं त्या नॉव्हेल्टी स्टोअर्सच्या मालकाबद्दल काय सांगितलंस मला ? गळफांस लावून घेतला म्हणून ... माल्रूला ह्या कपाटाबद्दल असलंच कांहींतरी सांगितलंस —

२२८४८ नों. दि ...६।२५



: कपाट ? कुठलं ?
**दा** : तुला माहीत आहे राजा.
**ा** : मला माहीत नाहीं.
**रदा** : हें–हें कपाट—
**जा** : बरं, त्याचं काय ?
**ल्रू** : तूं सिद्ध करून दाखवणार होतास ना ? तूं चार वर्षांचा असल्या-
सून बंद आहे ना तें ? बापूंच्या कादंबऱ्या —
**राजा** : हं ... हं ... तें. मग तसं सांग कीं. छेः तुझा कांहींतरी घोटाळा झाला ऐकण्यांत. मी फडक्यांच्या कादंबऱ्यांबद्दल बोलत होतों ... कपाटाचं कांहींतरी भलतंच काढलंस तूं —
**मालू** : ( धक्का बसून ) कमाल आहे. अरे, तूं इथं उभा होतास. मी इथं अशी बसलें होतें.
**राजा** : असेल. बरं, मग ?
**मालू** : फार वेळसुद्धां झाला नाहीं त्याला. तूं कपाटाकडे बोट दाखवून म्हणालास —
**राजा** : तूं काय म्हणते आहेस ?
**मालू** : वेड घेऊन पेडगांवला जाऊं नकोस हं.
**राजा** : मी नाहीं, तूंच जाते आहेस ... तूं इथं अशी बसली होतीस ... कारण तुला संत्र खायचं होतं. बरोबर ? ... मी इथं उभा होतों. बरोबर ?... फडक्यांची 'दौलत' कादंबरी वाचत. तुझं माझं बोलणं चाललं होतं. बरोबर ?
**मालू** : तूं 'दौलत' वाचत होतास हें खोटं आहे. आपलं बोलणं चाललं होतं हें बरोबर आहे.
**राजा** : 'दौलत' नसेल तर 'जादुगार' असेल —
**मालू** : फक्त बोलत होतों हेंच बरोबर आहे. आणि तेव्हां सगळं तूं बापूंबद्दल बोललास —
**शारदा** : मला माहीत आहे ग मालू – तो असंच कांहींतरी बोलतो —

( बेल वाजते )

**राजा** : ( शारदाबाईंना ) हिच्यावरच तुझा विश्वास बसणार.
: तुझ्याशिवाय कुणावरहि माझा विश्वास बसेल.

**राजा :** तूं सांग ना सरळ – मी थापाड्या आणि खोटारडा आहे म्हणून. असं आडवळण कशाला ?

**शारदा :** आडवळण कसलं ? तूं आहेसच थापाड्या आणि खोटारडा ... तूं खोटारडा आहेस हीच गोष्ट खरी आहे. जगजाहीर आहे ... त्यांत राग येण्यासारखं काय आहे ? तूं स्वतःला कोण – राजा हरिश्चंद्र समजतोस ?

**राजा :** फार आभारी आहे मी तुझा. आईनंच असं म्हणावं यासारखं भाग्य नाहीं.

**शारदा :** आणि आईला असं म्हणावं लागावं यासारखं दुर्दैव नाहीं. तुला कुठं काय आईबद्दल वाटतं ? स्वतःशिवाय कशाचा तूं कधीं विचार केला आहेस ? तुला वाटतं, साऱ्या जगाला तुला वाईट ठरवण्याशिवाय उद्योगच नाहीं ... तुला वाटतंच असेल कुणाबद्दल कांहीं तर तें फक्त तुझ्याबद्दल ! स्वतःबद्दल.

**राजा :** आणि तुला कुणाबद्दल वाटतं ?

**शारदा :** हें सांगायलाच हवं ? अशा प्रश्नाचं उत्तर द्यावं लागणं हें कुठलं भाग्य, राजा ? मला वाटतं तें सगळं तुझ्याबद्दल ... पोटांत तूं वाढायला लागलास आणि माझी सगळी काळजी स्वतःकडे ओढून घेतलीस तूं – मी काळजी करते हें माहीत आहे ना, म्हणूनच तूं निष्काळजी राहिला आहेस—

**राजा :** मी काळजी करत नाहीं स्वतःबद्दल ? मी – मी केवढीतरी काळजी करतो ... अणुबॉंबबद्दल मी काळजी करतों ... दुसऱ्या कां तिसऱ्या – आतां येईल त्या युद्धाबद्दल मी काळजी करतों ... दिवसेंदिवस वाईट निघणाऱ्या हिंदी बोलपटांबद्दल मी काळजी करतों ... केवढं तरी आहे माझं जग.

**शारदा :** माझं जग फार लहान आहे, राजा. केव्हांहि चार भिंतींत कोंडतां येण्यासारखं.

(बेल वाजते)

**राजा :** माहूं, लढाईवर जावं असं कितीदां वाटलं असेल मला ?

(बेल वाजते. शारदाबाई दार उघडतात.)

कोण ? अलका ?

**अलका :** तूं अजून येतोच आहेस. तुझ्या ह्या म्हातारीची परवानगी मिळत नव्हती ?

**शारदा :** ( अलकाला ) तुम्ही दुसऱ्याच्या घरांत शिरतां तेव्हां अशीच सुरवात करतां बोलायला नेहमी ?

**अलका :** हो. माझी खाजगी वस्तु कुणी परत देत नसलं कीं मी असंच बोलतें...अशीच सुरवात करते. राजा, चल, देऊन टाक माझी अं—

**राजा :** अरे हो, विसरलोंच. अलका, तुझी आणि आईची ओळख करून द्यायचीच राहिली.

**अलका :** ती पटेल आतांच...तूं त्या सोनाराकडे गेला होतास का सांग–विषय बदलायचा नाहीं. आधींच सांगते.

**शारदा :** काय भानगड आहे रे राजा ?

**राजा :** ( अलकाला बाहेर नेण्याचा प्रयत्न ) मनावर परिणाम झालाय् हिच्या...नवीन नाटकाचं मी तिला सगळं समजावून सांगतों—

**अलका :** कांहीं ऐकायचं नाहीं मला तुझं. आणि मी बाहेर मुळींच जाणार नाहीं ... तुझा माकडासारखा चेहेरा पाहण्याची माझी इच्छा नाहीं पुन्हां ... तुला काय वाटलं ? मी इथं येणार नाहीं ?

**शारदा :** तूं आधीं घराबाहेर जा बघूं – माझ्या मुलाबद्दल असं बोलायचं असेल तर तूं क्षणभरदेखील इथं उभी राहूं नकोस घरांत —

**अलका :** मी आलें आहे ती माझ्या कामासाठीं —

**राजा :** अलका, आलीस तें बरंच झालं – मला तुला कांहीं खाजगी —

**अलका :** ( वेडावते ) तुला कांहीं खाजगी ! लाज नाहीं वाटत तुला ?

**शारदा :** तूं बाहेर जातेस कीं ह्यांना बोलावूं ?

**अलका :** मी म्हणतें, बोलवाच त्या म्हाताऱ्याला आणि ह्याच्या म्हातारड्या आजोबांनासुद्धां —

**मालू :** ( अलकाला ) जरा शांत व्हा तुम्हीं. त्यांच्या आजोबांची प्रकृति एकदम बिघडली आहे हो अचानक —

**अलका :** ( मालूकडे वळून ) अच्छा. आणि राजा ही तुझी बहीण तर. हिच्याच मोडक्या मांडीचं ऑपरेशन झालंय् ना ?

**मालू :** बहीण नाहीं मी ह्याची. नीट कान फोडून ऐक ... माझं ह्याच्याशीं लग्न ठरलंय्.

**अलका :** मग तूंहि कान फोडून ऐक : त्याचं माझ्याशीं लग्न ठरलंय्. सिद्ध करून देऊं ?

**मालू :** वेड लागलंय् तुला. राजा, ही कोण आहे ?

**अलका :** ( वेडावते ) ही कोण आहे ? ... आरशांत बघून ये आधीं.

**शारदा :** मालू, वर जाऊन त्यांना बोलावून आणतेस का ?

**अलका :** आण आण. आणखीसुद्धां कांही म्हातारडे मिळाले तर आण... आणि तुझ्या मोडक्या मांडीचं हाडुक मिळालं तर तेंहि शोधून आण —

**शारदा :** असली भाषा बाईच्या तोंडून मी कधींच ऐकली नव्हती राजा.

**मालू :** मी बापूंनाच आणते बोलावून.

**अलका :** ( वेडावून ) मी बापूंनाच आणते. मांडी मोडलीय् तें लक्षांत ठेवून जा हं —

**शारदा :** मालू, तूं लक्ष नको देऊंस तिच्याकडे.

**राजा :** मी जरा बोलूं का ?

**मालू :** राजा, ही काय भानगड आहे ?

**अलका :** सांग ... सांग तुझ्या थोबाडांतून मुक्ताफळं पडूं देत —

**शारदा :** हें पहा—बोलण्यापूर्वी —

**अलका :** बाई, तुम्हीं आपलं तोंड जरा आवराल का ? माझं आणि राजाचं बोलणं चाललंय्—मध्यें नाक खुपसून मोडून घ्याल उगाच ... राजा, आंगठी कुठं आहे माझी ? कां हिला दिली आहेस ... मांडी मोडली म्हणून ( मालू हात लपवते ) ... हिलाच दिली आहेस ना ?

**राजा :** अं ? ... म्हणजे हें पहा ... त्याचं काय आहे ... थांब ... थांब जरा, गैरसमज झालाय् ... म्हणजे माझं आणि हिचं लग्न मोडल्यासारखंच—

**मालू :** राजा —

**अलका :** हिच्यासारखी मी मूर्ख आहे असं वाटलं कीं काय तुला ? तूं मला आंगठी दिलीस तेव्हां चंदू होता तिथं. मला एक सोडून दहा साक्षीदार आहेत. चंदू, त्याचा तो घाऱ्या डोळ्याचा दोस्त...मी कोर्टांत खेंचीन तुला—

**शारदा :** कोर्टांत ? ... अग, तो अजून लहान आहे कोर्टकचेऱ्या करायला—

**अलका :** आणि ग्रँटरोड स्टेशनवर दुसऱ्या मुलींबरोबर फिरायलाहि लहानच असेल तो.

**शारदा :** तूं आधीं बाहेर जा पाहूं —

**मालू :** राजा ही म्हणते तें खरं आहे ? तूं वचन दिलं होतंस हिला ?

**अलका :** (वेडावते) वचन दिलं होतंस हिला ? ... सांग राजा, सांग ... माकडाच्या थोबाडांतून मौक्तिकं गळूं देत थोडी – माझी आंगठी —

**राजा :** हो, पण हें बघ अलका —

**अलका :** (वेडावते) हें बघ अलका -- एक अक्षरसुद्धां बोलूं नकोस. वाटलं तर हिच्याशी लग्न कर. तुझ्यासारखं माकड कसं पाळावं हें माहीत असेल हिला ... तूं स्वतःला फार मोठा समजतोस राजा, पण तूं एक नंबरचा फालतू माणूस आहेस – तूं कुणीसुद्धां नाहींस. तूं लेखक नाहींस. कवि नाहींस ... नाटककार नाहींस. नट नाहींस .... फक्त एक फालतू माणूस आहेस. फालतूंतला फालतू ...

**राजा :** मग आपलं लग्न मोडलं असं समजूं ना मी नक्की ?

**अलका :** हिच्या मांडीचं हाड मोडल्याइतकी स्पष्ट गोष्ट आहे ही. माझी आंगठी परत दे —

**मालू :** राजा, तूं हिला वचन दिलं होतंस ?

**अलका :** मग काय नुसतीच फिरत होतें मी त्याच्याबरोबर त्याला रस्ता दाखवत ? ... राजा, मला आंगठी हवी आहे – माझी आहे ती —

**शारदा :** राजा, हा तमाशा थांबव बघूं —

**अलका :** (मालूला) आंगठी देतेस कीं नाहीं ग ?

**मालू :** दिलीच तर मी राजाला देईन. त्यानं सांगावं लग्न मोडलं म्हणून.

**राजा :** हें पाहा मालू —

**अलका :** तूं खुशाल लग्न कर हिच्याशीं ... ह्या लंगड्या, चकण्या आणि मूर्ख मुलीशीं —

**मालू :** तूं कोण स्वतःला अप्सरा समजतेस ? ... तुमच्याकडे आरसा नसेल तर एकाद्या दुकानांत जाऊन थोबाड बघून ये आपलं —

**अलका :** (वेडावते) थोबाड बघून ये आपलं ... राणीच्या बागवाल्यांनीं तुला पाहिलं नाहीं म्हणून अजून तूं बाहेर फिरतेस ... नाहींतर एव्हांना तूं माकडांच्या पिंजऱ्यांत असायचीस ... आंगठी दे माझी ... नाहीं तर मी तुझ्या हातांतून हिसकावून घेईन —

**शारदा :** तूं चालती हो पाहूं —

**अलका :** आंगठी घेतली कीं मी लगेच बाहेर जाणार आहे. (मालूजवळ जाते) आंगठी घेतल्याशिवाय मी जाणार नाहीं —

**शारदा :** तूं बाहेर जातेस कीं (ओरडून) चालती हो तूं —

(बापू माडीवरून हळूंच येतात.)

**अलका :** (मालूला) बऱ्या बोलानं आंगठी देतेस कीं --

**बापू :** (अर्ध्या जिन्यांत) नाना ... नाना —

**अलका :** आंगठी दे नाहींतर मी काय करीन बघ —

**मालू :** मी ऐकून घेणार नाहीं हं वाट्टेल ते.

**अलका :** तुला ऐकावं लागेल. आंगठी देऊन टाक तूं - (मालूच्या अंगाशीं झटापट करते)

**मालू :** (तिला ढकलते) देत नाहीं जा —

**शारदा :** राजा, ह्या दोघींना गप्प राहायला सांग.

**बापू :** (खालीं उतरतात. शांतपणानं) नाना —

(शारदाबाई, राजा, मालू गप्प.)

**अलका :** (ओरडून) आंगठी हवीय् मला —

**बापू :** वर चला सगळ्यांनीं ... नानाचं शेवटचं दर्शन घ्यायला —

● पडदा पडतो ●

# ३

(नानांना जाऊन आठवडा लोटला आहे. संध्याकाळ. बापू राजाचें कपाट उचकून आंतले सामान बाहेर काढीत आहेत. शोधाशोध चालू आहे. शारदाबाई विमनस्कपणें खुर्चीवर बसून आहेत.)

**बापू :** सालं मिळतच नाहीं आहे सर्टिफिकेट ... नको तें रेशन कार्ड मिळालं, पेन्शनचं पुस्तक मिळालं ... पण जन्म तारखेचा दाखलाच मिळत नाहीं. आँ —

**शारदा :** कदाचित् नसेल त्यांच्याजवळ.

**बापू :** जन्म झाला त्या अर्थी दाखला असलाच पाहिजे. हां, आतां जन्मच झाला नसला तर —

**शारदा :** तसं नाहीं हो. त्यांच्या वेळीं दाखला देत नसतील.

**बापू :** त्यांच्यावेळीं काय होतं आणि काय नव्हतं– ह्या राजाच्या कपाटांतच साला मिळेल तो दाखला. इथं त्याच्याजवळ मिळाला तर त्याचं थोबाड शिल्लक ठेवणार नाहीं, बघ.

**शारदा :** राजाला काय करायचाय् तो दाखला घेऊन ?

**बापू :** (कपाटांतल्या डायऱ्या फेकून)– आणि हा कचरा जमवून तरी त्याला काय करायचं आहे सालं ? ह्याला कांहीं अर्थ आहे ? ... आणि गेलाय् कुठं हा ?

**शारदा :** कुणास ठाऊक ! मी काळजी करायचंच सोडलंय् हल्लीं.

**बापू :** रात्रींपर्यंत घरीं आल्याशिवाय तो राहात नाहीं. त्यानं घरांत राहायला नको ? नाना जाऊन आठ दिवससुद्धां झाले नाहींत. आईजवळ असायला नको होतं त्यानं ?... नाहीं म्हणजे कांहींच कसं कळत नाहीं ? ... त्याला जबाबदारी म्हणजे काय ठाऊकच नाहीं.

**शारदा :** नाना बिचारे त्या टेबलाशीं बसलेले असत. एकटे स्वतःशींच बडबडत.

**बापू :** हूं—

**शारदा :** व्यसन नाहीं; कांहीं नाहीं —

**बापू :** हूं—

**शारदा :** कधीं आवाज चढला नाहीं त्यांचा. आपण जांवयाकडे राहातो याचं त्यांना फार वाटायचं.

**बापू :** हूं—

**शारदा :** आणि दुसरं वाटायचं ते राजाबद्दल. त्यांच्यादेखत राजाचे एकदां चार हात झाले असते—

**बापू :** हूं—

**शारदा :** खूप कष्ट घेतले त्यांनीं...आपल्या संसाराचा भारसुद्धां खूप ओढला तेव्हां त्यांनीं.

**बापू :** हूं—

**शारदा :** आपली खूप काळजी वाहिली त्यांनीं.

**बापू :** काय वय होतं त्यांचं ?

**शारदा :** सत्तर किंवा एकाहत्तर असेल. त्यांनादेखील नक्की ठाऊक नव्हतं.

**बापू :** हूं—

**शारदा :** नाहींतर कांहींचे काय हाल होतात. महिने न् महिने लोळागोळा होऊन पडायचं...स्वतःबरोबर दुसऱ्यांना दुःख द्यायचं. अगदीं बोलतां बोलतां गेल्यासारखे वाटतात...जातांना कांहीं बोलले का ?

**बापू :** कोण जाणे. त्यांचं बोलणं नीट समजत नव्हतं आणि त्यांत त्या गधड्याचं खालीं सालं भांडण चाललेलं.

**शारदा :** राजाची कांहीं चूक नव्हती त्यांत. लहान आहे तसा तो अजून. आणि ती गांगुली का आंगुली—तिचे कान उपटायचे आहेत मला, तिच्या घरीं जाऊन. अगदीं तिच्या आई-वडलांसमोर—

**बापू :** मी ओळखतों तिला चांगली. ती कुठं आणि कसली नोकरी करते सगळं माहीत आहे मला. तिचा बाप एक नंबरचा जुगारी आहे. आमच्या ऑफिससमोरच्या हॉटेलांत संध्याकाळीं विड्या पीत बसलेला असतो. तिचे भाऊ एकजात मवाली आहेत—

**शारदा :** तिच्या निदान आईला गांठीन आणि त्या पोरीला बांधून ठेवायला सांगेन मी.

**बापू :** शहाणी असशील तर जाऊं नकोस, सभ्य स्त्रीनंच काय, पुरुषानं सुद्धां जायचं ठिकाण नाहीं तें...आपलं सालं झालं थोडं—

**शारदा :** नानांनीं भांडण ऐकलं असेल तर त्याचाच परिणाम झाला असणार.

**बापू :** त्याचा कसला आलाय् परिणाम ? भांडण झालं सालं जगाच्या एका टोकाला आणि ते होते दुसऱ्या टोकाला.

**शारदा :** जातांना काय म्हणाले म्हणालांत ? ओळखत होते शेवटपर्यंत ?

**बापू :** आधीं चांगले बोलत होते. पाणी मागितलं प्यायला. मग बडबड चालली होती. त्यांच्या नोकरीबद्दल, महागाईबद्दल—पगार किती कमी मिळत होता ... मग त्यांनीं पेन्शन बुक शोधून पाहिलं. दुसरे कागदपत्र हातांत घेतले. जरासे चाळले. मी धरून बसवलं तशी बसले पण अंग थंडगार पडत होतं. मी त्यांना धरलं. त्यांनीं डोळेच फिरवले. मग खुणेनं ' पडून राहातों ' म्हणाले ... शेवटीं म्हणाले, ' नमूला बोलाव. '

**शारदा :** नमूला ?

**बापू :** हो नमूला. मी नीट ऐकलं सालं. मला वाटलं, तुझ्या आईलाच ते हांक मारताहेत भ्रमांत – पण तुझ्या आईचं नांव होतं —

**शारदा :** जानकी. ( आठवतात ) नमू – नमू —

**बापू :** ते म्हणाले, ' नमू, जरा जवळ ये. माझा हात धरून ठेव.'... हं ... आणि त्याच्या आधीं ते म्हणाले, ' तुझा हात घ्यायचाच राहिला शेवटीं.'... ते तुझ्या आईशींच बोलंत असणार बघ ... मला अगदीं वांकावं लागत होतं ऐकण्यासाठीं ... मग मात्र कांहीं समजेनाच त्यांचं बोलणं ... ते गप्प झाले ते झालेच मग.

[ स्तब्धता ]

**शारदा :** तुम्हीं मला बोलवायला हवं होतं—

**बापू :** पण त्यांनीं ओळखलं नसतं तुला. शिवाय तुला त्यांचा चेहेरा बघवला नसता...आणि तूं करणार काय होतीस—तिथं असतीस तरी ?

**शारदा :** पण तरीदेखील—

**बापू :** मी मुद्दामच बोलावलं नाहीं...( पूर्वीच्या स्वरांत )...हें पहा, आपण सुतकांत असतांना हा गधडा तोंडाला रंग फासून नाचत राहिला तर मी त्याचं सालं थोबाड फोडून टाकीन...माझं हंसं होतं ह्या गाढवाच्या अशा वागण्यामुळं. त्याच्या पायाला सांखळीच बांधली पाहिजे साली म्हणजे

घराबाहेर पडणार नाहीं तो...वागणं काय...राहाणं काय...आंघोळ काय–(एकदम) आंघोळ करून त्याला किती महिने झाले ?

**शारदा :** अहो, पण येतां जातां त्याच्यावर राग केला तर कसं चालेल ?

**बापू :** राग ? मघाशीं तूं इथं असतीस तर साले कळलं असतं.

**शारदा :** काय ?

**बापू :** त्याचे ब्रह्मेसाहेब येऊन गेले. नानांचे कागदपत्र पहायला आले होते ते.

**शारदा :** काय म्हणत होते ? राजाच्या कामाबद्दल–नानांच्याच ओळखीनं तिथं लागला तो—

**बापू :** त्याचं साले नांव काढूं नकोस ग.

**शारदा :** मला कळतच नाहीं त्याचं कांहीं.

**बापू :** ब्रह्मेसाहेब घरीं आलेले. त्यांना वाटलं, हा इथं भेटेल तर ह्याचा साला पत्ता कुठंय् ? गेले आठ दिवस पायावर उकळतं पाणी सांडलं म्हणून रजेवर आहे तो. घरांत वातावरण काय आणि ह्याचं वागणं काय !

**शारदा :** त्याला कुणाबद्दलच कांहीं वाटत नाहीं. नाना गेले – ह्याला कांहीं नाहीं त्याचं. आणि नानांचा कोण जीव ह्याच्यावर !

**बापू :** ब्रह्मेसाहेब वर बसले होते, कागदपत्र पहात. कशालासा मी खालीं आलों. हे राजेश्री त्याच वेळीं बाहेरून आले. गात होते मजेंत. मी म्हटलं 'वर ब्रह्मेसाहेब तुझा पाय बघायला आले आहेत –' त्याबरोबर धांवत सुटला बाहेर. मी इथून खिडकींतून पाहिलं. रस्त्यांतच त्यानं चपला घातल्या. तो भेटूं दे तर खरा —

**शारदा :** पण ब्रह्मेसाहेब काय म्हणत होते त्याच्याबद्दल ?

**बापू :** ते कांहीं बोलणारच नव्हते अशा प्रसंगीं. पण मलाच रहावलं नाहीं म्हणून मी विचारलं आणि सगळं बाहेर आलं. (डायऱ्या दाखवून) ह्या डायऱ्या – ह्याला ह्या पोस्टानं पाठवायला सांगितल्या होत्या ब्रम्ह्यांनीं. स्टॅंप्स्चे पैसे खाल्ले आणि डायऱ्यांचा इथं कचरा मांडला ... कॅश थोडी दिली होती त्यांनीं ह्याच्याजवळ, त्यांत घोटाळे ... पोस्टेजबुकांत स्टॅंप्सच नाहींत ह्यानं ठेवलेले ... त्याच्या साहेबाच्या नांवाची पाटी होती ना – तीच म्हणे ह्यानं काढून नेली ... ती साली पाटी घेऊन ह्याला काय करायचं होतं ?

**शारदा :** मला ह्यांतली कांहींसुद्धां माहिती नाहीं.

**बापू :** आणि मला काय सुरवातीपासून माहिती आहे ? ... पहिल्यापासूनच चुकलंय् सालं कुठंतरी त्याचं. त्यानं साला हात लावला कीं माती बनते सगळ्याची.

**शारदा :** आणखी काय म्हणाले ब्रह्मसाहेब ?

**बापू :** आणखी काय म्हणणार ? म्हणाले, त्यानं हा सगळा हिशेब चुकता नाहीं केला तर ते कोर्टांत खेचणार आहेत ... तो म्हणे दर पांच मिनिटाला थापा मारतो ऑफिसांत ... रजेच्या निमित्तानं त्यानं आपल्या सगळ्या कुटुंबाचे पाय छाटले आहेत ... तो जर यापुढं ऑफिसांत नीट वागला नाहीं ना, तर —

**शारदा :** पण आतां तो तर मद्रासला जातोय्.

**बापू :** त्याचा बाप जातोय् साला मद्रासला ! तो गेलाच आतां कुठं तर जेलमध्यें जाईल ... पैसे भरल्याशिवाय त्याला इथून हलतां येणार नाहीं कुठं ... तो रडला, पायां पडला तरी मी दमडी भरणार नाहीं.

**शारदा :** पण त्याला इतके पैसे लागतात कशाला ? बघावं तर कधीं कांहीं विकत घेत नाहीं. बरं कधीं पैसे हवे असले तर माझ्याकडून मागून घेतो.

**बापू :** तूं फार लाडावून ठेवलं आहेस त्याला. म्हणून तर सालं बिघडलंय् सगळं ... तुला कल्पना आलीच असेल – त्यानं पैसा कुठं ओतला असेल त्याची. ती साली आंगठी घेतली ना त्यानं साहेबासारखी लग्नाची म्हणून ? ... त्याला म्हणावं हे धंदे सोड आतां. मुलींना थापा काय देतो, घरीं काय आणतो–इथं राह्यचं तर त्यानं रात्रीं आठाच्या आंत घरीं आलं पाहिजे—

**शारदा :** त्याला काय कमी वेळां सांगितलं असेल मी ? त्याला तें पटत तरी नाहीं, नाहींतर ऐकायचं तरी नाहीं —

**बापू :** अजून साला पत्ता आहे का बघ त्याचा. आला घरांत तरी स्वस्थ बसणार नाहीं, मोकळा वागणार नाहीं...खिडकींतून पळूनच काय जाईल—

**शारदा :** पुरे झालं बाई. माझं डोकं फुटायची वेळ आली ह्या कटकटींनीं. त्या दिवशीं भांडण झालं घरांत आणि नाना गेले. तुमचं भांडण होईपर्यंत ठीक होते ते —

**बापू :** म्हणजे साली शेवटीं आमचीच चूक. त्यांना दहांदा सांगितलं डॉक्टरकडे जा. ते एकदां तरी गेले ?

**शारदा :** त्यांना त्या डॉक्टरबाईकडे जायचं नव्हतं.

**बापू :** कोणती डॉक्टरबाई ?

**शारदा :** ती – डॉ. चित्रे...काळी काळी आहेत ती ? ती नव्हती नानांना आवडत.

**बापू :** मग त्यांना म्हणायचं – एकाद्या आकाशी नाहींतर हिरव्यागार रंगाच्या डॉक्टरकडे जा म्हणून —

**शारदा :** तुम्हींच जर नेलं असतं त्यांना डॉक्टरकडे —

**बापू :** मला तेवढाच उद्योग आहे ना. तुला तरी काय झालं होतं त्यांना न्यायला.

**शारदा :** ( रडूं लागतात ) ते शेवटपर्यंत चांगले होते. तुमच्या आणि राजाच्या भांडणाचा परिणाम झाला त्यांच्यावर. हो – तेंच कारण झालं.

**बापू :** त्यांचं नेहमींच हें ना तें चालूं असे. एक साला महिना असा गेला नाहीं – त्यांना कांहीं होत नव्हतं असा.

**शारदा :** मी कां–हीं बोलत नाहीं. तुम्हीं त्यांना पोसलंत हेच केवढेतरी उपकार आहेत. ( आंत स्वयंपाकघरांत जाऊं लागतात )

**बापू :** कुठं निघालीस ?

**शारदा :** कामं पडलीं आहेत अजून —

**बापू :** राहूं देत —

**शारदा :** राहून कसं चालेल ? कामांत गुंतलं मन कीं दुःखाचा विसर पडतो.

( स्वयंपाकघरांत जातात. त्यांच्यामागून बापूहि जाऊं लागतात )

**बापू :** हवं तर मी तुला कांहीं मदत करायला लागतो.

[ दोघे जातात. राजा ‘ मोर्चसॉंग ’ गात लेफ्ट् – करीत बागेंत येतो. ]

**राजा :** लेफ् – राईट्, लेफ् – राईट् ... हॉल्ट. ऑर्ड – आर्म्स. ( थांबतो. भाषणास सुरुवात करतो. ) प्यारे सैनिक हो – आज एका फार मोठ्या योध्यास मानवंदना देण्यासाठीं आपण इथं मोठ्या संख्येनं हजर आहोंत – कर्नल नानासाहेब यांच्या तेजस्वी कामगिरींतूनच आपण स्फूर्ति उचलली आहे. गेले कांहीं दिवस प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें ते कांहीं करूं शकत नव्हते. परंतु सैनिक कसा असावा याचा पहिला धडा त्यांनीं लिहून दिला. आयुष्याच्या अखेरीस त्यांना दुर्दैवानं दुखण्यांशी लढावं लागलं. आयुष्य म्हणजे लढाई आहे, पराजयावर लढाई करण्यासाठीं लढत राहिलं पाहिजे

असं ते नेहमीं कवाईत करतांना म्हणत. त्यांचं मन, त्यांचा ओढा शास्त्राकडे होता. पेनिसिलीन आणि हायड्रोजन बॉंब त्यांना सर्वांच्या आधीं स्वतः तयार करायचे होते – आपण सर्व सैनिकांनीं दोन क्षण स्तब्धता पाळावी अशी मी विनंती करतो. (काखेंतली कल्पनेंतली टोपी काढून मानवंदना देतो. स्तब्ध उभा राहातो. चंदू आणि मधुराणी येतात)

**चंदू** : राजा – राजा —

**राजा** : अटेन्शन् ... अरे, तुला पाहिलंच नाहीं मीं. (एकदम मधुराणीकडे लक्ष जातं) मधुराणी – मधू —

**मधुराणी** : राजा —

**चंदू** : काय चाललं होतं तुझं ?

**राजा** : सहज विचार करत उभा होतों – लढाईबद्दल.

**चंदू** : ऑं ?

**राजा** : (मधुराणीला) मला चंदूकडून कळलं तूं आल्याचं.

**चंदू** : तूं एकाद्या योध्यासारखा वाटत होतास लढाईचे विचार करतांना. घरांत कसं काय ? आलबेल ?

**राजा** : आमच्या घरांत आलबेल ? छान ... (मधुराणीला) मधु, तूं केव्हां आलीस ?

**मधुराणी** : गेल्याच आठवड्यांत ... नाहीं, त्याच्या थोडंसं आधींच —

**चंदू** : तुझे आजोबा गेल्याचं कळलं मला—

**राजा** : हो. आठ दिवस झाले.

**चंदू** : गेल्या आठवड्यांत तर मी आलों होतों तुझ्याकडे. तेव्हां ठीक होते. एकाएकी काय झालं ?

**राजा** : मरण आलं.

**चंदू** : मला कळलं तें. पण तुझी गोष्ट म्हणून थाप वाटली मला प्रथम. मी आईला म्हटलंदेखील— ती आज दुपारीं येणार आहे तुमच्याकडे.

**राजा** : मधू, तुला फोन नव्हता करतां येत ?

**मधु०** : मी करणारच होतें रे—

**चंदू** : मी काय ठरवलं होतं माहीत आहे ? ही बातमी कळल्यावर दोस्तांना सांगणार होतों–राजाला पत्र लिहा. म्हणावं, तुझ्या ह्या थापेवर आमचा विश्वास आहे.

**राजा :** चंद्या, ही भलतीच थाप कशाला मारीन मी ?

**चंदू :** वा: तूं म्हणजे राजा हरिश्चंद्र नाहीं का ? हरिश्चंद्र, धर्मराज, जॉर्ज वॉशिंग्टन आणि तूं— सत्यपालकांची अशीच यादी आहे म्हणे ... असो. आजोबांची बातमी खरी ना ?

**राजा :** हवं तर ठेव विश्वास. लहान पोरासारखा विचारत बसूं नकोस.

**चंदू :** लहान ? लहान तूं आहेस. तुलाच मोठं व्हायचंय् म्हणून. (मधु राणीला) मधू, ह्याच्या गोष्टी ऐकशील तर थक्क होशील ... त्याची म्हणे एक झोंपडी आहे. कुठंतरी दूर — तिथल्या गोष्टी. लहान पोरांनासुद्धां सुचणार नाहीं असं बडबडतो ... डायऱ्या ... ऑफिसच्या डायऱ्या-साहेबांच्या नांवाची पाटीच एकदां काढून काढली. सूड उगवायला म्हणून म्हणे !

**राजा :** चूप—

**चंदू :** एवढंच येतं तुला ! हेंच तुझं ठरलेलं उत्तर आहे शेवटचं. आपली चूक दुसऱ्याला समजली ह्याचंच दुःख. ह्याच्यासाठींच ओरडायचं— तुला एक सांगायचंच विसरलों मी. तूं जरा जपून राहा—

**राजा :** कां ?

**चंदू :** तुला भीति आहे.

**राजा :** कुणाची ?

**चंदू :** कुणाच्यातरी भावाची.

**राजा :** कुणाच्या ? ... तूं काय बडबडतो आहेस मघापासनं ?

**चंदू :** ती अलका ? तिचे सगळे भाऊ मवाली आहेत. ती भावांना पाठवणार आहे उद्यां सकाळींच. म्हणूनतर मी आलों इथं तुला सांगायला. रस्त्यांत ही मधू भेटली —

**राजा :** (खोट्या हिंमतीनं) मी मुळींच घाबरलों नाहीं.

**चंदू :** हो. तूं घाबरला नाहींस असाच दिसतो आहेस ... तुझे तुकडे करायला कमी करायचे नाहींत ते.

**राजा :** अरे, जा रे —

**चंदू :** तूं तिला ती आंगठी द्यायला नको होतीस. दिलीस तर मग मागायला नको होतीस परत. तुला सांगितलं नव्हतं मी ? ... आतां तिला ती परत हवी आहे ... तिचे भाऊ म्हणजे —

**राजा :** अरे, जा रे —

**चंदू :** खोटं बोलण्याइतकी सोपी गोष्ट नाहीं ती. मी तुझ्या जागीं असतो ना, तर त्या मवाल्यांना भेटण्याआधीच पळालों असतों मद्रासला.

**राजा :** तिकडे नोकरी मिळवावी लागते.

**चंदू :** हो. तीहि तुझी थाप असेल तर प्रश्नच मिटला.

**राजा :** मी जातोंच आहे मद्रासला – त्याच्याबद्दल शंका नको.

**चंदू :** मी कोण शंका घेणार ? मला इतर खूप उद्योग आहेत – आणि दुसरं राजा, माझ्या आईची गोष्ट – अर्थात् जुळवलेली – कुठं सांगत फिरूं नकोस. परिणाम वाईट होईल नाहींतर. त्या मवाल्यांच्या आधीं मी नंबर लावून घेईन.

**राजा :** अरे, जा ना —

**चंदू :** माझं सांगून झालं. मी जातों. (जाऊं लागतो) ... आणि ह्यापुढं तुला माझ्याकडून कसलीहि मदत होणार नाहीं.

**राजा :** आभारी आहे.

[ चंदू जातो ]

मधू, हा चंद्या इतका भडकलाय् ना पण त्याला माझ्याबद्दल खूप वाटतं.

**मधुराणी :** हं —

**राजा :** मधू —

**मधुराणी :** राजा —

**राजा :** तूं केव्हां आलीस परत ?

**मधुराणी :** गेल्या आठवड्यांत.

**राजा :** फोन कां नाहीं केलास ?

**मधुराणी :** करणार होते —

**राजा :** खरंच ?

**मधुराणी :** खरंच ! मला वाटलं तूं कुठंतरी नेहमींच्या ठिकाणीं भेटशील—

**राजा :** बाहेर कसा जाणार मी ? घरांत हें —

**मधुराणी :** हो. कळलं मला. काय वय होतं आजोबांचं ?

**राजा :** असेल साठसत्तर. मधू, आपल्याला भेटून किती दिवस झाले ?

**मधुराणी :** पांच आठवडे ... इतके दिवस तूं फुकट घालवले नसशीलच.

**राजा :** फुकट म्हणजे ?

**मधुराणी :** लग्नाचीं वचनं देत ... प्रत्येक भोळ्या, खुळ्या मुलीला —
**राजा :** हँ —
**मधुराणी :** तुला सांगू ? तूं मॅड आहेस अगदीं – मॅड !
**राजा :** (खांदे उडवून) कुठं होतीस तूं इतके दिवस ?
**मधुराणी :** होते इकडे तिकडे —
**राजा :** पत्रं कां नाहीं लिहिलंस ?
**मधुराणी :** मी लिहिलं होतं एक पत्र – पण मग मी तें फाडून टाकलं.
**राजा :** तूं नेहमींच असं करतेस. पत्र लिहायचं आणि फाडून टाकायचं – न पाठवतां.
**मधुराणी :** (विषय बदलते) तुझं कसं चाललंय् राजा ? नाट्यलेखन, कथालेखन ? तुझं पुस्तक आलं का रे बाहेर ?
**राजा :** (हर्षभरानं) नाहीं, पण दसऱ्यापर्यंत प्रसिद्ध होईल. कादंबरीसुद्धां निघणार आहे माझी (मधुराणी रोखून बघते) ... लिहायला सुरुवात करणार आहे मी —
**मधुराणी :** वेडा आहेस तसा आळशीसुद्धां आहेस —
**राजा :** मधू —
**मधुराणी :** हं —
**राजा :** तुला आयुष्य कसं वाटतं ग ? साधं – सरळ, कीं —
**मधुराणी :** हं...ठीक आहे...जे साधं सरळ असतं तें आयुष्यच नसतं... कांहीं कांहीं गोष्टी साध्या, सरळ नसतातच – आणि त्या तशा नसण्यांतच त्यांचं सौंदर्य असतं ... रांगोळीची वेलांटी, देखण्या देहाचा डौलदारपणा
**राजा :** मधू, तूं सुद्धां अशी बोलतेस—
**मधुराणी :** खरंच राजा, माझ्या डोक्यांत अशीं खूप वाक्यं लावून ठेवलेलीं असतात...तुझ्यासारखं कुणी भेटलं कीं त्याला दाखवण्यासाठीं–वहीवर लिहून—
**राजा :** वाटतं, जुनं आयुष्य फाडून टाकावं आणि नवीन सुरूं करावं. वहीच्या नव्या पानावर नव्या आयुष्याची नवी सुरुवात करावी.
**मधुराणी :** पानं उलटत जायचीं—
**राजा :** मी तर रोज दिवसाचं एकेक पान उलटून टाकतों. नव्या आयुष्याची सुरुवात करायची म्हणून. पण माझ्या दिवसाच्या पानाचा कागद असा

आहे-त्याच्यावर नशीबाची शाईच फुटते. नव्या दिवसाचं पान उलटलं तर पुन्हां त्याच्यावर डाग असतोच-दुर्दैवाचा.

**मधुराणी :** नव्या आयुष्यावरून आठवण झाली. मघाशीं चंदू कांहींतरी मद्रासबद्दल सांगत होता—

**राजा :** हो. मला मद्रासला नोकरी मिळतेय्.

**मधुराणी :** खरंच राजा ?

**राजा :** मी कांहीं चांगलं, वेगळं बोललों कीं त्याबद्दल शंका घेतलीच पाहिजे का प्रत्येकानं ?—मधू, तूं तरी वेगळी हवी होतीस—

**मधुराणी :** मी शंका घेते ती तुझ्या शब्दाची नाहीं, माझ्या आनंदाची. मला इतका आनंद झाला हें ऐकून. राजा...राजा, हें पान मात्र नवीन आहे. खरंच नवीन आहे. वेगळ्या कागदाचं-नशीबाची शाई न फुटणाऱ्या कागदाचं.

**राजा :** (मघाच्या कल्पनेवर खूष होऊन) रोज नव्या पानावर नव्या आयुष्याची नवी सुरुवात.– आणि त्यावर नशीबाचा जुना डाग.

**मधुराणी :** राजा, शाई फुटत असेल तर एकेक पान न उलगडतां एकदम नवं प्रकरण उघड—

**राजा :** तेंच करावं लागणार आहे.

**मधुराणी :** तूं ती नोकरी धरणार आहेस ना ?

**राजा :** या घटकेला तरी वाटतंय्—

**मधुराणी :** नुसतं वाटतंच ?

**राजा :** कुणास ठाऊक !

**मधुराणी :** तुलाच ठाऊक असलं पाहिजे. राजा, तुझं काय झालंय् सांगूं ? विहिरीच्या कांठावर लहान मूल बसलेलं असतं ना, तसा आहेस तूं. तुला पाण्यांत उतरायचं आहे – पण तुला वाटतं, पाणी थंडगारच असेल... आपण बुडलों तर काय होईल ? घरीं गेल्यावर ओले कपडे पाहून आई ओरडली तर काय सांगायचं ?

**राजा :** अंहं. मी विचार करतोंय् – पाण्यांत बुडी मारावी कीं नुसतं पोहत राहावं ... कळलं ? पाण्यांत उतरायचं मात्र नक्की झालंय् —

**मधुराणी :** पण तुला कुणीतरी शिक्षक हवाय्.

**राजा :** ... तुला ठाऊक आहे – मला मद्रासला कां जावंसं वाटतं ?

**मधुराणी :** कां ?

**राजा :** मद्रास खूप मोठं असेल. तिथं हरवतां येईल स्वतःला ... खूप मोठं शहर ... मोठे रस्ते, मोठीं दुकानं ... गर्दी गर्दी आणि गर्दी ... गर्दींत स्वतःला हरवून घ्यायचं आणि मग शोधत फिरायचं —

**मधुराणी :** वेडा !

[ एकमेकांकडे पाहात राहातात ]

**मधुराणी :** ( एकदम ) राजा, तुझं कुणावर प्रेम आहे रे ?

**राजा :** नारी मज बहु असती – परी प्रीति तुजवरती.

**मधुराणी :** 'बहु असती' नको हं राजा —

**राजा :** बरं, परी प्रीति तुजवरती.

**मधुराणी :** नुसतं सांग —

**राजा :** मधुराणी, हा राजा तुझा बंदा गुलाम आहे. असं ?

**मधुराणी :** अंहं:

**राजा :** मग ? ... मधु, मला तूं खूप आवडतेस. अगदीं खूप – सगळीच्या सगळी. बस्स ?

**मधुराणी :** त्या मालू बांदेकरचं काय सांग —

**राजा :** तिचं काय ?

**मधुराणी :** तिचं काय तें तुला चांगलं ठाऊक आहे.

**राजा :** त्या वाक्याला पूर्णविराम दिला मीं.

**मधुराणी :** पूर्वीदेखील तूं पूर्णविराम दिला होतास.

**राजा :** नाहीं, तेव्हांचा अर्धविराम होता. गेल्या आठवड्यांतच मी तें वाक्य पुरं केलं आणि पूर्णविरामाचा एक खिळा ठोकला तिथं.

**मधुराणी :** आणि त्या अलका गांगुलीचं काय ?

**राजा :** दुसरा खिळा —

[ स्तब्धता. इकडेतिकडे बघून सिगारेट काढतो. मधुराणीला विचारतो ]

**मधुराणी :** नको —

**राजा :** एकदां तूं हॉटेलांत ओढली होतीस ... माझी उष्टी —

**मधुराणी :** राजा, मला तुझ्याशीं लग्न करायचंय् —

**राजा :** ठाऊक आहे मला मधू. एकाद्या मंगल दिवशीं आपण —

**मधुराणी :** एकाद्या नाहीं ... आत्तां. या घटकेला.

**राजा :** वेडी तर नाहींस ?

**मधुराणी :** मग पुढल्या आठवड्यांत तरी ? तूं मद्रासला जायच्या आधीं. नाहींतर तूं तिकडे गेल्यावर तुला आवडेल तसं —

**राजा :** मला वाटतं, मी फार वेळां लग्न ठरवतों मधू —

**मधुराणी :** पण आपण ठरवायचंच नाहीं, एकदम करूनच टाकायचं —

**राजा :** म्हणून तूं माझ्या मागं मागं असतेस – मला जाळ्यांत पकडायला?

**मधुराणी :** हो. त्या जाळ्यांत मीसुद्धां येऊन बसणार आहे.

**राजा :** ठीक आहे —

**मधुराणी :** ठीक आहे काय ? ... मी एक स्त्री तुला विचारतेय् आणि तूं 'ठीक आहे' नुसतं म्हणतोस ... तूं म्हणायला हवं होतंस – 'मधू, हें खरं आहे ? ... असं चमकून ... आनंदाच्या वर्षावांत तुझा चेहरा भिजवून.

**राजा :** वेडी —

**मधुराणी :** ( हातांत हात घेते ) राजा —

**राजा :** हं —

**मधुराणी :** तुला आठवतं राजा, आपण त्या रात्रीं सिनेमाहून येत होतों. तूं माझा हात धरलास – मी म्हटलं, पुन्हां केव्हांतरी ... 'केव्हांतरी म्हणजे ?' तूं लगेच विचारलंस. – मीं म्हटलं, 'वेळ आली कीं सांगेन.'

**राजा :** बरं. मग ?

**मधुराणी :** बरं मग काय ? ती वेळ आज आली आहे. आयुष्याचं पान उलटतांना मी आलें आहे ... मी तुझी आहे राजा. तुझ्यासाठी जन्मलेली. तुझ्यासाठीं वाढलेली, तुझ्यासाठीं मरणारी–आज माझ्या खोलीवर येशील ? कुणीसुद्धां नाहीं तिथं —

**राजा :** मधू —

**मधुराणी :** राजा, आपला संसार —

**राजा :** मुलाबाळांचं लेंढार —

**मधुराणी :** लेंढार नाहीं, गोकुळ —

**राजा :** आँ ?

**मधुराणी :** हो गोकुळ ... एक विचारूं ?

**राजा :** काय ?

**मधुराणी :** मी पवित्र नाहीं, शुद्ध नाहीं असं तुला कळलं तर !

**राजा :** कळलं तर ? मला कल्पना आहे त्याची.

**मधुराणी :** तुला सगळं सांगून टाकायला हवं मीं —

**राजा :** कशाला ? नको सांगूस.

**मधुराणी :** पण तरीसुद्धां —

**राजा :** बरं सांग. मी ऐकणार नाहीं.

**मधुराणी :** ऐकलं पाहिजे. मला सांगितल्याचं समाधान मिळावं म्हणूनतरी.

**राजा :** बरं. सांग.

**मधुराणी :** शूटिंगला म्हणून मला बाहेर जावं लागतं, राहावं लागतं ... गेले पांच आठवडे मी कुठं होतें – विचार ना.

**राजा :** कुठंहि असलीस म्हणून काय झालं ? या क्षणीं तूं माझ्याजवळ आहेस – एवढं पुरं आहे मला.

**मधुराणी :** खरंच राजा ?...मला असं जावं लागतं. कधींहि, कुठंहि, केव्हांहि, कुणाच्याहि बरोबर ... वेगवेगळ्या शहरांत. रंगीबेरंगी आणि चकचकीत वातावरणांत ... आणि तेव्हांसुद्धां मध्येंच कधींतरी मी इथं येतें. मनानं. मला आवडलेल्या शहराच्या रूपाचा एकादा रंगीबेरंगी कांचेचा तुकडा घेऊन मी येतें. तुला दाखवायला...आणि माझं मन पुन्हां रमतच नाहीं आणि सगळी गर्दी मात्र ओळखीची ... कळलं तुला मी काय बोलतेंय् ? ... मलासुद्धां कधीं कधीं माझं बोलणं कळत नाहीं. शब्द आपल्या धर्मानं बरोबर अर्थ देत असतील या भरंवशांवर मी स्वस्थ बसून त्या शब्दांचा फक्त ध्वनि ऐकत असतें.

**राजा** : मधू, मी सुद्धां ऐकत असतो ... माझ्या अनोळखी शब्दांचा ओळखीचा ध्वनि —

**मधुराणी** : मला कधीं वाटतं, अदृश्य व्हावं आणि फिरत राहावं. कुणाची पर्वा न करतां, कुणाला न कळतां भटकत राहावं ... आपल्या कुठल्याहि कृतीबद्दल कुणी पुसणार नाहीं असं —

**राजा :** आणि मला वाटतं, अदृश्य होऊन देशांत जावं माझ्या. त्या तिथें पलिकडे – माझा देश आहे. तिथं माझ्या कल्पनेंतलीं माणसं आहेत ... घरं आहेत ... झाडं आहेत —

**मधुराणी :** राजा, तुझ्या देशांत मी येतें ना. त्या तिथें पलिकडे ... अरे, तुझ्या कल्पनेंतलीं माणसं, घरं, झाडं मला ओळखतात ... आपलं कसं रे सगळं जमतं? मी तुझे विचार वाचते आणि मी बोललेले विचार तूं लिहून घेतोस ... छोटासा देश आहे आपला. निळ्या निळ्या सागराच्या कांठीं. निळा सागर सोनेरी वाळूंत खेळायला येतो तेव्हां तो खेळतां खेळतां आपल्या झोंपडीच्या दाराशीं येतो. मीं डोळे वटारले कीं एकदम पळून जातो ... तुला घाबरतो का रे तो?

**राजा :** हो तर. मला खूपच घाबरतो. मी त्याला म्हणतों, 'आमच्या झोंपडींत—'

**मधुराणी :** अंहः राजवाड्यांत—

**राजा :** मी तिथला राजा—

**मधुराणी :** आणि मी तिथली—

**राजा :** सम्राज्ञी.

**मधुराणी :** (मुद्दाम) महाराज—

**राजा :** राणीसरकार ... मधू, तासन् तास मी असा विचार करत राहातों. मला वाटतं, आपलं लग्न झालंय्. आपण आपल्या राजवाड्यांत राहायला गेलों आहोंत.

**मधुराणी :** (हर्षानं) राजा —

**राजा :** (कल्पनेंतच) राणी, त्या राजवाड्यांत एक महाल आहे माझा. हिरव्या रंगाचा. खूप मोठा. खोलींत शिरलं कीं तिथं राज्य भेटतं ... तिथं खेळण्यांची सुन्दर सुन्दर देखणीं शहरं आहेत. खेळण्यांचे घोडे, खेळण्यांचे हत्ती, शिपाई... आणि त्यांत एक विदूषकसुद्धां आहे—

**मधुराणी :** लाल लाल नाकाचा—

**राजा :** राणी, आपण रस्त्यांची आंखणी करूं. खेळण्यासाठीं मैदानं—

**मधुराणी :** शाळा नको हं—

**राजा :** छट्. शाळा नाहींच... बागा, पोहण्याचे तलाव, कारंजीं—

**मधुराणी :** राजा, मी ओलीचिंब झालेंय रे या सुखानं—

**राजा :** एक छोटी गाडी...

**मधुराणी :** आपल्या गोकुळाला फिरवणारी—राजा, पण ती गाडी सारखी गोल गोल फिरली पाहिजे हं— सरळ गेली तर मला नाहीं चालणार.

**राजा :** (मधुराणीला जवळ घेऊन) हो... हो... हो. तुझ्या भाषेंत सांगायचं तर ती रांगोळीसारख्या वेलांच्या घेत फिरेल.

**मधुराणी :** खरंच राजा ?

**राजा :** हो, मधुराणी. पहिल्या डब्यांतल्या मुलाला शेवटच्या डब्यांतल्या मुलाशीं बोलतां आलं पाहिजे.

[ स्तब्धता ]

**मधुराणी :** राजा, तूं मद्रासला खरंच जात आहेस ?

**राजा :** विचार चाललाय्.

**मधुराणी :** नुसता विचार ?

**राजा :** जाणार आहे ग ... लौकरदेखील जाईन.

**मधुराणी :** लौकर म्हणजे ?

**राजा :** लौकर. खूप लौकर.

**मधुराणी :** पण खूप लौकर म्हणजे किती ?

**राजा :** म्हणजे – बरं. तूंच सांग.

**मधुराणी :** खूप लौकर म्हणजे आज. आत्तां.

**राजा :** वेडी तर नाहींस ?

**मधुराणी :** त्याला काय झालं ? स्टेशनवर जायचं. मद्रासच्या गाडींत बसायचं. मद्रास आलं कीं उतरायचं.

**राजा :** तुला ठीक आहे बोलायला. तुला संवय आहे प्रवासाची.

**मधुराणी :** कां ? मी येणार ना तुझ्याबरोबर.

**राजा :** खरंच राणी ? (हात धरतो) खरंच ?

**मधुराणी :** हो खरंच. तूं आणि मी. राजा आणि राणी. कोण अडवणार आपल्याला. आपण आपल्या देशांत जात आहोंत. आपला देश आपली वाट पाहातोय्. खेळण्यांतले शिपाई स्वागतासाठीं सिद्ध आहेत. विदूषक रंगून तयार आहे —

**राजा :** (प्रथमच गंभीरपणें) त्याचं असं आहे मधू, मला माहीत नाहीं कांहीं. पण जायचं म्हणजे तयारी करायला हवी —

**मधुराणी :** त्यांत काय कठीण आहे ? एक बॅग घ्यायची, त्यांत कपडे भरायचे – झाली तयारी.

**राजा :** तिकीट काढायचं असतं —

**मधुराणी :** मग काढ कीं तिकीट. स्टेशनवर जाऊन तिकीट काढायचं, गाडींत बसायचं. कठीण काय आहे ?

**राजा :** ही सोपी गोष्ट कशी सुचली नाहीं मला ?

**मधुराणी :** न सुचायला काय झालं ? तुलाहि सुचेल. सुचणं तर खूपच सोपं आहे ... आज जायचं आपण मद्रासला. तूं आणि मी —

**राजा :** पण मधू —

**मधुराणी :** रात्रीची गाडी आहे. सहज मिळेल आपल्याला. सकाळीं एकाद्या स्टेशनला उतरायचं. इडली सांबारम् आणि कडतकढत कॉफी घ्यायची. दुपारीं गाडींत जेवण आणि मग दुसऱ्या दिवशीं सकाळीं मद्रास ... यन्न स्वामी – तिथं माझी एक मैत्रीण आहे. मुदलीयार म्हणून. तिचा पत्ता काढूं आणि एक दिवस तिथं तिच्याकडे राहूं —

**राजा :** ( एकदम पटून ) आज रात्रीं जायचं मधू. ठरलं.

**मधुराणी :** राजा. आज रात्रीं जायचं.

**राजा :** हो हो राणी – आज रात्रीं जायचं.

**मधुराणी :** बोरीबंदरला गाडी पकडायची रात्रीं दहा वाजतां. परवां सकाळीं मद्रास. त्या दिवशीं दुपारीं तीन-साडेतीन वाजतां मैत्रिणीकडे. रात्रीं एकाद्या सिनेमाला जाऊं. तामिळ नाहींतर तेलुगु...तिथल्या 'रीजन्ट' थिएटर-मध्यें...मुदलीयारच्या घरचीं सगळीं माणसं ओळखतात मला...आतां किती वाजले आहेत राजा ?

**राजा :** ( मनगटावरल्या घड्याळांत पाहून ) साडेसात झाले—

**मधुराणी :** मग मी जातें राजा. माझी केव्हांहि तयारी झालेली असते. तुला वेळ लागेल. मी पुढं स्टेशनवर जाऊन मद्रासचीं दोन तिकीटं काढून ठेवते. तूं ये लगेच. येणार ना ?

**राजा :** ( निश्चयानें ) येणार. नक्की येणार मधू. मी नक्की येणार. ही वास्तू आज सोडणार मी.

**मधुराणी :** विश्वास ठेवूं ?

**राजा :** जरूर.

**मधुराणी :** निश्चय ठरला ?

**राजा :** पक्का.

**मधुराणी :** बदल ?

**राजा :** नाहीं होणार.

**मधुराणी :** अच्छा. मी जातें खोलीवर. स्टेशनवर भेटेन मी तुला. व्हीलर बुक स्टॉलजवळ...अडीच तास आहेत अजून...खोलीचा शेवटचा निरोप घेणार मी. माझंहि ठरलं. पुन्हां त्या खोलीकडे मी वळणार नाहीं. तिथला एकटा एकांत पुन्हां अनुभवणार नाहीं...

**राजा :** मधू—

**मधुराणी :** दोन मद्रास – कुठल्याहि वर्गाचीं...पण तूं ये हं राजा. नाहींतर येणार नाहींस आणि फजिती करशील माझी.

**राजा :** येणार म्हणजे येणार—

**मधुराणी :** तुझ्या आईवडलांना काय सांगशील ?

**राजा :** त्यांना कल्पना आहे तशी—

**मधुराणी :** नक्की येशील ना रे ?

**राजा :** हो. हो ... नक्की. माझ्या राणीची शपथ. झालं ? ... नव्या आयुष्याचं नवं पान उघडणार आहे मी.

**मधुराणी :** अच्छा राजा. नक्की ये हं—

**राजा :** बोरीबंदर स्टेशन ... व्हीलर बुक स्टॉल.

**मधुराणी :** मद्रास दोन तिकीटं —

[ मधुराणी जाते. राजा निश्चयानें घरांत येतो. आपल्या कपाटाकडे वळतो. सामान पडलेलं पाहातो. इतक्यांत वरून बापू येतात ]

**बापू :** राजा, किती वाजले साले ?

**राजा :** साडेसात होऊन गेले —

**बापू :** कुठं जायचा विचार आहे कीं आला आहेस कुठून ?

**राजा :** आलोंय्.

**बापू :** कुठं गेला होतास ?

**राजा :** बाहेर.

**बापू :** राजा, सालं उलट उत्तरं करूं नकोस. कुठं गेला होतास ? ... सिनेमाला ?

**राजा :** नाहीं.

**बापू :** नानांना जाऊन आठवडा झाला नाहीं तर तूं उनाडक्या करतोस. सिनेमाला जातोस. लाथेखालीं तुडवून काढीन —

**राजा :** आतां काय केलं मी ?

**बापू :** काय केलं ? कितीतरी केलं आहेस. पायावर उकळतं पाणी टाकून—

**राजा :** पण ऑफिसांत तसं —

**बापू :** सालं तोंड वर करून बोलूं नकोस. तुझ्या आईनं लिहिलेला लेख... सालं इकडे लक्ष दे – तुझ्या आईचा लेख —

**राजा :** लेख ? कसला ?

**बापू :** कसला काय कसला ? प्रश्न विचारूं नकोस. तुला ठाऊक आहे... तिनं तो संपादकाला पाठवायला सांगितला होता.

**राजा :** तो लेख मीं पाठवला आहे आणि तसं सांगितलंसुद्धां आहे तिला.

**बापू :** ( खिशांतून लेख काढतात ) तूं सालं पोस्टांत कांहींच टाकलं नाहींस. तिचा लेख नाहीं, हापिसांतल्या डायऱ्या नाहींत —

**राजा :** डायऱ्या ?

**बापू :** हो...तुझं सालं कपाट उघडून पाहिलं मीं. तो लेख सांपडला त्यांत.

**राजा :** तो कच्चा लेख होता. फेअर कॉपी मीं पाठवली आहे.

**बापू :** कच्चा लेख कसला साला ?...तो पक्का लेख आहे. तुझ्या आईच्या अक्षरांत लिहिलेला. तूं तो पोस्टांत टाकलेला नाहींस —

**राजा :** हें पाहा ... आईनं लिहिलेल्या त्या लेखांत शेंकडों चुका होत्या. त्या मीं दुरुस्त करून तो लेख पुन्हां लिहिला. आणि पोस्टांत टाकला.

[ शारदाबाई येतात ]

**बापू :** तुला साला तो पुन्हां लिहायला कुणी सांगितलं होतं ? शेंकडों चुका होत्या म्हणे.... तो लेख मीं लिहून दिला म्हणून शेंकडों चुका सांपडल्या ? आतां तूं लिहिलास म्हणजे हजारों चुका असणार ... तुला आणि तो लेख उघडून बघायला सालं कुणी सांगितलं ? प्रत्येक गोष्टींत ढवळाढवळ ... डायऱ्या – डायऱ्यांची काय भानगड आहे ?

**राजा :** कसल्या डायऱ्या ?

**बापू :** कसल्या डायऱ्या ? उलट उत्तरं कर तर खरा तूं – म्हणे कसल्या डायऱ्या. तुझ्या ब्रह्मेसाहेबांशीं माझं बोलणं झालंय् आज ... मला सालं सगळं कळलंय् ... तुझा बाप म्हणून व्हायची शरम वाटते मला ... दिसेल तिथं तुझा हात ढवळाढवळ करतो ... माझ्या कोटाच्या खिशांत ऑफिसची किल्ली होती ती कुणी घेतली ?

**राजा :** ऑफिसांत चौकशी केलीत ?

**बापू :** तुला सालं काय वाटतं — नाटकांत बोलतो आहेस ? किल्ली कुठं आहे सांग.

**राजा :** मला ठाऊक नाहीं. मला काय करायचं आहे तुमच्या ऑफिसची किल्ली घेऊन ?

**बापू :** दोनशें डायऱ्या घेऊन काय करणार होतास ? तुझ्या साहेबाच्या नांवाची पाटी घेऊन काय करणार होतास ? ... बोल. तुझं सालं डोकंच उलटं झालंय्. —

**राजा :** ( चिडून ) डोकं उलटंच आहे माझं. मी सुद्धां उलटा आहे ... माझ्या वेडाची शिवण दिसते ना तुम्हांला. मला ब्रम्ह्यांकडे नोकरी करायची नव्हती, तुम्ही माझ्यावर जबरदस्ती केलीत. तुम्हांला मी पैसा कमवायला हवा होता — आणि तोसुद्धां ती घाणेरडी, कंटाळवाणी नोकरी करून. लाजिरवाणी नोकरी करून. डोकं माझंच उलटं आहे ... उलट्याचा सुलटा अर्थ मला कळत नाहीं ना ?

**बापू :** सालं उलट बोलूं नकोस राजा ... सांगून ठेवतों. तुझं सालं थोबाड फोडून टाकीन —

**राजा :** माझे हात केळीं खायला जायचे नाहींत —

**बापू :** राजा सरळ बोल. बापाच्या अंगावर हात टाकणार आहेस ?

**राजा :** मी कशाला तें पाप घेऊं उलट्या डोक्यावर ? मी कांहींसुद्धां बोललों नाहीं.

**बापू :** मग— हात केळीं खायला जायचे नाहींत कां म्हणालास ?

**राजा :** कां म्हणजे ? माझं थोबाड फोडायला तुम्हीं हात उगारलांत कीं तो मी धरणार आहे— मधल्या मध्यें.

**बापू :** तूं सालं बोलायचं तें आईशीं बोल रे. तुझं बोलणं तिलाच कळतं.

**शारदा :** राजा, काय करून ठेवलं आहेस तूं ?

**राजा :** कुठं काय ?

**शारदा :** तुझ्याकडे दिलेला लेख—

**राजा :** मी टाकला पोस्टांत. मी बापूंना तेंच सांगितलं. मी फक्त तो फेअर केला. खूप चुका होत्या त्यांत. कुणी लिहिला तो ?

**शारदा :** सगळ्यांना कांहीं फडके खांडेकर होतां येत नाहीं. तूं काय काय करतोस ... तुझ्या हापिसांतले पैसे ?

**राजा :** ऑफिसांतले पैसे ?

**बापू :** मीं सांगितलं नव्हतं आतां ?

**राजा :** मी तर दिडकीसुद्धां—

**बापू :** तुझ्या पोस्टेजबुकांत अडीचशें रुपयांचा फरक आहे. शिवाय चिल्लर–

**राजा :** हं... हं... तें.

**शारदा :** तूं काय— केलंस काय त्या पैशाचं ?

**बापू :** काय केलं ? नाटकांतल्या मुलींना फिरवायला पैसे लागतात ना ? दुसरं कांहीं करण्याची अक्कल आहे का त्याला ?

**शारदा :** तुझ्यापुढं शर्थ झाली आतां राजा. तुझ्याकडे पैसे नव्हते तर माझ्याजवळ मागायचे.

**बापू :** तुला साली कल्पनाच नाहीं कशाची हाच तर साला मोठा बांधा आहे. ऑफिस म्हणजे एकुलत्या एक पोराच्या बापाचं घर नाहीं हें त्याला समजायचं आहे अजून.

**राजा :** हें पाहा. त्या ब्रह्मे आणि कंपनींत मला नोकरी करायची नाहीं म्हणून मी सुरवातीपासून म्हणत होतों.

**बापू :** तुला कुठंच नोकरी करायची नव्हती आणि बाप हयात असतांना एकुलत्या एक मुलानं कांहींहि करायचं नसतं एवढी एक अक्कल तुझ्या-जवळ होती.

**राजा :** मला तुमची दिडकीसुद्धां नको आहे. स्वतःपुरतं सहज कमवीन मी.

**बापू :** अच्छा ? कशावर कमवणार ?

**राजा :** लेखनावर.

**बापू :** लेखनावर म्हणे. साधं ऑफिसचा हिशेब लिहितां येत नाहीं आणि म्हणे लेखन करणार. नोकरी नको तर धंदा कर—

**राजा :** पण तुम्हींच म्हणत होतां – मला धंदा जमणार नाहीं म्हणून.

**बापू :** धंद्याचं आणि आळसाचं सालं पटत नाहीं म्हणून मीं म्हटलं. उद्यां सालं माझं कमीजास्त झालं तर आईकडे तुलाच बघायला हवं.

**राजा :** उद्यां ?

**बापू :** तोंडांतून एक शब्द काढूं नकोस साला. तोंड फोडून हातांत देईन. साली बोलायची तऱ्हा काय तुझी.

**शारदा :** आणि राजा, चंदूच्या आईबद्दल तूं सांगितलंस – त्यांना दिवस गेले आहेत —

**राज :** अग, गंमत केली मीं ती.

**बापू :** साली तुझी गंमतच चालते सारखी.

**शारदा :** आणि त्यांना सांगितलंस माझा पाय कापला आहे म्हणून.

**राजा :** मला काय माहीत – तुझी आणि चंदूच्या आईची ओळख आहे ?

**शारदा :** तुला कुठं कधीं कांहीं माहीत असतं ? उद्यां त्या मला भेटायला-सुद्धां येणार आहेत. तुला त्यांच्यापुढं उभं राहायची हिंमत होईल उद्यां ?

**राजा :** उद्यां ? ( निश्चयानें ) उद्यां मी इथं नाहीं आहे.

**बापू :** राजा, तुझी साली इतकी मिजास असेल तर आज वस्तीलाच राहूं नकोस इथं.

**राजा :** वस्तीला ? वस्तीलासुद्धां मी इथं नाहीं आहे आज रात्रीं. मी जातोंय्

**शारदा :** कुठं ?

**राजा :** रात्रीच्या गाडीनं मी मुंबई सोडतोंय्... मद्रासला मला नोकरी मिळाली आहे.

**शारदा :** इथं तुझी आणखी कांहीं भानगड असेल तर ती मागं ठेवून जाऊं नकोस. बॅगेंत भर आणि ने आपल्याबरोबर.

**बापू :** माझ्या बॅगला हात लावायचा नाहीं. सांगून ठेवतों सालं आधींच – चला. सत्यपालक राजा हरिश्चंद्र आज अयोध्या सोडणार —

**राजा :** हो मला गेलंच पाहिजे —

**बापू :** तूं जात नाहींस. मद्रासची तर गोष्टच सोड, पण तूं घराबाहेरदेखील पडत नाहींस.

**राजा :** कां म्हणून ?

**बापू :** मी सालं सांगतों म्हणून. ( आवाज चढवून ) तुझ्या ऑफिसचे पैसे भरल्याशिवाय तुला बाहेर पडायला मिळणार नाहीं. ब्रह्मेसाहेबांनीं तुला जेलमध्यें टाकलं नाहीं. उपकार मान त्यांचे.

**राजा :** उपकार, उपकार आणि उपकार. उपकाराच्या ओझ्यानं मान वाकवायची आणि माती खायची. उपकार. फार परोपकारी शब्द

आहे हो. ह्या एका शब्दानं कणभर उपकार करणारा जन्मभर मालक होतो आणि तो कणभर उपकार वाहाणारा मणभराच्या ओझ्यानं गाढव ठरतो. उपकार. मला तुम्हीं पोसलंत, तुमचे उपकार मी मानले पाहिजेत. शाळेंत चार अक्षरं शिकलों, मास्तरांचे उपकार मी मानले पाहिजेत. दिवसाला दहा लाथा आणि महिन्याला दीडशें रुपये देणारी नोकरी मिळाली–ब्रह्मयांचे उपकार मला मानले पाहिजेत–चाबकानं ठोकलं नाहीं म्हणून. तुम्हीं माझ्या आवडीकडे, माझ्या पिंडाकडे लक्ष दिलं नाहीं तरी मला उपकार मानले पाहिजेत – तुम्हीं माझ्या देहाकडे लक्ष पुरवून मला उपाशी ठेवलं नाहींत म्हणून. हा शब्द लहानपणीं कानावर आला तेव्हां तो साधाभोळा वाटला, भाबडा वाटला. खरोखरचा उपकारी वाटला... आणि आतां मोठेपणीं भीति वाटते त्या शब्दाची. तो मला गिळून टाकील असं वाटतं.

**बापू :** लहानपणींच मी पोरका झालों होतों, राजा...तुला कधीं सांगायला मिळालंच नाहीं मला हें...... प्रत्येक क्षणाला दुसऱ्यानं मदत केली. त्यांचे उपकार घेतले आणि मी पायावर उभा राहिलों. तुला लहानपणीं बाप मिळाला. मोठेपणीं चुकलेल्या रस्त्यावरून मागं बोलवायला तुला बाप आहे.

**राजा :** कशाला ? मागं बोलावून पाठीर्चीं सालटीं काढायला ? लहानपणीं बाप होता–चौथीच्या वर्गांत माझ्या निबंधाला शाळेंत आलेल्या पाहुण्यानं पंचवीस रुपयांचं बक्षीस दिलं. हा मोठा लेखक होईल म्हटलं. तें बक्षीस घेऊन ऊर फूटेपर्यंत मी धांवत आलों बापाकडे. आणि तो म्हणाला, ‘ गणितांत पहिला आला असतास आणि हें बक्षीस मिळालं असतं तर मला कौतुक वाटलं असतं. ’ असा फुटत आलेल्या उरावर घाव घालायला मला बाप होता लहानपणीं ? आईजवळ गेलों मी. ती म्हणाली उपकार समज – आज तुला फोडणार होते काठीनं गणितांत नापास झाल्याबद्दल. पंचवीस रुपये दिसले आणि राग कमी झाला. तिथंहि उपकार घेतले – उरावर घाव घातल्याबद्दल आणि ठार मारलं नाहीं म्हणून. उपकार. ब्रह्मयांचेसुद्धां केवढे उपकार. दिवसभर पंख्याखालीं एका टेबलाशीं बसूं देतात ते मला...

**शारदा :** पण राजा, नोकरीवर जाण्यापूर्वी विचारलं होतं तुझं मत.

**राजा :** मला कधीं मत होतं या घरांत. घोड्याच्या वयाचा होईपर्यंत तुम्हीं भाकरी टाकलीत ना माझ्यापुढं. संताप आणि त्रागा करून आपलं

मत मांडायचं आणि मग मला विचारायचं – 'हो' म्हणून एवढ्याच संतापावर, एवढ्याच त्राग्यावर खूष आहेस कीं 'नाहीं' म्हणून आणखी संताप, आणखी त्रागा तुला पाहिजे आहे? ... माझं मीं ठरवलं आहे. मी रात्रींच्या गाडीनं मद्रासला जाणार. नव्या आयुष्याचं नवं पान मी उघडणार आहे. माझा ब्रह्मयांशीं संबंध सुटला.

**बापू :** तो संबंध सुटणार नाहीं राजा. तूं पैसे भरशील तेव्हांच तो तुटेल. पैसे भरल्याशिवाय तुला जातां येणार नाहीं.

**राजा :** मी जाणार. मला वाद घालायचा नाहीं. जाणार म्हणजे जाणार.

(जिन्याजवळ जातो)

**बापू :** मग मर तर. (राजा जिन्यानें वर जाऊं लागतो) तुला कोर्टांत खेचल्याशिवाय ते राहाणार नाहींत. मी कांहीं बोलणार नाहीं तेव्हां ... दिडकीसुद्धां भरणार नाहीं. मी सांगेन ... माझा आणि मुलाचा संबंध नाहीं...आणि राजा, माझी बॅग घेऊं नकोस जातांना नेहमींसारखी.

[राजा वर जातो. बापू आणि शारदाबाई चमत्कारिक अवस्थेंत]

**शारदा :** (हुंदका फुटतो) तुमच्या दोघांच्या भांडणांत मीच मरायचं शेवटीं

[राजा खालीं येतो. हातांत पत्र्याची जुनी बॅग आणि पिशवी. कपाटांतलं सामान तो भरूं लागतो.]

**शारदा :** राजा, गाडी केव्हांची आहे तुझी?

**राजा :** रात्रीची —

**शारदा :** केव्हां पोचणार मद्रासला?

**राजा :** परवां सकाळीं.

**शारदा :** तिथं गेल्यावर काय सोय आहे?

**बाप :** पोलीस कोठडी असेल कीं साली मद्रासला.

**शारदा :** (बापूंकडे दुर्लक्ष करून) चांगले कपडे असतील ते घे. स्वेटर घे. मफलर घे ... अरे, आधीं म्हणाला असतास तर तुझे उसवलेले कपडे शिवून दिले असते ... सामान कशांतून नेणार? बॅग ... नानांच्या तेराव्या दिवशीं तूं नसणार. त्यांचा जीव होता तुझ्यावर ...

(राजा डायऱ्या काढतो)

**बापू :** त्या साल्या डायऱ्या कशाला हव्यात तुला?

**राजा :** पोस्टानं रवाना करायला. ज्याच्या त्याला —

**शारदा :** सवडीनं पत्र टाक ... तुला तेराव्या दिवशीं येतां नाहीं येणार... नाहीं का ?

**बापू :** अग, तूं कसली त्याच्या साल्या बोलण्यावर विश्वास ठेवतेस. तो कुठं जात नाहीं आणि कांहीं नाहीं.

**राजा :** ( पत्र्याच्या बॅगचें झांकण जोरांत लावतो ) मी जाणार आहे. जाणार म्हणजे जाणार.

**बापू :** आज इतकीं सालीं वर्षं ओळखून आहे मी तुला ... तुझ्या हातून सालं कांहीं होणार नाहीं.

**शारदा :** आणि होणार असेल तेव्हां तुम्हीं असलं कांहीं तरी बोलून घ्याल.

[ राजा जायला निघतो. जड मनानं दाराजवळ जाऊन थांबतो. ]

**राजा :** आई, पोंचल्यावर पत्र पाठवीन. राहायचं ठिकाण नक्की झालं कीं पत्ता कळवीन. ( अगदीं जड मनानं ) आई. नाना गेल्याचं मला फार वाईट वाटतंय् —

( एकदम बाहेर पडतो )

**शारदा :** राजा — राजू —

**बापू :** ते सालं समन्स पाठवतील त्याला. मी सरळ हात ठेवीन साले कानावर.

**शारदा :** पैसे आपल्याला भरलेच पाहिजेत ... आपल्या एकुलत्या एक मुलाचीं पापं त्याच्या आईवडलांनाच धुवावीं लागातात. जरी डाग गेला नाहीं, हाताच्या चिंध्या झाल्या तरी ... तिथं तो सुधारेल का ? हिंमत धरील ?

**बापू :** तो जात नाहीं मद्रासला ... तो परत येईल हिंमत गाळून. मी सांगतों सालं —

**शारदा :** तुम्हांला काय माहीत तो कशाला गेलाय्, काय करणार आहे... त्यानं कुणाचं नांव सांगितलं ? तो सिनेमावाला —

**बापू :** मला तें सालं नांव आठवत नाहीं.

**शारदा :** त्याच्या कोटांत होतं म्हणे त्या सिनेमावाल्याचं पत्र.

[ पडलेल्या कोटाकडे बघतात. बापू कोट उचलतात. पत्र काढतात. उघडतात ]

**बापू** : हिंदींत आहे. (वाचतात) प्रिय महोदय, सादर प्रणाम। आपके भेजे हुए कथानक लिये आभार। इसमें शक नहीं की आपमें कुछ गुण हैं। फिलहाल हमारी कंपनीके प्रॉडक्शन्स बंद किये हुए है। मेरे डिपार्टमेंटमें व्हेकन्सी —

**शारदा** : (आतुरतेनें, काळजीनें) आहे ना? घेतील ना त्याला नोकरीवर?

**बापू** : नहीं। जब बम्बई आऊँगा तब जरूर मिलियेगा। आपको कामयाबी हासिल हो। लिखते रहिये और क्या कहूँ? भवदीय — कुणीतरी व्यंकटरामन् का कुणी आहे.

**शारदा** : अहो, मग इथं काय उभे राहिलांत? ... थांबत जा आणि घेऊन या त्याला—

**बापू** : त्यानं सालं स्टेशन गांठलं असेल.

**शारदा** : मग स्टेशनवर जा आणि त्याला अडवा.

**बापू** : तो आतां लहान नाहीं ... राहूं दे पायावर उभा ... माझा त्याचा संबंध सुटला—

**शारदा** : सुटून सुटत नाहींत हे संबंध म्हणूनच प्रेमानं धरून ठेवायचे असतात ... तुम्ही जा त्याला परत आणा ... कसाहि असला तरी आपला आहे तो. घरानंच झिडकारलं तर जग जवळदेखील करणार नाहीं त्याला. त्याच्याजवळ पुरेसे पैसेदेखील नसतील हो —

**बापू** : तो साला त्याचा प्रश्न आहे. आणि त्याच्याजवळ पैसे असलेच तर ते ब्रम्ह्यांचे असतील. मी साली पैज लावतों.

**शारदा** : नको ती पैज ह्या असल्यावेळीं ... मला राजा हवाय् —

**बापू** : तो उपाशी राहाणार नाहीं. कांहीं साली काळजी करूं नकोस ...

**शारदा** : अहो, पण नव्या शहरांत नोकरी लागणं —

**बापू** : नोकरी लागण्याइतकं शिकवण्याचं सालं कर्तव्य मी केलंय् ... त्यानं मनांत आणलं, निश्चय केला तर त्याला साली नोकरीसुद्धां मिळेल सहज.

**शारदा** : पण काय करणार तो तिकडे?

**बापू** : कारकुनी करील ... कुणाचीं पत्रं लिहून देईल, अर्ज लिहून देईल ... कांहीं करूं दे तो ... हं, जाऊं दे. मला झोंप आली आहे. आतां झोंप तरी साली चांगली लागेल ही कटकट गेली की.

**शारदा :** डोक्याला तेल चोळूं का ?

**बापू :** जाऊन पड तूं आतां —

**शारदा :** नानादेखील नाहींत —

**बापू :** हं, चालायचंच सालं.

**शारदा :** मागलं दार लावलंय् ना नीट ?

**बापू :** हो नीट लावलंय् ... मी पाह्यलं स्वतः (जिन्यानें वर जाऊं लागतात) ... आतां साली नोकरी मिळालीच त्याला तर रमेल ... एकाद्या सुटींत येईल इकडे भेटायला ... (वर जातात.)

[शारदाबाई जिन्यानें वर जायला निघतात. प्रकाशांत बाग दिसते. चंदू आणि अलका]

**चंदू :** झोंपले वाटतं.

**अलका :** दाराच्या फटींतून बघ—

**चंदू :** बहुधा झोंपायलाच गेले... सगळेच्या सगळे.

**अलका :** (वेडावते) झोपायलाच गेले. दिवे मालवून बोलत बसले असतील. तो सुद्धां असेल दडून बसलेला. उद्यां माझीं माणसं येतील ना त्याला ठीक करायला. कशी आंगठी देत नाहीं तेंच बघतें.

**चंदू :** तुझ्या भावाची सगळी गँग येणार ?

**अलका :** मग ? तुला काय वाटलं ? आतां तो सुटत नाहीं. मी सोडणार नाहीं त्याला. सकाळींच भावाला घेऊन येते. त्याच्या काकाला सुटणार नाहीं आंगठी. थापाड्या. नाटकी. (रागानें घंटी वाजवते) राजा...राजा...

**शारदा :** (आंतून) राजा इथं नाहीं.

**अलका :** खोटं, दार उघड, मी स्वतः शोधून काढते त्या नाटक्याला. राजा...दार उघड.

**शारदा :** मी दार उघडणार नाहीं.

**अलका :** ठीक आहे, उद्यां सकाळींच येतो आम्ही स्ट्रेचर घेऊन. खोटारडा, निर्लज्ज.

**शारदा :** चालती हो.

**अलका :** मी जाते. पण तुम्ही तयारीत राहा. उद्यां सकाळच्या.

**चंदू :** गप ग—

**अलका :** कां म्हणून ? (दोघे जाऊं लागतात) तो काय समजतो स्वतःला ? (जातात.)

[ कांहीं क्षण रिकामे जातात ]

(काळोख. मग खिडकी उघडली जाते. राजा हळूंच खिडकींतून येतो. हातांत पत्र्याची बॅग आणि पिशवी. राजा बॅग खालीं ठेवतो. दिवा लावतो. फोन करण्याचा प्रयत्न करतो. थांबतो. खिडकी लावून घेतो. दिवा मालवतो. लावतो. आवाज न करतां बॅग उघडतो. बॅगेंतल्या डायऱ्या शून्य मनानें कपाटांत ठेवूं लागतो आणि......)

● पडदा पडतो ●

शाखा.
क्र. २२८४० नों. दि. ६.९.८८
वि. नाटक
IRBK-0122849

# शं. ना. नवरे
# यांचीं अन्य पुस्तकें

## कथासंग्रह

- तिळा उघड
- जत्रा
- कोंवळीं वर्षं
- सखी
- इंद्रायणी
- वेला
- खलिफा

## एकांकिका

- चार एकांकिका

मुंबईतील सर्व पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतात.